
१ फेब्रुवारी १९६८: चाळीस पै
माणूस


ताशकंद चैत्य
शान्तीमूर्ती
रिवाजा प्रमाणे 'दर्शन' घेतले आता मला माझा 'व्यवहार' पाहूं द्या !
त्यागी
राजेंद्र गायकवाड




वर्ष पाचवे : अंक सतरावा : १ फेब्रुवारी १९६६
किंमत चाळीस पैसे : वार्षिक वर्गणी दहा रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.

## पुढे काय ?

'नाझी भस्मासुराचा उदयास्त' ही लेखमाला या अंकात समाप्त होत आहे. मुखपृष्ठाची योजना या विषयाला अनुलक्षून केलेली आहे.

अनेक वाचकांकडून सतत विचारणा होत असते, की 'माणूस'मध्ये यानंतर कोणती लेखमाला सुरू होणार ! नाझीवरील लेखमाला खूपच यशस्वी झाल्याचे हे लक्षण आहे.

तसे याच अंकात एकदम काही सांगणे कठीण आहे. दोनचार विषय डोळ्यांसमोर आहेत, त्या दृष्टीने साधनसामग्रीची व लेखनाची जमवाजमवही सुरू आहे. लवकरच यासंबंधी काही प्रकटन वाचकांसमोर ठेवता येईल, अशी आशा आहे.

मात्र पुढील अंकापासूनच काही स्वतंत्र मोठे लेख माणूसमध्ये प्रसिद्ध होत आहेत. उदाहरणार्थ, १५ फेब्रुवारी अंकातच मॉमचे टॉलस्टॉयसंबंधीचे भाष्य प्रा. माधव मनोहर अनुवादीत आहेत. नाझी तुरुंगातील एका झेक स्वातंत्र्य-योद्धयाचे मनोगतही वि. शं. पारगावकरांच्या शब्दांत लवकरच वाचकांना 'माणूस'मधून पाहावयास मिळेल. 'द गॉल' संबंधीही एक असाच मोठा लेख 'माणूस'साठी योजलेला आहे. वाचकांना हे सर्व उपक्रम आवडतील, अशी आशा आहे. सं.

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# विटी नवी, राज्य जुने...

इंदिराबाईऐवजी मोरारजी देसाई जरी पंतप्रधान म्हणून निवडून आले असते तरी सार्वत्रिक निवडणूक अवघ्या वर्षावर येऊन ठेपली असल्याने गेल्या दीड-दोन वर्षांत स्पष्ट होऊ लागलेल्या भारतीय धोरणात मूलभूत असा फारसा फेरफार होणे शक्य नव्हते. इंदिराबाईंनादेखील केवळ एक वर्षापुरती अशी पावले टाकता येणार नाहीत. माजी प्रधानमंत्र्यांनी घालून दिलेल्या दिशेनेच त्यांना वर्षभरापुरते चालावे लागेल. फक्त ती धोरणे आता त्या किती जोमाने अंमलात आणतात ते पाहावयाचे.

आणि त्या दृष्टिकोनातूनच त्यांनी निवडलेल्या मंत्रिमंडळाकडे बघावे लागेल. केवळ एक वर्षाचा अवधी आणि शास्त्रीजींचे धोरण पुढे चालविण्याचे राष्ट्रीय परिस्थितीमुळे लादले गेलेले उत्तरदायित्व यामुळे इंदिराबाई आपल्या नव्या मंत्रिमंडळात काही विशेष क्रांतिकारक बदल करतील, अशी अपेक्षा धरणेच चूक झाले असते. इंदिराबाईंची सुस्पष्ट असलेली मते पाहता मंत्रिमंडळात मोठा बदल करण्याची त्यांची निश्चितच इच्छा असली पाहिजे. आणि राष्ट्रपतींना नवी यादी करण्यात त्यांनी जो उशीर केला त्यामुळे त्यांनी तसा प्रयत्नही केला असावा असे दिसते. परंतु भारताची आजची राजकीय परिस्थितीच अशी आहे की राज्यशकट हाकण्यासाठी धुरेवर बसलेल्या नेत्याला डाव्या उजव्या बाजूंचा समतोल राखावाच लागतो. कुठल्याही एका बाजूला झुकला तर त्यालाच धोका होण्याचा संभव असतो. निदान आज तरी ही परिस्थिती आहे. आणि नेहरूंनाही हे तंत्र कटाक्षाने पाळावे लागले. १९६७ मध्येही इंदिराबाई नेतेपदावर राहिल्याच तर त्या आपल्या मनाजोगते मंत्रिमंडळ बनविण्याचा प्रयत्न करतील हे निश्चितच.

तेव्हा इंदिराबाईंच्या नव्या चमूवरून त्यांच्या स्वतंत्र धोरणाचे आराखडे बांधीत बसण्यापेक्षा आधीच निश्चित झालेले धोरण त्या किती कार्यक्षमतेने पार पाडतील हेच पाहणे अधिक युक्त. मंत्रिमंडळाच्या फेरबदलावरून फार तर त्यांचे मन कोणत्या दिशेने काम करते आणि त्यांच्यावर किती प्रकारची दडपणे आहेत याचा थोडासा अंदाज येऊ शकेल.

## किल्ल्या उजव्या गटाचे हाती

इंदिराबाईंनी आपल्याभोवती उभारलेल्या मंत्रिमंडळाच्या वलयात तीन नवीन व्यक्तींचा समावेश केला आहे. अशोक मेहतांचा समावेश आणि मनुभाई शाह यांना कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा देऊन व्यापार मंत्रालयाचा वाढविलेला दर्जा यावरून नियोजन, अर्थ व व्यापार या बाबींवर आपल्या कार्यक्रमांत अधिक भर देण्याचे बाईंनी ठरविलेले दिसते. अशोक मेहतांच्या आगमनामुळे काँग्रेसमधील डाव्या गटाला आणि



बाहेरील डाव्या पक्षांनाही बरे वाटले असेलच. परंतु, अशोक मेहतांच्या हाती केवळ कागदपत्रावरील नियोजनाचे खाते आहे. तिजोरीच्या चाव्या निश्चितपणे उजव्या गटाचे म्हणून मानण्यात येणाऱ्या नव्यानेच शास्त्रीमंडळांत समाविष्ट झालेल्या सचिन चौधरींच्या हाती आहेत.

त्याचप्रमाणे जगजीवनरामांचे मंत्रिमंडळातील आगमन ही इंदिराबाईंनी केवळ आपल्या निवडणुकीसाठी दिलेली किंमत असली तरी त्यामुळे मंत्रिमंडळातील समतोल राखण्यास मदत झाली आहे. जगजीवनरामांच्या संसदगृहातील अनुयायांची ऐंशी मते इंदिराबाईंना निश्चितच उपकारक ठरली आहेत. त्याशिवाय त्या एवढ्या बहुमताने निवडून येणे कठीण होते. अशोक सेन आणि हुमायून कबीर हे त्यांच्या मर्जीनेच मंत्रिमंडळाबाहेर पडले असे वृत्त आहे. त्यामुळे त्यांच्या जागी आलेल्या श्री. जी. एस्. पाठक व फकरूद्दिन अहंमद यांच्या आगमनामागे राजकीय उद्देश दिसत नाही.

## नंदा बचावले

लागोपाठ दोनदा हंगामी प्रधानमंत्रिपद भूषविलेल्या गृहमंत्री गुलझारीलाल नंदांना मात्र गृहमंत्रीपदावरून खाली ओढण्याचे बरेच प्रयत्न झाले असे दिसते. गृहमंत्र्याला लागणाऱ्या कणखरपणाचा आणि कार्यक्षमतेचा त्यांच्यात अभाव आहे असा बऱ्याच जणांचा त्यांच्यावर आरोप आहे. आणि डावीकडे झुकणारी त्यांची विचारसरणीही उघड असल्याने उजव्या गटालाही ते नको आहेत. पण सध्या वर्ष-भरापुरते तरी त्यांनी आपली खुर्ची टिकविण्यात यश मिळविले आहे. मंत्रिमंडळातील त्यांचा क्रमांक तरी खाली येईल असे तर्क–वितर्क चालू होते पण नंदांनी आपला सन्मान कायम ठेवला आहे. नंदांऐवजी यशवंतराव चव्हाणांना दुसरा क्रमांक मिळेल अशा वावड्या होत्या. त्या खोट्या ठरल्या, एवढेच नव्हे तर यशवंतरावांचा चक्क सहावा क्रमांक लागला. मंत्रिमंडळाचे क्रमांकही इंदिराबाईंनी एवढ्या धूर्तपणे लावले आहेत की तेथेही पुन: समतोल साधावा. नंदांनंतर लगेच तिसरा क्रमांक जगजीवनरामांचा आणि याच तऱ्हेने लगोलग उजवे, डावे, मध्यममार्गी असे सर्व क्रमांक आहेत.

इंदिराबाईंची सारी भिस्त कामराजांबरोबरच यशवंतराव चव्हाण आणि सुब्रह्मण्यम् यांच्यावर राहील असे जे म्हटले जाते त्यामध्ये विशेष अर्थ नाही. चव्हाण आणि सुब्रह्मण्यम हे दोघेही त्यांच्या विश्वासातले आहेत हे खरे असले तरी बाईंना स्वतंत्र विचार करून निर्णय घेण्याची शक्ती आणि अंतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे विशेष आकलन आहे. इंदिराबाई नेहरूंबरोबर भारताच्या कानाकोपऱ्यात आणि साऱ्या त्रिखंडात फिरून आलेल्या आहेत. देशोदेशी जसे त्यांचे वैयक्तिक मैत्रीचे संबंध आहेत तसेच भारतातल्या प्रांतोप्रांतीही आहेत. नेतेपदावर आल्याने त्यांना तात्पुरती जरी मुरड घालावी लागली तरी त्यांची समाजवादी विचारसरणी स्पष्ट आहे. लोकक्षोभाला बळी पडलेले माजी संरक्षणमंत्री श्री. कृष्ण मेनन यांचे आणि बाईंचे बरेच विचार जुळते आहेत. अशी स्त्री कुणाच्या तरी तालावर काही एका मर्यादेपलीकडे चालेल हे शक्य दिसत नाही.

प्रधानमंत्र्यांच्या जागेवर आरूढ होताक्षणीच चालत आलेल्या धोरणांना जोमाने पुढे रेटण्याच्या कामाबरोबरच अंतर्गत व आंतरराष्ट्रीय अशा अनेक पेटत्या समस्यांना बाईंना वर्षभर तोंड द्यावे लागणार आहे. माजी प्रधानमंत्री जर सुदैवाने भारतात आले असते तर ज्या ताश्कंद कराराच्या निषेधात काही राष्ट्रीय पक्षांनी त्यांना काळी निशाणे दाखविली असती तोच करार निर्धाराने पुढे रेटण्याचे इंदिराबाईंनी आश्वासन दिले आहे. कराराच्या कलमांप्रमाणे भारत–पाकिस्तान सीमा मागे घेण्याची बोलणी दोन सेनापतींमध्ये पूर्ण होताहेत तों जनसंघ, प्रजासमाजवादी पक्ष आदींनी कराराच्या निषेधार्थ कंबर कसली आहे. या विरोधाला तोंड देत बाईंना तो करार पुढे रेटायचा आहे.

ताश्कंद करारामुळे आणि आणिबाणीच्या काळात अन्नधान्याची प्रचंड मदत अमेरिकेने देऊ केल्याने रशिया व अमेरिका या दोन्ही बड्या राष्ट्रांचा सारखाच प्रभाव भारतीय राजकारणावर पडला आहे. कॉंग्रेसमधील डाव्या उजव्या गटांच्या तुल्यबलत्वालाही ही दोन राष्ट्रे भारताकडे सारख्याच काळजीने लक्ष पुरवितात हेही एक कारण असावे. आणि म्हणूनच इंदिराबाईंना कुठल्या एका बाजूला झुकते माप ठेवून चालता येणार नाही. आजपर्यंत तरी त्या जेवढ्या रशियात लोकप्रिय आहेत तेवढ्याच अमेरिकेतही आहेत. निवडणुकीनंतर विविध देशांतील वृत्तपत्रात त्यांच्याविषयीची जी मते व्यक्त झाली त्यांवरून त्यांच्याविषयी कुठल्याही देशाचे फारसे असे वाईट ग्रह नाहीत हे स्पष्ट होते.

## चीनची पिछेहाट

ताश्कंद करारांच्या संदर्भात जी गोष्ट अधिक स्पष्ट झाली अशी एक नवीन राजकीय हालचालही भारताने लक्षात घ्यावयास हवी. गेल्या काही महिन्यांत जागतिक राजकारणातून कम्युनिस्ट चीन थोडा बाजूला पडत चालला आहे. ताश्कंद कराराच्या सुमारास इतर काही घटना अशा घडल्या की त्यामुळे चीन बाजूला फेकला जात असल्याची ही क्रिया अधिक स्पष्ट झाली आहे. ताश्कंदच्या बैठकीला कोलदांडा घालून पाकिस्तानला रशियाच्या थोडे दूर आणि स्वत:च्या काबूत ठेवण्याचे चीनने अनेक अयशस्वी प्रयत्न केले. गेल्या एक दीड वर्षात विशे-षत: भारत-पाक युद्धापासून चीन, पाकिस्तान एकमेकांच्या खूपच जवळ आले होते. परंतु ताश्कंद करारामुळे हे संबंध निश्चितच दुरावले आहेत.

ताश्कंद कराराच्याच सुमाराला सोव्हिएत रशियाने सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षाचा सेक्रेटरी ब्रेझनेव यास रशियन चिनी सरहद्दीवर असलेल्या मंगोलियात धाडून त्या देशाशी एक महत्त्वाचा मैत्रीचा करार केला आहे. स्वतंत्र मंगोलियाचे अस्तित्व चीनला प्रथमपासूनच मान्य नव्हते आणि तिबेटप्रमाणेच मंगोलियाचाही कधी काळी घास घेण्याचा चीनचा जुना इरादा अधूनमधून स्पष्ट होत होता. परंतु रशियाने मंगोलियाशी जो नव्याने मैत्रीचा करार केला आहे, त्यामध्ये मंगोलियाच्या संरक्षणाचाही विचार आहे. त्यामुळे चीनची याबाबतची स्वप्ने नक्की विरली असणार.

सोव्हिएत रशियाने आपले प्रतिनिधी शेलिपिन यांना उत्तर व्हिएतनाममध्ये शांततेच्या वाटाघाटीसाठी चीनच्या इच्छेविरुद्ध पाठवून चीनला आणखी एक धक्का दिलेला आहे. या सर्व घटनांमुळे आशियन राजकारणात चीनच्या मर्जीविरुद्ध सोव्हिएत रशियाची बरीच प्रतिष्ठा वाढली आहे आणि चीनला मात्र बऱ्याच ठिकाणी माघार घ्यावी लागली आहे. केवळ रशियाच्याच बाबतीत नव्हे तर इतरही ठिकाणी गेल्या काही महिन्यांत चीनला काही बरे दिवस नव्हते असे दिसते.

[पृष्ठ ६७ पहा]

# विचार धारे

समीर

**• चित्रपट-टेलिव्हिजनचा समसमा संयोग**

चित्रपट तयार करताना निरनिराळे प्रयोग करून पाहायला काहीच हरकत नाही; उलट चित्रपटात जेवढी विविधता अधिक तेवढा तो अधिक चांगला, असे मत परवा पोलंडचे चित्रपट-तज्ज्ञ श्री. जर्जी टोएपलिट्झ यांनी दिल्लीत बोलताना प्रकट केले. पोलंडच्या 'फिल्म अँड थिएटर अॅकॅडमी' चे प्रमुख असलेले टोएप-लिट्झ 'चित्रपट-निर्मात्यांचे निर्माते' म्हणून ओळखले जातात व म्हणून पुण्याच्या 'फिल्म इन्स्टिटयूट' मधील होतकरू दिग्दर्शकांना व अभिनेत्यांना त्यांचे मार्गदर्शन लाभावे या हेतूने भारत सरकारने त्यांना काही दिवस इकडे बोलावले आहे.

पोलंडच्या चित्रपट-व्यवसायात नवीन काय असेल तर ते म्हणजे चित्रपट-निर्माते आता टेलिव्हिजनसाठी चित्रपट काढू लागले आहेत. "एके काळी टेलिव्हिजन ही मंत्र्यांच्या मुलांच्या चैनीची बाब होती, पण आता पोलंडमध्ये २० लाख टी. व्ही. सेट असून दर संध्याकाळी सुमारे एक कोटी लोक टी. व्ही. पाहतात. टेलिव्हिजनमुळे चित्रपट अधिक मजेदार निघू लागले आहेत. माझ्या मते टेलिव्हिजन हे सिनेमाला वरदान आहे आणि मी असे भाकित करतो की हिंदुस्थानात टी. व्ही. लोकप्रिय झाला म्हणजे भारतीय चित्रटांचा दर्जा खूपच सुधारेल."

चित्रपटात कलेचा आविष्कार इटलीत जेवढा पाहायला मिळतो तेवढा अन्यत्र कोठेही दिसत नाही. काही वर्षांपूर्वी फ्रान्सने या दिशेने चांगली प्रगती केली होती, पण आता तेथे पडता काळ आलेला दिसतो.

चित्रपट 'सेक्स' शिवाय राहू शकत नाही; आणि ते स्वाभाविकच आहे, कारण गेली कित्येक शतके कलेने आपल्या आविष्कारासाठी सेक्सचा विषय वापरला आहे. प्रश्न आहे तो म्हणजे चित्रपटात सेक्स कसा वापरला जातो- हीन आणि रानटी पद्धतीने, की चांगल्या रीतीने! " पण मला वाटते की पडद्यावर हाणा-मारी व रक्तपात दाखविणे हे सेक्स दाखविण्यापेक्षा अधिक हानिकारक आहे. विशेषतः, पात्रे विकृत मनाच्या समाधानासाठी रक्तपात किंवा हिंसा करताना दाखविणे हे तर निश्चितच अधिक वाईट आहे. तो रक्तपात एक प्रतिकार म्हणून-उदाहरणार्थ, युद्धात-दाखविला जातो तेव्हाची गोष्ट वेगळी.

भारतीय चित्रपटांबद्दल काय मत आहे? – थोडेसे चित्रपट पाहिले आहेत, विमल रॉय, राज कपूर, के. ए. अब्बास आणि सत्यजित रे यांचे. रे यांचे चित्र-पट तंत्र आणि अभिनय यांच्या बाबतीत युरोपीय कल्पनेशी खूप मिळते वाटतात. आता एक यक्षप्रश्न : भारतीय चित्रपटांत चुंबन दाखवावे की नाही? उत्तर : का

नाही ? जपानमध्ये चित्रपटात चुंबन दाखविण्यावरचा निर्बंध १९४८ मध्ये उठविण्यात आला, पण त्यामुळे काही " अनर्थ " घडून आलेला नाही !

## ● शुश्रुषेचे शिक्षण

नर्सिंगचा व्यवसाय करू इच्छिणाऱ्यांची शैक्षणिक पातळी सध्या आहे, त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक आहे; कारण रोग्यांचीही शैक्षणिक पातळी वाढत आहे, आणि रोगप्रतिबंधक स्वास्थ्यविषयक शिक्षण देणे हे औषधोपचार करण्यापेक्षा अधिक स्वस्त ठरू लागले आहे, असा अभिप्राय नर्सिंगच्या शिक्षणावरील आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी भारताला आलेल्या कु. इन्ग्रिड हॅमलिन यांनी काही दिवसांपूर्वी दिल्लीत बोलताना दिला. कु. हॅमलिन् या फिनिश नागरिक असून 'इंटर नॅशनल कौन्सिल ऑफ नर्सेस' या संस्थेच्या शिक्षण–निर्देशिका आहेत.

त्यांच्या मते रोगाचे सामाजिक अंग समजावून घ्यायचे असेल तर नर्सिंगचे शिक्षण मानसशास्त्र, आहारशास्त्र व समाजशास्त्र यांना अनुसरून झाले पाहिजे. आजच्या बदलत्या काळात परिचारिका प्रगतिमान समाजाची गरज किती चांगली भागवू शकतात यावर त्यांचा व त्यांच्या व्यवसायाचा दर्जा अवलंबून राहील. शुश्रुषातंत्राला जर आजच्या समाजात महत्त्वाचे स्थान प्राप्त करून द्यायचे असेल तर आधुनिक उपचार–पद्धतीला हवी असणारी तज्ज्ञ शुश्रूषा देऊ शकणाऱ्या परिचारिका तयार झाल्या पाहिजेत.

परिचारिका म्हणजे रोग्याला बरे करणारी देवता असे समजण्याचा काळ केव्हाच गेला. आता परिचारिकांना कामचलाऊ साधनांनी वेळ भागवावी लागते, आणि त्यामुळे अपुरी साधने व अयोग्य वातावरण यांना कंटाळून चांगल्या परिचारिका व्यवसाय सोडून जातात. म्हणून हल्लीच्या गरजा लक्षात घेऊन व त्यांना अनुसरून नर्सिंगचे शिक्षण व व्यवसाय यांच्यासंबंधी कायदे घडविण्याची आता आवश्यकता आहे.

## ● मुलांनी काय वाचावे ?

या प्रश्नाचे उत्तर सुप्रसिद्ध अमेरिकन बाल वाङमय–लेखिका एलिझाबेथ हॉजिस यांनी परवा दिल्लीत निःसंदिग्ध शब्दांत दिले. लोक–वाङमयाने ओतप्रोत भरलेल्या परिकथा व इतर अशाच कथांनी लहान मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते, त्यामुळे असले वाङमय मुलांनी अवश्य वाचले पाहिजे. साहित्य, इतिहास, कला, संगीत अशा निरनिराळ्या विषयांच्या पुस्तकांतून निवड करण्याची संधी मुलांना मिळाली पाहिजे. पण हे विषय त्यांना आवडतील अशा रीतीने हाताळले गेले पाहिजेत.

मुलांना 'कॉमिक्स' मुळीच देऊ नयेत ! काही कॉमिक्स अपायकारक नसतात खरी, पण काही चांगलीच हानिकारक असतात. ती वाचून मुले दुष्ट स्वभावाची होतात. मुलांच्या मनात योग्य पुस्तकांची आवड मुद्दाम उत्पन्न केली पाहिजे. रसाळ पुस्तके खूप मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून कॉमिक्सचे वेड हळू हळू आणि कौशल्याने नष्ट केले पाहिजे.

● ● ●

# ३ माकडांची कथा...

माझ्या अभ्यासिकेत
टेबलावरती,
कोन साधून ठेवला होता
एक सुबकसा 'शो-पीस'.
तीन माकडे बसली होती
एकाच रांगेत
एकमेकांना चिकटून.

तिघांच्या होत्या तीन तऱ्हा.
एकाने घेतले होते
डोळे झाकून
आपल्याच दोनी हातांनी;
दुसरे बसले होते
दोन हात दोन कानांवर ठेवून;
तिसऱ्याने ठेवले होते
तोंडावर हात....

ती तिघे
माझ्यापुढे बसून
सतत मला संदेश देत
व्यवहारी जगाचा !
सभ्य संस्कृतीचा ! !
सुसंस्कृतपणाचा ! ! !

—आणि एक दिवस
अचानकच नाहीशी झाली
टेबलावरून तिन्ही माकडे . . .
मनात म्हटले, गेली असतील
बाहेर भटकायला, जग बघायला,
बसून बसून कंटाळली असतील
किवडेपणाला, आंधळेपणाला, मुकेपणाला
मनात मात्र दिवसभर होती एकच चिंता
कुठे असतील, कशी वागतील,
काय बरे करीत असतील ?

—त्याच चिंतेत झोपी गेलो
आणि स्वप्नात दिसली
तीच तीन माकडे . . .
बसली होती एकाच रांगेत
हसत, खिदळत, गप्पा मारत. . . .

पहिले माकड पहात होते
हातातल्या दुर्बिणीतून
दूर दूरचे नवे नवे जग,
दुसऱ्याने होते कान टवकारलेले
लक्ष देऊन ऐकत होते
रेडियोतले सिनेसंगीत. . . .
तिसऱ्याच्या हातात होता
एक भला मोट्ठा कर्णा
ओरडून ओरडून ते सांगत होते
आजपर्यंतचे मनात साठवलेले. . . .

ती तिघं मला देत होती
संदेश नव्या-सभ्यतेचा
नव-संस्कृतीचा नव-व्यवहाराचा ! !

१ फेब्रुवारी १९६६ मधुसूदन गोखले

# भाऊ अब्दुलरहमान

लेखक : श्री. अमरलाल हिंङोराणी
अनुवाद : लछमन हर्दवाणी ' विवश '

त्याचं नाव अब्दुलरहमान, परंतु काही लोक त्याला ' मस्त ' म्हणत असत तर काही लोक त्याला ' दरवेश ' म्हणत! परंतु तो मात्र स्वतःला ' भाऊ अब्दुलरहमान ' म्हणवत असे आणि त्याच नावाने संबोधून तो स्वतःशीच मोठ्यानं बोलायचा. वास्तविक, स्वतःशी बोलण्याची त्याची सवयच होती. कदाचित् तो आपल्या मनात डोकावून आपल्या आत्म्याशी तादात्म्य पावून मग्न होत असावा. कुणी त्याला विचारलं– " भाऊ अब्दुलरहमान, भाकरी खाशील काय ? " तेव्हा तो प्रथम स्वतःला विचारीत असायचा, " भाऊ अब्दुलरहमान, हा विचारतोय् भाकरी खाशील का ? " मग तो स्वतःलाच उत्तर द्यायचा, " आपल्याला जगण्यासाठीच अन्न खावं लागतं ना ? पण काय रे, जीवन फक्त पोट भरण्यासाठीच आहे का ? " अशा प्रकारे तो आजूबाजूच्या लोकांना ऐकू जाईल अशा रीतीने बोलायचा. वास्तविक, तो अगदी सडाफटिंग माणूस होता. दिसायला अगदी खप्पड शरीराचा. इतरांच्या मानाने खूप उंच होता. पिंजारलेली दाढी, विस्कटलेले केस, अशा अवतारात अंगावर एक गोधडी लपेटून तो हिंडत असायचा.

तो नेहमी आपल्याच धुंदीत असायचा. कधी तो एखाद्या मशिदीत दिसायचा, तर कधी मंदिरात. सक्कर शहराच्या बंदराजवळ एक मोठा रस्ता आहे. त्याला लागूनच रेल्वेचा मालधक्का आहे. त्याच्या आसपास बरीच दुकाने आहेत. त्या वेळी तेथे सिंधीचे एक प्रसिद्ध कवी ' सामीं ' चे श्लोक म्हटले जात असत. भाऊ अब्दुलरहमानही बहुधा दर संध्याकाळी तेथे जाऊन एकाग्रचित्ताने श्लोक ऐकायचा, आनंद लुटायचा. कधीकधी तो स्वतःशीच वडबडत म्हणायचा, " भाऊ अब्दुलरहमान, समजतंय् की नाही तुला ? अरे शहाण्या, डोळे उघड. कळवून घेण्याचा प्रयत्न कर. तू अगदी नाठाळ आहेस बघ. तुझे डोळे केव्हा उघडतील कोण जाणे ! "

एके दिवशी रस्त्याने जात असताना तो एका दगडाला ठेच लागून पडला, उठून स्वतःशीच म्हणाला, " भाऊ अब्दुलरहमान, अरे, काय हा दंभ तुझा ! तुझे डोळे आहेत आकाशात. अरे, समोर पाहून चल. डोळे उघडून चालला असतास, तर ठेच लागली नसती. " मग तो तेथेच बसून राहिला. निमिषमात्र विचार करून

म्हणाला, " भाऊ अब्दुलरहमान, किती रे स्वार्थी आहेस तू. हा दगड भररस्त्यात पडलेला आहे. तो बाजूला न फेकता तसंच निघून जाणं तुला शोभेल काय ? अरे, दुसरा वाटसरू ठेच लागून पडला तर ?" मग तो पुन्हा विचार करून अंमळशाने म्हणाला, " भाऊ, तू जर चांगला असशील, तर तो दगड बाजूला फेकून दे. " असे म्हणत त्याने दगड उचलून रस्त्याच्या एका बाजूला फेकून दिला.

भाऊ अब्दुलरहमान हा फारसी भाषेचा कवीदेखील होता. उर्दू भाषाही त्याला अवगत होती. शिवाय संस्कृत, सिंधी व हिंदी भाषा त्याला येत असत. पंजाबहून आलेली उर्दू पत्रे कधीकधी लोक त्याच्याकडून वाचून घेत असत. ' शाह ', ' सामी ', ' सचल ' या महान् सिंधी कवींचा तो भक्त होता. त्यांच्या काव्याचा त्याचा अभ्यास फार दांडगा होता. सर्वांचे काव्य त्याला मुखोद्गत होते. ' सचल ' कवीचा तर तो अनुयायी होता. स्वभावाने तो अतिशय शांत होता. कुणाशीही तो जास्त बोलत नसे. भाकरीच्या एका तुकड्यावर तो समाधान मानून घ्यायचा. त्या व्यतिरिक्त कसलीही इच्छाआकांक्षा त्याच्या मनात नव्हती. गोधडी मात्र तो नेहमी अंगावर

## भाऊ अब्दुलरहमाननं आपल्यातल्या भाऊ अब्दुलरहमानशी प्रतारणा कधीच केली नाही—

घ्यायचा. मग हिवाळा असो वा उन्हाळा असो. रात्री गोधडी लपेटून तो डाराडूर निजायचा.

एके दिवशी एक माणूस विलक्षण संकटात सापडला. त्याच्याजवळून चोरीचे सोन्याचे घड्याळ सापडल्याचा त्याच्यावर आरोप होता. पोलिसांनी त्याची झडती घेतली होती. प्रत्यक्ष साक्षीदारांच्यादेखतच त्याच्याजवळ ते घड्याळ सापडले होते. ते घड्याळ एका मुसलमान शेटजीचे होते. एका महिन्यापूर्वीच फिर्याद दाखल केली गेली होती. बचावाच्या बाजूने त्या आरोपीचे म्हणणे असे होते की तो एके दिवशी शेटजीच्या घराजवळून गेला असता शेटजीला संशय आला, की त्याने त्याच्या पत्नीला काहीतरी खुणावले होते. त्याला अडवून शेटजीने त्यास खूप बडवले होते. अब्दुलरहमान जर मध्ये पडला नसता तर त्या शेटजीने त्याचा मुडदाच पाडला असता. पण अब्दुलरहमानने मध्यस्थी केली म्हणून का शेटजी गप्प राहणार होता ? तो म्हणाला, " साला आमच्या औरतांना इशारा करतोय, वाईट नजरेने पाहतोय. आम्ही अब्रूदार माणसं आहोत म्हटलं. " अब्दुलरहमानने शेटजीला समजावून सांगण्याचा खूप प्रयत्न केला होता. पण शेटजी कशाला त्याची पर्वा करतो ? तेव्हा भाऊ अब्दुलरहमान स्वतःला उद्देशून मोठ्याने म्हणाला, " भाऊ

अब्दुलरहमान, हा नाठाळ काही ऐकणार नाही. त्याला तर आपल्या इज्जतीची काळजी वाटते. आणि बरं का रे, त्याची पस्तीस वर्षांची बहीण घरी बसली आहे, पण अजूनही तिचं लग्न जमवलं नाही त्यानं. कारण माहीत आहे का ? अरे, तिचं लग्न झाल्यावर तिनं मिळकतीची मागणी केली असती. तेव्हा शेटजींनं विचार केला की, हिला नवराच मिळू दिला नाही म्हणजे......" असे म्हणून तो थांबला. मग पुन्हा स्वतःशीच म्हणाला-- " अरे शहाण्या, कशाला तू कुणाच्या उखाळ्या-पाखाळ्या काढतोस ? त्यापेक्षा पुन्हा शेटजींना हात जोडून सांगण्याचा प्रयत्न कर. तरीदेखील तो मार्गावर आला नाही, तर मग मात्र सत्य असेल ते सांगून टाक ... " अब्दुलरहमानचे बोलणे शेटजीने ऐकले. सर्वांनी ऐकले होते. शेटजी खूप खजील झाला होता. त्या वेळेस तो गप्प झाला होता. अशा तऱ्हेने त्या गरिबाचे प्राण वाचले होते. शेटजीची बदनामी करण्याचा अब्दुलरहमानचा हेतू मुळीच नव्हता. परंतु, त्या घटनेनंतर शेटजीची गावभर बदनामी झाली होती खरी

हेच आरोपीचे म्हणणे होते. त्या ठिकाणी उपस्थित असलेले लोकही कोर्टात साक्षीसाठी बोलावण्यात आलेले होते. परंतु शेटजी कोर्टात आल्यावर आरोपीचे म्हणणे तो मान्य करायला तयार होईना. म्हणे, हे सर्व खोटे आहे. आरोपीच्यातर्फे त्याच्या शेजारी राहणाऱ्या तीन लोकांची साक्ष होणार होती. चवथा साक्षीदार होता भाऊ अब्दुलरहमान.

खटला सुरू झाला. अनेकांच्या साक्षी झाल्या. पण कोर्टाचे काम पुढे चालू शकले नाही. कारण, आरोपीच्या दोन साक्षीदारांना शेटजीने लाच देऊन आपल्या बाजूने केले होते. एक साक्षीदार एका सुनावणीच्या वेळेस काही येऊ शकला नाही. लगेच त्याच्यावर वॉरंट काढण्यात आले. परंतु, शेटजीही बिलंदर होता. त्या साक्षीदाराला शेटजीने खूप दम भरला; " काहीही विचारल्यावर 'मला काहीएक माहीत नाही' म्हणून सांग. नाहीतर याद राख. " अशा रीतीने तिसऱ्या साक्षीदारानेही आपली बाजू काढून घेतली. शेवटी राहिला भाऊ अब्दुलरहमान. आरोपीचा वकील असल्या प्रकारच्या साक्षीदारावर भरंवसा ठेवायला तयार होईना; परंतु भाऊ अब्दुलरहमानवर आरोपीचा पूर्ण विश्वास होता. त्याला खात्री होती की, हा परमेश्वराचा भक्त अन्यायाची बाजू घेणार नाही.

भाऊ अब्दुलरहमानला कोर्टाकडून बोलावणे आले. तो स्वतःला म्हणाला, " भाऊ अब्दुलरहमान, कोर्टाकडून बोलावणं आलं आहे. आता अदबीनं जायला पाहिजे, नाही का ? " चपला पायात घालून, गोधडी लपेटून तो कोर्टाच्या दाराशी आला. पण दारावरच्या शिपायाने त्याला अडवले व सांगितले " चपला बाहेर ठेवून आत जावं लागेल. " तो स्वतःला म्हणाला – " भाऊ अब्दुलरहमान, हा म्हणतोय् चपला बाहेर काढून ठेव. पण त्याला म्हणावं कोर्टासाठीच तर ह्या चपला आणल्या आहेत. " असे म्हणत तो सरळ आत शिरला. त्याचा अवतार बघून मॅजिस्ट्रेटला

हसू फुटले. तो पिंजऱ्यात उभा राहिल्यावर मॅजिस्ट्रेटने त्याला कडव्या स्वरांत विचारले – " खांद्यावर ही गोधडी लपेटून का आलास कोर्टात ? "

भाऊ अब्दुलरहमान स्वतःला म्हणाला, " भाऊ अब्दुलरहमान, मॅजिस्ट्रेटसाहेब विचारताहेत की, कोर्टात ही गोधडी लपेटून का आला आहेस ? भाऊ, लक्षात ठेव. तू कोर्टात आला आहेस. पूर्ण विचार करूनच नीट उत्तरं दे. साहेबांना म्हणावं, 'साहेब, हिंदू लोक कोर्टात जाताना आपल्या खांद्यावर एखादं वस्त्र किंवा उपरणं ठेवून जातात आणि मानानं, आदरानं आपलं म्हणणं सांगतात. मग मीही कोर्टाचा मान राखायला नको का ? ' " आणि मग कोर्टाला उद्देशून त्याने ते सर्व सांगून टाकले. उत्तर ऐकून सर्व लोक स्तंभित झाले.

मग शिरस्तेदाराने त्याला सांगितले, " म्हणा, ईश्वरसाक्ष खरं सांगेन, खोटं सांगणार नाही...... "

त्यावर तो स्वतःला म्हणाला, " भाऊ अब्दुलरहमान, हा म्हणतोय की ' म्हणा, ईश्वरसाक्ष खरं सांगेन, खोटं सांगणार नाही. ' शिरस्तेदार योग्यच बोलतो आहे. " मग त्याने शिरस्तेदाराला उद्देशून सांगितले, " ईश्वरसाक्ष खरं सांगेन, खोटं सांगणार नाही. "

शिरस्तेदाराने विचारले – " तुझं नाव ? "

तो स्वतःला म्हणाला – " भाऊ अब्दुलरहमान, शिरस्तेदार तुझं नाव विचारतो आहे. त्याला म्हणावं, ' भाऊ अब्दुलरहमान ' " मग त्याने शिरस्तेदाराला उत्तर दिले, " भाऊ अब्दुलरहमान. "

कोर्टात मोठा हशा पिकला. मॅजिस्ट्रेटही सुरुवातीला हसले; पण मग ते वैतागले. एका वकिलाने उठून भाऊ अब्दुलरहमानच्या स्वतःशी बोलण्याच्या सवयीबद्दल सांगितले.

मग शिरस्तेदाराने दुसरा प्रश्न केला, " तुझा धर्म ? "

तो स्वतःला म्हणाला, " भाऊ अब्दुलरहमान, शिरस्तेदार माझा धर्म विचारतो आहे. पण लक्षात ठेव, तू खरं बोलण्याची शपथ घेतली आहेस. खोटं सांगू नकोस. प्रश्न कठीण आहे खरा. कारण मी जर का त्यांना मुसलमान असल्याचं सांगितलं तर हिंदूंच्या भावना नाही का दुखावल्या जाणार ? आणि जर मी हिंदू असल्याचं सांगितलं तर मुसलमानांना वाईट नाही का वाटणार ? म्हणून तू सत्य असेल तेच सांग. अरे, असा गांगरतोस का ? ' सचल ' कवीची ती कविता आठवते ना तुला ? तीच म्हण की —

' हिंदू मोमन न आहियाँ,
जोई आहियाँ सोई आहियाँ । ...... '

[ मी हिंदू वा मुसलमान नाही. मी आहे हा असा आहे. ] "

शिरस्तेदाराला काहीच उमगलं नाही. वैतागलेल्या नजरेने तो मॅजिस्ट्रेटच्या

चेहऱ्याकडे पाहू लागला. मॅजिस्ट्रेटने शिरस्तेदाराला सांगितले, " लिहा, त्याची जात मुसलमान ! "

शिरस्तेदाराने तसे लिहून मग भाऊ अब्दुलरहमानला विचारले, " तुझं वय काय ? "

तो स्वतःला म्हणाला, " भाऊ अब्दुलरहमान, शिरस्तेदार तुझं वय विचारतो आहे. पण कायरे, मघाशी प्रश्नाचं उत्तर देताना मी म्हटलं, ' मी मुसलमान नाही. ' तरीदेखील मॅजिस्ट्रेटसाहेबांनी चक्क मुसलमान म्हणून लिहायला सांगितलं. म्हणून भाऊ, तू शिरस्तेदाराला सांग की, माझं वयदेखील मॅजिस्ट्रेटसाहेबांना विचार की ! "

झालं. मॅजिस्ट्रेटच्या अंगाचा तिळपापड झाला. भाऊ अब्दुलरहमानला दम भरून करड्या स्वरांत ते म्हणाले, " ' जटु ', नीट उत्तरं दे. कोर्टात उभा आहेस, बाजारात नव्हे ! "

भाऊ अब्दुलरहमान स्मित करून स्वतःला म्हणाला, " भाऊ, मॅजिस्ट्रेटसाहेब म्हणताहेत, ' जट, नीट उत्तरं दे. ' पण भाऊ, मॅजिस्ट्रेटसाहेबांना विचार ' जटु ' कोणाला म्हणतात ? ...... "

तेवढ्यात मॅजिस्ट्रेटने सांगितले – " निरक्षर माणसाला ' जटु ' म्हणतात. "

यावर भाऊ अब्दुलरहमान स्वतःला म्हणाला, " भाऊ, मग तू ' जटु ' नाहीस. कारण तुला तर सिंधी, संस्कृत, हिंदी, फारसी व उर्दू भाषा येतात. मग तू ' जटु ' कसा असू शकणार ! भाऊ, आता तू मॅजिस्ट्रेटसाहेबांना विचार, तुम्हांला किती भाषा येतात ? "

मॅजिस्ट्रेटने आपली चूक सुधारून पुन्हा म्हटले, " ज्याला इंग्रजी येत नाही तो ' जटु ' समजावा.' "

यावर भाऊ अब्दुलरहमान स्वतःला साळसूदपणे म्हणाला, " भाऊ अब्दुलरहमान, मॅजिस्ट्रेटसाहेब म्हणताहेत की, ज्याला इंग्रजी येत नाही त्याला ' जटु ' समजावा. आता मॅजिस्ट्रेटसाहेबांना विचार, तुमच्या वडिलांना इंग्रजी येत होती का ? तुमचे आजोबा इंग्रजी शिकले होते का ? नाही. तुमच्या वाडवडिलांना इंग्रजी मुळीच अवगत नव्हती. म्हणजे ते सर्व झाले ' जटु ' आणि तुम्ही त्या ' जटु 'चेच मुलगे झालात की ! "

मग काय विचारता ? मॅजिस्ट्रेटचा चेहरा रागाने लालबुंद झाला. डोळे वटारून ते म्हणाले, " तू कोर्टाचा अपमान केला आहेस. आता तुझ्यावरच खटला भरला पाहिजे. पाचकळपणा पुरे आता. जे काही तुला सांगायचं असेल, ते एका कागदावर लिहून दे. "

काहीच न बोलता भाऊ अब्दुलरहमानने कागदावर खालीलप्रमाणे मजकूर लिहिला –

" सन्माननीय मॅजिस्ट्रेटसाहेब,

भाऊ अब्दुलरहमाननं कोर्टाचा अपमान केलेला नाही. पण मला वाटतं आपणच कोर्टाचा अपमान केला आहे. आज तुम्ही इतर साक्षीदारांनाही शिव्या दिल्या आहेत. मला शिव्यांची मुळीच पर्वा नाही. साहेब, खऱ्या अर्थाने तुम्ही जनतेचे अधिकारी नसून सेवक आहात. कुणावर अन्याय होणार नाही, असाच निर्णय तुम्ही दिला पाहिजे. आम्ही साक्षीदार लोक स्वतःहून काही कोर्टात आलेलो नाही. आपणच आम्हांला बोलावलंत ते आमचा अपमान करण्यासाठीच का? अहो, असंच जर नेहमी घडत राहिलं, तर कोण तुमच्या कोर्टात साक्ष द्यायला येईल? तुम्ही साक्षीदारांचा अपमान केला, खुर्चीचा अपमान केला, मग तुम्हांलाच बडतर्फ का करू नये? भाऊ अब्दुलरहमाननं सुरुवातीला शपथ घेतली आहे, 'ईश्वरसाक्ष खरं सांगेन, खोटं सांगणार नाही ......' साहेब, क्षमा करा मला, परंतु मी खरं तेच सांगितलं आहे."

एवढं लिहिल्यावर त्याने आपले डोळे वर उचलून निमिषमात्र मॅजिस्ट्रेटकडे पाहिले आणि मग त्याने त्या कागदावर आपली सही खरडली : 'भाऊ अब्दुल-रहमान.'

● ● ●




साठे

ऑरेंज बिस्किटें
✱ संत्र्याचा मधुर स्वाद
आणि
✱ पौष्टिक

साठे बिस्किट अँण्ड चॉकोलेट कं. लि., पुणे-२
243 MAR

# बाजार

## राम भिवरे

दुष्काळ हा मानदेशाच्या पाचवीला पुजलेला. आठ महिने उन्हाचा मारा खात पालथी पडलेली माळरानं आणि धुरळ्यानं माखलेल्या वाटा भर उन्हाचं कचाकचा चालून तोंडाला फेस आला तरी पाणी मिळायचं नाही, की गार सावली भेटायची नाही. असलीच तर बाभळीची फाटकी सावली, नाहीतर कर्डुलिबाचा डोलारा. याबाबतीत मात्र सुकाळ. त्यात बाभळीच भरगच्च त्यामुळं एखादा दमलाभागलेला जीव चार पावलाच्या गावी बाजारला निघाला की, विसावा म्हणून बाभळीखाली बसतो. काटेकुटे बाजूला सारून तंबाखूचा बार भरला मी पुन्हा झपाटा मारतो. आठवड्यातून येणारा बाजार हे एकमेव करमणुकीचं दैवत. त्यामुळं वारीच्या नेमानं तो बाजारला येतो. मग पावसाळा असो की उन्हाळा. उन्हाळ्यात जीव मात्र तिरीमिरीला येतो. अगदी झेंडू फुटायची पाळी येते. वाताड रानं तुडवून जीव कासावीस होतो, घसा खडखडीत होतो, तोंडाच्या कोरा वाळलेल्या थुंकीनं पांढऱ्याफटक पडतात. तापलेलं मस्तक, शोष पडलेली आतडी न होरपळलेले पाय यांना गारवा देण्यासाठी हॉटेलातलं गरम पाणी कथलाच्या ग्लासानं ढसाढसा पितो. पोटात ढवळतं. कधी कधी उलटी होते अन् मग डॉक्टरची बिलं तुंबवितो. तरीपण बाजारला येतोच. बाजार हे त्याचं सर्वस्व.

या बाजारात त्याला सौदा करायचा असतोच असं नाही. करायचा असला तर काय दात पाडून द्यायचे ? पैशाची अन् त्याची महिना महिना गाठ पडत नाही. पण विनापैशाचा सौदा मात्र अखंड चालू असतो. कुणी देत असतो कुणी घेत असतो तर कुणी बदलाबदल करत असतो. आमच्या मानदेशाचं ' श्यारगाव ' म्हणजे बाजारगाव. गावाशेजारच्या वाडीचे लोक आमच्याकडे शहरातले म्हणून पाहतात. या शहरातल्या माणसाला कायदा, कोर्टकचेऱ्या सारं माहीत. असा एखादा माहितगार पुढं तालुक्याचा धनी बनतो.

आमच्या लहानपणी आबा कासार गावचा पुढारी. सारी बुकं त्याच्या डोक्यात. हात भलेमोठे लांब. पार तालुक्याला मामलेदारापर्यंत पोहोचायचे. मनाला येईल त्याला सोडवायचा, मनाला येईल त्याला अडकवायचा. हात जसा लांब तसाच ढिला. कुणाचं अडलं तर दहापाच हातावर ठेवून चालू करायचा.

एकादा सकाळी तालुक्याला बाजाराला गेला. तिथं बाचाबाची झाली आणि काय ? संध्याकाळी स्वतःच्याच गावाला बाजारची परवानगी घेऊन आला. मला आठवतं. चैताचा, सनाच्या अगोदरचा बाजार. शुक्रवार बाजारचा दिवस ठरला. आबानं दवंडी देवविली. दवंडी पिटवून आला आणि सकाळपासून लोक उद्योगाला बसले. वेशीबाहेर जागा ठरली. गड्यागाड्यांनी पाणी आणलं. धुरळा खाली बसवला. वेशीला खुंट लावले. शिंगाड्यानं बेंबीच्या देठापासून शिंग फुंकलं आणि ताशा तडाडला. परगावच्या गाड्यागठोड्यांना गाव सामोरं झाला. गावाला नवा मोहरा आला, नवा चेहरा आला. रात्रीला संगीत–बारीचा कार्यक्रम झाला. सारा गाव हुरळून गेला. आमचं गाव बडं झालं. ' श्यारगाव ' बनलं.

एक पिढी लोटली. खतपाण्यावर पिकं बळावावी तसा बाजार बळावला. आजतागायत त्याच जोमानं भरतो. आज गाव बराच सुधारला आहे. गावात कौलारू शाळा डौलानं खडी आहे–लाल लाल जीभ दाखवीत. वरच्या बाजूला पांढराफेक दवाखाना आहे. गावावर टोपी असावी तसा. चुकून एखादी मोटार गावी आली तर पोरं तिच्या मागं पळायची; पण आता एस्. टी. सुरू झाली. शाळेतल्या पोरांना

## माणूस हा माणसातच हरवतो
## आणि माणसातच सापडतो

मोटारीचं नवल नाही. त्यांचे डोळे वर आकाशात लागलेले आहेत–रॉकेटकडे. आठवड्याला एखादी टोपी गावाला फिरकते. पण या साऱ्यांत बाजार बदलला का ? नुसता फुगलाच. बाजार आहे तिथंच आहे. कारण तो काळजातल्या जिवणीला भिडला आहे. व्यापारी बाजाराला हजाराची उलाढाल करतो, तालुक्याहून गारीगारवाला येतो, खेळण्याचं दुकान येतं, कापसाचे सौद्यावर सौदे उठतात, पण बाजाराला त्याचं काय ! तो चाललेला असतो आपल्याच ढंगानं.

नुसत्या आण्या–पावलींच्या देण्याघेण्यानं बाजार बदलला असता. बाजारला मात्र तो व्यवहार करायचा नसतो. पैशापेक्षा जरा वेगळी उलाढाल तिथं चाललेली असते की, जे न देता घेतलं जातं व न घेता दिलं जातं. तसा नुसत्या आण्याचवलीचा देण्याघेण्याचा व्यवहार असता तर बालवाडीहून येणारा नामा आलाच नसता. कारण, देण्याघेण्याशी त्याचं फारसं पटत नाही. जर काही घ्यायचं असलं तर खिसा काकू करत असतो. कारण, त्याला एका विडीपेक्षा जादा भार सहन होण्यासारखा नसतो. पण नामा येतो. मेव्हण्याचं पोरगं वेड्या पडलेलं होतं त्याचा काहीच निरोप नसतो; त्यामुळे आज मेव्हणा बाजारच्या टिपणाला येणारच. गाठभेट झाली की, खुशाली कळते.

हे नामाचं सारं. खरं पण गणा आलदराचं काम थोडं नाजूक आहे. पोरगी पदरकरीण झाली. आवंदा उजवायलाच हवी. गणा त्यातला लय अडगा. ना कुठं ओळख ना पाळख. जमायचं कसं ? पाचेगावानं येणारा त्याचा मामा या कामातला दर्दी. त्याचं बसणं–उठणंही तालेवारात. मामा बाजारात दिसला की, वखोटं धरून नुसता घरी आणायचा. मग ' ती ' सारं बघतीया. जर गणाला अंजू माळणीइतकं त्यातलं कसब असतं तर कवाच पोरीला त्यानं उजवली असती. अंजू मोठी बेरकी. इतकी म्हातारी. पण अडाखे न् तडाखे औरच. कधी पंढरीची वारी चुकली असेल, पण बाजार नाही. आता सारं खुल्लंखुल्ल. सांगायचं तर तिची नात जरा उजवी आहे. नातीचा भलताच अभिमान ! आजीच्या मागून बाजारातून फिरून आली तरी सांजला चुलीत मीठमिरच्या तडतडतात. चारचौघांच्या नजरेत पोरगी भरते. बातमी या पाहुण्याकडून त्या पाहुण्याकडं, त्या पाहुण्याकडून दुसऱ्याकडं अशी मारुतीगत उड्या मारीत जाते अन् अमनधपक्या वऱ्हाडातला पाहुणा मागणीला येतो. म्हातारीच्या अंगावर मांस चढतं. बाजारानं अंजू माळणीचा सौदा जमविलेला असतो.

पंढरपुराहून आलेला अडत्या बराच जड खिशाचा आहे. सटासटा सौद्यामागून सौदे घेतो. कापसाची बोंडे बघतो. अन् बोलतो. हजार, पाचशे ! बावा पाटलाची भागा मन कुठंतरी गुंतवायचं म्हणून टिपूस देऊन ऐकत आहे. पण त्याच्या मनात सारखी गोम वळवळत आहे. वाटंबराकडं त्याचं सारं ध्यान. बळीच्या पंखागत लखलखीत सदरा, तोंडात गरगरीत रंगलेला विडा, मलमली धोतर असा नवरदेवागत नटून तो बाजारला आला. नेहमीच येतो. हाताचा चाळा म्हणून तो कोसल्याचा शेमला मागंपुढं करतो. पण त्या शेमल्याची तगमग बाजारला अस्वस्थ करत नाही. तोही बाजाराकडं बेफिकिरीनं बघतो. त्याच्या मनोमन इतकं पटतंय की, वाटंबराच्या शकीच्या भेटीपेक्षा कुठलाही भारी सौदा या बाजारात होणार नाही. शकीची गाठ पडली की, वरच्या पांदीला दोघं गुल.

शकीचं हे इंगित रखमाला माहीत होतं. रखमानं मात्र आपला बेत आपल्या कानालाही कळू दिला नाही. शकीला तर नाहीच नाही. कारण तिच्या मनाला लागलेली अरण कोणीच जाणणारं नव्हतं. सासुरवासाच्या चरकात चेपून ती शाडवाटागत पांढरीफट पडली होती. आजपर्यंत तिच्या मनातच बेत उगवत होता अन् बिनपाण्यामुळं खुरटून जात होता. आज त्या बेताला वाट मिळाली. आत्या (सासू) अंथरुणाला खिळली अन् दादला खोंड घेऊन खरसुंडीला गेला. साऱ्या घरात ती एकटीच. आत्याला दवा आणायचा मोठा मतलब साधला. भरल्या बाजारात भाऊ दिसलारे दिसला की, त्याच्या गळा पडून रडणार होती......आणि काही झालं तरी परत फिरणार नव्हती. जात्यावरच्या ओव्यांत वेळोवेळी गाइल्या गेलेल्या बंधुरायाच्या हातालाच ती धरणार होती. काय चेष्टा आहे काय ! दहा वर्षं माहेर नाही म्हणजे काय ? असा करडक कसा दादा ? का वहिनीच्या सोब-

तीत सारे सगेसोयरे विसरून गेला ?...... रखमाच्या मनातला सौदा जमला होता. वेडा बाजार उन्हात चटचट करीत असतानाच रखमा हे सारं करून दाखविणार होती. पण बाजारला त्याचा पत्ता नव्हता. तो आपला स्वतःच्या डौलानं चालला होता. ना तो रखमाची दाद घेणार, ना पार्वतीची कैफियत ऐकणार ! त्याच्या कुठल्याच डोळ्यात कुणासाठी अश्रूंचा टिपूस नव्हता. त्याच्या एका डोळ्यात वस्तू होती, दुसऱ्या डोळ्यात व्यवहार होता. पार्वतीची भळभळती जखम त्याला दिसणार नाही. नुसत्या जन्मालाच कारण असलेला बाप, ऐतखाऊ भाऊ आणि नवऱ्याच्या संपत्तीवर गिधाडागत नजर ठेवून असलेली आई......छे, ही सारी माणसंच का ? कुठल्या मापानं मोजून यांना माणसं ठरवता येईल ? नवऱ्यानं तरी प्रत्येक वेळी यांना कोठून पैसा द्यायचा ! जरा काही गारीला कमी पडलं तर उठले माझे माहेर तोडायला. बस्स्. यापुढं काही झालं तरी माहेरचं नाव नाही. ते मला मेले नि मी त्यांना ! आज पांदी–पांदीनं तिनं पळायचं ठरवलं. एकदा का नाझऱ्याची शीव गाठली की, काळजी मिटली. सासरची चांगली दहापाच माणसं घेऊन नवरा बाजारला येणार आहे. मागच्या बाजारी तसा सांगावाच दिला होता तिनं. तिचा हात मंगळसूत्राशी चुळबूळ करू लागला. बाजार सौद्यात घासाघीस करू लागला.—

या साऱ्या प्रकाराचं पांडा गुरवाला मात्र हसू येत होतं. तसा सारा बाजार त्याला हसतो आणि तो साऱ्यांना. त्याच्या बुद्धिपर्यंत यातलं काहीच पोहोचत नाही. इतकं देण्याघेण्यासारखं काय असतं हेच त्याला समजत नाही. खरं तर एक वीतभरसुद्धा पोट नाही, पण त्यासाठी इतकी लटपट चालते की बस्स्. मनापासून सांगायचं तर त्याला हा संसाराचा तापच आवडत नाही. एकटा जीव सदाशिव. बाजार करायला त्याला ताप वाटत असला, तरी बाजार बघायला मात्र त्याला मनापासून आवडतं. म्हणूनच तो सहा वारी सहा गावचे बाजार करतो आणि शनिवारी मारुतीच्या नावावर विश्रांती घेतो. एकदाच गावातून पिठासाठी फेरी मारली की, आठवडाभर काळजी मिटली. उरलंच पीठ तर सोना परटिणीला दिलं की, हक्कानं केव्हाही भाकरी खाता येते. पांडाला कधी संसाराची उणीव भासली नाही. जगाचे संसार कोरड्या डोळ्यांनी पाहात पाहातच त्याने आपली संसाराची तहान मारली होती आणि हे पाहात पाहातच तो एके दिवशी पटकन निघून जाणार होता. तिथं कोणीच येणार नव्हतं. लोकांनी कधीमधी विचारलंच तर तो म्हणे, "मारुतीनं कंदी सोताचा परपंच केला ? रामाचाच करत राहिला जलमभर." हे जरी तो बोलत असे तरी वरवरचं. तसा तर तो समाजात चांगला रमायचा. चारपाच गावच्या माणसांजवळ रोजची एक भाकरी मागण्याइतपत तरी माणसाला तो लागून होता. या माणसांना भेटण्यासाठीच जणू तो सहा वारी सहा गावचे बाजार करी. या बाजारांच्या वारीमुळे तो पाच-सहा गावचा पोस्टमन बनला होता. कुणाला काही निरोप धाडायचा असला की, त्याने पांडाच्या घरचा उंबरठा शिवलाच. "पांडा,

मायला येवढा रुपया दे." "पांडा दादाला सुक्कीरवारला येऊन जा म्हणावं." "पांडा...(गळयातच रुतलेले शब्द)" कदाचित् या संसाराच्या धक्काबुक्कीमुळंच पांडा प्रपंचातून दूर ढकलला गेला असेल. ते काहीही असो, या प्रपंचाच्या बाजारात तो जो एकदा वाट चुकला तो चुकलाच. स्वत: चुकल्यामुळे इतर बऱ्याच जणांना त्यानं वाटा हुडकून दिल्या. बाजारातल्या एका बिनहिशेबी कोपऱ्यात बसून उगं एका एका शब्दांची देवाणघेवाण करायची म्हटलं तर कसा पाकोळीसारखा दिवस उडून जातो. या एकटया जिवाचं सारं सुख समाजातच कुठंतरी चुकलेलं आहे. पांडाला माहीत आहे बाजाराचा सौदा माळणीच्या टोपलीत नाही, वाण्याच्या तेलपिठात नाही. का, चाटयाच्या कापडात नाही. पांडाच्या समजेला जे उतरलं ते भागाच्या मात्र नाही. नवं इरकली मिळत नाही म्हणून नांदणं तोडणारी भागा पांडाला खुळी वाटली. पांडा तिच्या या गमतीदार हट्टाकडं मोठया विचित्र दृष्टीनं पाहात बसला. पांडानं बैठक मोडली तेव्हा बाजार रोडावला होता. आसपासच्या गावांच्या व वाडयांच्या वाटा कलकलत चालल्या होत्या दोरीनं खेचल्यागत. सारी धावत होती. इतक्या जिवांचा व्यवहार झाला, पण बाजारात कुणी काहीच ठेवलं नव्हतं. बाजारात थोडा वेळ सुन्नता टिकली नि कोठल्या तरी कोपऱ्यात गलका उसळला. तुणतुणं तणाणलं नि घुमकं घुमू लागली. होय! गीता जोगतीण साऱ्या बाजारातून नाचत-फिरत होती. तिच्या डोक्यावर तांबडया अलवणात गुंडाळलेला गोल गरगरीत जग होता नि तसंच गोल डेरेदार पोट आलं होतं. हाही जीवनाच्या बाजारात तिच्या वाटयाला आलेला सौदा होता. कितीजण तिच्या तारुण्याच्या भांडवलात भागीदार होते कुणास ठाऊक! पदरात पडलेलं मात्र तिनं पवित्र करून घेऊन मोठया निष्ठेनं जोपासलं आहे. तशा अवघडलेल्या स्थितीतही ती अंग हलवीत नाचत होती. जीवनाचं कुठलं तत्त्व आनंदानं बहरलेल्या वृत्तीतून प्रकट होत होतं हे मला माहीत नाही; पण सामान्यांच्या जवळच जीविताबद्दलचं विशेष जतन केलेलं असतं हे मात्र मला समजून आलं. तिच्या अंगावर गर्भारपणाची दुधाळ कान्ती चढली होती; केळीच्या पानागत निहार असं हिरवं लुगड होतं नि कपाळावर लांबूनही उठून दिसावा असा लालभडक मळवट होता. बाजार ऐन भराला आला की, असाच दिसतो.

गीता गेली. बाजार कोरडा पडला. जे काही टाकाऊ होतं ते तिनं स्वीकारलं आणि सारं झाडून पुसून नेलं पिवळयाधमक किरणांच्या फेकीत सांडलेला उजेड सरला. कोलाहल ओसरला. सारं सुन्न नि ओकंओकं पडलं. काळया सावल्यांनी घरं केली. अंगातली हवा काढल्यागत मी सुन्न झालो, माणसं गेली ते मला चुकल्यासारखं झालं होतं. त्या वेळीही मी त्यांच्यात चुकून जात होतो. माणूस माणसांतच चुकतो नि माणसांतच सापडतो.

• • •



# नाझी

## भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

उत्तरार्ध

लेखांक : १८

२९ एप्रिलला दुपारी बर्लिनमधील चॅन्सेलरीत मुसोलिनी पकडला गेला व मारला गेला हे वृत्त फ्यूररच्या कानांवर गेले असले तरी मुसोलिनीच्या अंताची समग्र कथा किंवा त्याच्या प्रेताची झालेली विटंबना यांचा वृत्तांत फ्यूररला कळला नव्हता.

कदाचित कळला असला तरी त्यामुळे त्याचा निश्चय अधिकच पक्का झाला असेल की आपले मृतदेहदेखील कम्युनिस्टांच्या हाती लागू द्यावयाचे नाहीत ! त्याने तत्क्षणी स्वतःच्या मरणाची तयारी सुरू केली......

फ्यूररचा जिवलग अल्सेशियन कुत्रा ब्लाँडी व बंकरमधील आणखी दोन कुत्रे यांना तावडतोब विष घालण्यात आले. आपल्या दोन्ही स्त्री-चिटणिसांना बोलावून फ्यूररने त्यांना विषाच्या कुप्या दिल्या व जरूर पडल्यास आत्मघात करा, असे सांगितले.

आता संध्याकाळ झाली होती. हिटलरच्या आयुष्यातील ही अखेरची सायंकाळ होती! आपल्या स्त्री-चिटणिसांकरवी त्याने बंकरमधील सर्वांना सूचना पाठविली की, लवकर झोपून जाण्याची कुणी घाई करू नये. रात्र झाली, मध्यरात्र उलटली, तरी सर्वजण जागेच होते. ३० एप्रिल १९४५ हा दिवस सुरू झाला होता. पहाटेचे २-३० झाले होते.

या वेळी जेवणाच्या दालनात सुमारे वीस स्त्रिया जमा झाल्या होत्या. फ्यूरर आपल्या खोलीतून बाहेर आला व या स्त्री-समुदायात येऊन त्याने सर्व सेवक-स्त्रियांचा निरोप घेतला. प्रत्येकीशी हस्तांदोलन करून तो चार-दोन शब्द बोलत होता. सर्वांच्या डोळयांत पाणी तरारत होते व मने भारावलेली होती.

सकाळ झाली. बर्लिनचा बराच भाग रशियनांनी व्यापल्याचे वृत्त आले. दुपारी पोस्टडॅमप्लॅट्झ (Postdamplatz) मध्ये रशियन्स शिरले ...... याचा अर्थ चॅन्से-लरीपासून ते आता अगदी नजीक आलेले होते.

दुपारच्या जेवणाला इव्हा ब्राऊ आलीच नाही. आपल्या शाकाहारी स्वयंपाक्या-बरोबर व दोन्ही स्त्री-चिटणिसांबरोबर हिटलरने आपले अखेरचे जेवण उरकले. त्याचे जेवण सुरू असतानाच फ्यूररचा शोफर एरिच याला चॅन्सेलरीच्या बागेत २०० लिटर गॅसोलिन आणण्यास सांगण्यात आले. शोफरने कसेतरी १८० लिटर गॅसोलिन जमवले व ते बगिच्यात आणून ठेवले.

जेवण उरकताच हिटलरने इव्हा ब्राउसह जनरल क्रेबस्, जनरल बर्गहॉफ व डॉ. गोबेल्स यांचा निरोप घेतला. फ्राऊ गोबेल्स मात्र दालनाबाहेर आली नाही. आपल्या नवऱ्याबरोबर मरण्याचा तिचा निश्चय झाला होता. तिची सहा मुले खाली तळ-घरात खेळत होती. हेला (१२), हिल्डा (११), हेलमट (९), होल्डे (७), हेड्डा (५), हारडे (३) ...... ही त्यांची नावे. या सर्वांना विष घालून मारण्याच्या कल्पनेने मात्र ती गर्भगळित झालेली होती. एकान्तात बसून ती मनाची तयारी करीत होती.

**एकच आवाज !**

सर्वांचे निरोप घेऊन होताच हिटलर व इव्हा ब्राऊ ही दोघे आपल्या खोलीत गेली. बाहेर व्हरांड्यात डॉ. गोबेल्स, बोरमन व इतर काहीजण थांबले. काही क्षणांतच खोलीतून पिस्तुल उडवल्याचा आवाज आला. काही क्षण त्यांनी वाट पाहिली ...... कदाचित् दुसरा आवाज येईल; परंतु सारे शांत झाले होते. पुरेशी वाट पाहिल्यावर, डॉ. गोबेल्स व बोरमन यांनी खोलीत प्रवेश केला.

तिथल्या सोफ्यावर रक्ताच्या थारोळ्यात त्यांचा लाडका फ्यूरर निष्प्राण अव-स्थेत कोसळलेला होता. त्याने आपल्या तोंडात गोळी झाडून घेतली होती. त्याच्याच शेजारी इव्हा ब्राऊ मरून पडली होती. दोन रिव्हॉल्व्हर्स जमिनीवर पडलेली होती. मात्र इव्हा ब्राउने पिस्तुलाचा उपयोग केलेला नव्हता. तिने विषप्राशन केलेले होते.

या वेळी दुपारचे साडतीन झाले होते. सोमवार ३० एप्रिल १९४५! अॅडॉल्फ हिटलरच्या ५६ व्या वाढदिवसानंतर फक्त १० च दिवसांनी व जर्मनीचा चॅन्सेलर झाल्यापासून बारा वर्षे तीन महिन्यांनी तिसऱ्या राईशच्या जन्मदात्याने या जगाचा निरोप घेतला होता.

कुणी काही बोलत नव्हते. बाहेर चॅन्सेलरीच्या आवारात आता रशियन गोळे येऊन पडू लागले होते. चॅन्सेलरीभोवतीच्या भिंतींवर गोळ्या येत होत्या. हिटलरचा व्हॅलेट हिन्झ लिंज (Heinz Ling) याने हिटलरचा मृतदेह उचलून बाहेर आणला व हिटलरचा शोफर एरिच याचे हाती दिला. इव्हाच्या अंगावर रक्ताचा शितोडाही नव्हता. तिला जणू गाढ झोप लागली आहे असेच वाटत होते.

चॅन्सेलरीच्या बागेत हे दोन्ही देह एका खोलगट भागात ठेवण्यात आले. त्यावर भरपूर गॅसोलिन ओतून अग्नी देण्यात आला. ज्वाला चारी बाजूंनी त्या देहांना कवटाळू लागल्या. चॅन्सेलरीतून बाहेर पडण्याच्या दरवाजाजवळ जो आडोसा होता, तिथे गोबेल्स, बोरमन व इतर सर्वांनी उजवे हात उंच करून नाझी पद्धतीने फ्यूररला लष्करी वंदना दिली. ज्वाला आता चांगल्याच भडकलेल्या होत्या.

रशियन गोळ्या चॅन्सेलरीच्या भिंतींवरून मध्येच आत घुसू लागल्या. दोन्ही देह आता भस्मसात झाल्याशिवाय राहात नाहीत, अशी खात्री होताच ...... सर्वजण बंकरखालच्या तळघरात सुरक्षिततेसाठी निघून गेले.

लगोलग बोरमन याने डोएनिट्झ याला पुढीलप्रमाणे रेडिओ-संदेश पाठवला –

" राईश मार्शल गोअरिंगच्या जागी, फ्यूररने तुमची नियुक्ती केली आहे. लेखी अधिकारपत्र वाटचाल करीत आहे. तुम्ही ताबडतोब परिस्थितीप्रमाणे पुढील उपाय योजावे – "

या संदेशात फ्यूररच्या निधनासंबंधी मात्र त्याने कळवले नाही.

या वेळी डोएनिट्झ हा उत्तर विभागात प्लोएन (Ploen) येथे आपल्या छावणीत होता. फ्यूररची जागा आपल्याला घ्यावी लागेल, हे या दर्यावर्दी माणसाच्या कधी स्वप्नांतही नव्हते. दोन दिवसांपूर्वी त्याने – बहुधा हिमलरकडे, हिटलरनंतर चॅन्सेलरीपद येणार, या कल्पनेने त्याला आपला पाठिंबा व्यक्त केला होता; परंतु, रेडिओ-संदेश येताच, त्याने हिटलर अजूनही बंकरमध्ये जिवंत आहे या कल्पनेने, पुढील रेडिओ-संदेश दिला –

" My Fuehrer,

My loyalty to you will be unconditional. I shall do everything possible to relieve you in Berlin. If fate nevertheless compels me to rule the Reich, as your appointed successor, I shall continue this war to an end, worthy of the unique, heroic struggle of the German people. – Grand Admiral Doenitz.

[ प्रिय फ्यूरर, माझी निष्ठा निःस्वार्थी राहील. तुम्हांला बर्लिनमधून मुक्त करण्यासाठी शक्य असेल तेवढे मी करीन. परंतु, दुर्दैवाने तुमचा नियुक्त प्रतिनिधी म्हणून जर राईशवर मला सत्ता चालवणेच भाग पडले, तर मी हे युद्ध अशा नेटाने पुढें चालवीन, की त्यामुळे जर्मन जनतेच्या अभूतपूर्व व शौर्यशाली लढयाला ते गौरवास्पद ठरेल.

– ग्रँड अॅड्मिरल डोएनिट्झ ]

याच दिवशी रात्री बोरमनच्या मनात असे आले की, रशियनांशी आता शरणागतीच्या वाटाघाटी कराव्या. बंकरमध्ये असलेला जनरल क्रेबस् हा पूर्वी मॉस्को येथील वकिलातीत होता. त्याला रशियन उत्तम येत होते व मॉस्कोच्या रेल्वे स्टेशनवर खुद्द स्टॅलिनने लाडाने त्याला एकदा आलिंगनही दिले होते.

३० एप्रिलच्या मध्यरात्री, म्हणजे १ मे १९४५ चा दिवस सुरू होण्यापूर्वीच्या रात्री, जनरल क्रबस् हा बर्लिनमध्ये शिरलेल्या लाल सैन्याचा सेनानी जनरल चुइकॉव्ह (Chuikov) याला भेटण्यासाठी बंकरबाहेर पडला.

## १ मे उजाडली

दुपार झाली. क्रेबस् अजून परत आला नव्हता. या मधल्या वेळात ३-१५ वाजता गोबेल्सने डोएनिट्झ याला आणखी एक निराळा रेडिओ–संदेश धाडला. त्यात त्याने स्पष्ट कळवले –

" The Fuehrer died yesterday 15.30 hrs. Testament of April 29 appoints you as Reich President. "

[ फ्यूररचे काल दुपारी ३-३० वा. निधन झाले. २९ एप्रिलच्या आज्ञेप्रमाणे तुम्हांला राईशचे अध्यक्षपद देण्यात आलेले आहे – ]

याच संदेशात पुढे गोबेल्स याने, बोरमन हा स्वतः येऊन भेटत असल्याचे अॅड्. डोएनिट्झ याला कळवले. परंतु, स्वतःविषयी मात्र त्याने काहीही उल्लेख केला नाही ...... कारण त्याच दिवशी सायंकाळपूर्वी या जगाचा निरोप घेण्याचे त्याने निश्चित केले होते.

सायंकाळी सहाही मुलांचा खेळ बंद करून त्याने त्यांना विषाची इंजेक्शने दिली. त्याने त्यानंतर आपल्या हाताखालच्या माणसाला सांगितले –

" मी, माझी बायको व मुले यांसह मरणार आहे. तुला आमची प्रेते तावडतोब जाळण्याचे काम करावयाचे आहे; ते तुला जमेल का नाही ? "

वस्तुतः, हे सांगण्यापूर्वी त्याच्या सहाही मुलांचे मृतदेह खोलीत ओळीने ठेवलेले होते. काळोख पडला होता व रात्री ८।। चा सुमार झाल्यावर डॉ. गोबेल्स व फ्राऊ गोबेल्स अशी दोघे एका S. S. ऑर्डर्लीला घेऊन बागेत आली. उंचवटयाच्या भागाच्या पायऱ्या चढून ती दोघे पाठ करून उभी राहिली. त्या ऑर्डर्लीनें दोघांना एक एक गोळी घालून निजधामास धाडले.

लगोलग गोबेल्सने सांगितल्याप्रमाणे, सर्व गोबेल्स कुटुंबियांचे देह एकत्र करून त्याने चार डबे गॅसोलिन ओतून ते पेटवून दिले. सहा देहांना पुरेल एवढे गॅसोलिन नसल्याने म्हणा, किंवा या दहनासाठी कुणी पुरेसा वेळ दिला नाही म्हणा – हिटलर व इव्हा ब्राउनप्रमाणे त्यांचे दहन पूर्ण झाले नाही व दुसऱ्या दिवशी रशियन सैन्य जेव्हा चॅन्सेलरीत शिरले, तेव्हा डॉ. गोबेल्स व फ्राऊ गोबेल्स यांचे अर्धवट जळलेले, काळेठिक्कर देह त्याच्या हाती लागले.

जनरल चुइकॉव्हला भेटावयास गेलेल्या जनरल क्रेबस् याने जनरल चुइकॉव्ह यांचेजवळ अशी बोलणी चालवली की – रशियनांनी डोएनिट्झचे सरकार प्रथम मान्य करून शरणागती स्वीकारावी. काही काळानंतर अँग्लो – अमेरिकनांच्या बाबतीत योग्य तो निर्णय डोएनिट्झचे सरकार घेईल; परंतु जनरल चुइकॉव्ह याने या गोष्टीला साफ नकार दिला. याल्टा परिषदेत ठरल्याप्रमाणे – " विनाअट शरणागती रशियनांना व दोस्त सैन्याला देण्याचे मान्य करणेच भाग आहे. " असे जनरल क्रेबस्ला समजताच, निराश होऊन जनरल क्रेबस् परत फिरला. आता मार्शल झालेल्या मार्शल चुइकॉव्हने क्रेबस्च्या या मुलाखतीची हकीकत स्वत: लिहिलेली आहे. ' सोविएट लिटरेचर ' या मासिकाच्या १९६५ च्या पाचव्या अंकात ही संपूर्णपणे दिलेली आहे.

जनरल क्रेबस्च्या या प्रयत्नांत, डॉ. गोबेल्सला रस नव्हता. यात लक्ष होते फक्त बोरमन याचे. कारण त्याला बर्लिनमधून जिवंत निसटावयाचे होते. अर्थात् जनरल क्रेबस् हा ' विनाअट शरणागती द्या ' हा रशियन सेनानीचा निरोप घेऊन परत येताच, बोरमन याने आता बंकर सोडून बाहेर पडून रशियन फळीतून निसटण्याचा प्रयत्न करण्याचे ठरवले.

चॅन्सेलरीत डॉ. गोबेल्स व त्याच्या कुटुंबियांची प्रेते जळत होती, तेव्हा बोरमन एका टँकमधून बंकरबाहेर पडला. त्याचेबरोबर एरिच होता. त्याच्या सांगण्यावरून बोरमन रशियन गोळ्यांनी मारला गेला. आणखी एका नाझी तरुणाने बोरमनचे प्रेत आपण एका पुलाखाली पाहिल्याचे सांगितले आहे. एकतर बोरमनने विष घेतले असावे किंवा तो रशियन गोळ्यांनी मारला गेला असावा हे निश्चित.

जनरल क्रेबस् व बर्गडॉर्फ या दोघांनी मात्र बंकरमध्येच स्वत:वर गोळ्या झाडून घेतल्या.

३० एप्रिल १९४५ ला हिटलरचा मृत्यू झाला व त्यानंतर फक्त सातच दिवसांत तिसऱ्या राईशची समाप्ती झाली. एक हजार वर्षे तरी अस्तित्वात राहील, असे भाकित केलेले हे राईश, फक्त बारा वर्षे, तीन महिने आणि सहा दिवसांत नामशेष झाले.

१ मे १९४५ ला रात्री १० वाजता हॅंबुर्ग रेडिओ स्टेशनवरून एकदम एक निवेदन जाहीर केले –

## डोएनिट्झचे अवसान

" आज दुपारनंतर राईश चॅन्सेलरीत अखेरच्या क्षणापर्यंत बोल्शेव्हिकांचा मुकाबला करीत असताना आपल्या फ्यूररला मृत्यू आला आहे. ३० एप्रिलला, फ्यूररच्या नेमणुकीप्रमाणे ग्रॅंड अॅड्मिरल डोएनिट्झ यांचेकडे अधिकार आलेला आहे. आता अॅड्मिरल डोएनिट्झ हे तुमच्याशी बोलतील – "

वस्तुतः, फ्यूरर ३० एप्रिलाच मरण पावला होता व १ मे ला रात्री – आज दुपारनंतर फ्यूरर मरण पावला असे जे रेडिओवरून सांगितले जात होते, ते चूक होते. कदाचित् हिटलरच्या मृत्युच्या तारखेत २४ तास फरक करून त्याच्या मृत्युसंबंधी रशियन सैन्यात अधिकच गूढ निर्माण करण्याचा हेतूही यामागे असेल. वरील घोषणेनंतर म्हणजे रात्री १० वाजून २० मिनिटांनी डोएनिट्झ याचे भाषण सुरू झाले –

" It is my first task to save Germany from distruction by the advancing Bolshevic Enemy..."

" माझे पहिले कर्तव्य पुढे सरकणाऱ्या बोल्शेव्हिक शत्रूपासून जर्मनीचा होणारा नाश थांबवणे हे आहे " अशी सुरुवात करून डोएनिट्झ याने पुढे सांगितले.

" या माझ्या कामात जोपर्यंत ब्रिटिश व अमेरिकन्स हे अडथळा आणीत राहतील, तोपर्यंत त्यांच्या विरुद्धही संरक्षक युद्ध आम्हांला लढावे लागणार आहे. या परिस्थितीत, अँग्लो-अमेरिकनांनी जर युद्ध चालूच ठेवले तर ते त्यांच्या जनतेच्या हिताचे नसून, त्यामुळे युरोपात बोल्शेव्हिक तत्त्वज्ञानाच्या प्रसारालाच ते साहाय्यभूत होतील. "

डोएनिट्झ असे सुचवीत होता, की आमचा खरा लढा फक्त रशियाविरुद्ध आहे व आता अँग्लो-अमेरिकेने त्यांच्या हितासाठी, या युद्धातून अंग काढून घ्यावे. भाषणाच्या अखेरीस डोएनिट्झने आशा प्रदर्शित केली.

" God will not forsake us after so much suffering & sacrifice."

[ इतक्या यातना सोसल्यानंतर व इतका त्याग आपण केलेला असताना परमेश्वर आपल्याला अंतर देणार नाही ! ]

डोएनिट्झचे हे सर्व अवसान पोकळ होते. त्याला हे पक्के समजलेले होते की, प्रतिकार संपत आलेला आहे. २९ एप्रिललाच इटालीत जर्मन सैन्याने विनाअट शरणागती दिली होती. [ Unconditonal surrender. ]

४ मे १९४५ ला, वायव्य जर्मनीतील सेनेने डेन्मार्क व हॉलंडमधील सैन्यासह ब्रिटिश जनरल मॉंटगोमोरी यांच्याकडे शरणागती दिली ... कारण ३ मे ला हॅम्बुर्ग मॉंटगोमोरीने घेतले ... डोएनिटझ्ने तिथे प्रतिकारच केला नाही व आपला प्रतिनिधी अॅड्मिरल फ्रिडबर्ग याचेमार्फत ही शरणागती त्याने दिली. यानंतर फ्रिडबर्ग याने आयसेन हॉवरच्या रिमस् (Rems) येथील छावणीत जाऊन ६ मे १९४५ ला जनरल जोड्लसह त्या भागातील जर्मन सेनेची शरणागती स्वीकारण्याची याचना केली.



**७ मे १९४५ : जनरल जोड्‌ल याची शरणागती !**

प्रत्यक्ष सही करण्यापूर्वी राईशचा नवा अध्यक्ष अॅड्. डोएनिट्झ याची परवानगी हवी, म्हणून जनरल जोड्‌ल वेळ काढू लागला. जास्तीतजास्त जर्मन सैन्याने रशियन विभागातून दोस्तांच्या भागात यावे, यासाठी हा वेळ काढला जात आहे, अशी रास्त शंका आयसेन हॉवरला आली व त्याने ६ मे ला रात्री निर्वाणीचा इषारा पाठवला.

" I would brook no further delay– "

[ अधिक विलंब मला सहन करता येणार नाही. ]

७ मे १९४५ ला पहाटे १–३० वा. डोएनिट्झ याने फ्लेन्सबर्ग येथील आपल्या छावणीतून रेडिओ-संदेश धाडला व शरणागतीस परवानगी दिली.

## ८ मे १९४५

रिमस् येथील एका लाल दगडाच्या शाळेच्या इमारतीत, आयसेन हॉवरची तात्पुरती कचेरी उघडण्यात आली होती. पहाटे २–४१ मिनिटांनी जनरल जोड्‌ल याने विनशर्त शरणागतीवर सही केली. या वेळी रशियाचा एक प्रतिनिधी हजर होता– फ्रान्सचा प्रतिनिधी हजर होता. जनरल बेडेल स्मिथ याने आयसेन हॉवरच्या वतीने सही केली व जर्मनीच्या वतीने अॅड्मिरल फ्रिडबर्ग व जनरल जोड्‌ल यांनी सह्या केल्या.

कोम्पेनच्या रानात पाच वर्षांपूर्वी एका फ्रेंच जनरलने शरणागतीच्या वेळी जशी करुणा भाकली, जवळजवळ त्याच शब्दांत–जनरल जोड्लने–जेत्यांच्या परवानगीने विनवणी केली.–

" In this hour I can only express the hope that the victor will treat the German people & German Armed forces with generocity. "

[ जर्मन जनता व सैन्य यांना जेते हे सहानुभूतीने वागवतील, अशी आशा मी या प्रसंगी व्यक्त करतो. ]

जोड्लच्या या विनंतीवर कसलीही प्रतिक्रिया जेत्यांपैकी कुणी व्यक्त केली नाही.

८ मे १९४५ ला मध्यरात्रीपासून या शरणागतीतील अटींप्रमाणे युरोपात युद्ध संपले ! या शरणागतीवर ९ मे १९४५ ला बर्लिनमध्ये–रशियाच्या वतीने मार्शल झुकोव्ह व जर्मनीच्या वतीने फील्डमार्शल कायटेल् यांनी शिक्कामोर्तब केले. १ सप्टेंबर १९३९ ला सुरू झालेले हे महायुद्ध, पाच वर्षे आठ महिने व सात दिवसांनंतर ८ मे १९४५ ला मध्यरात्री संपले.

हजार वर्षे टिकेल असे भाकित केलेले हिटलरचे तिसरे राईश तेराव्या वर्षात असे रसातळाला गेले. या महान् राष्ट्रातील, कर्तबगार आणि शूर, परंतु आंधळेपणे व्यक्तिपूजा बांधणाऱ्या जर्मन जनतेला, या राईशने अभूतपूर्व असे शक्तिमान करून सोडले. कधीही जिंकली नव्हती एवढी भूमी या राईशने आपल्या वर्चस्वाखाली आणली . . . आणि हे घडते न घडते तोच हे तिसरे राईश एकाएकी संपूर्णपणे असे उन्मळून पडले की जगाच्या इतिहासात असा जय आणि असा पराजय कुणा राष्ट्राने कधी अनुभवला नव्हता. यापुढे अनुभवण्याची शक्यता नाही.

१९१८ साली असाच पराभव झाला होता. कैसर परागंदा झाला. राज्यपद संपुष्टात आले, परंतु जर्मनीत जर्मनीचे असे सरकार उरले होते. शरण आलेले परंतु जर्मनीच्या प्रतिनिधींचे ते सरकार तरी त्या वेळी शिल्लक होते. या सरकारजवळ– त्याचे असे सैन्य उरले होते !

परंतु, १९४५ च्या या पराभवात तिसरे राईश गडपच झाले. त्याचे अस्तित्वच पुसले गेले. जर्मनीत सरकार उरले नाही. शास्ता उरला नाही. लक्षावधी सैनिक, वैमानिक आणि नाविक यांची अवस्था, फक्त शरण आलेल्या कैद्यांसारखी होऊन गेली. कपडालत्ता, अन्न या प्राथमिक गरजांसाठीही सर्वसामान्य नागरिक जेत्यांच्या तोंडाकडे या वेळी पाहू लागला. अ‍ॅडॉल्फ हिटलरच्या महान चुकांमुळे व त्याच्या पाठीमागे अंधळेपणाने गेल्याचे पाप केल्यामुळे, जर्मन जनतेची मातृभूमी या क्षणी छिन्नविच्छिन्न झाली होती.

अन्न नव्हते, निवारा नव्हता. सर्वत्र पडलेली घरे होती. चिंध्या पांघरून अर्धपोटी अवस्थेत पुढचा हिवाळा जनतेला काकडत काढावा लागणार होता. पुढे फक्त अंधार

होता. भीषण अंधार–मृत्युदरीसारखा !

पराभवानंतर लगेच आलेल्या हिवाळ्यात विल्यम शिरर हा पुनः जर्मनीत गेला होता. तेव्हा जर्मनीचे वरील चित्रच त्याने पाहिले. परंतु आश्चर्य असे, की फ्यूरर-विषयी जर्मन जनतेत त्याला कटुता आढळली नाही ! ! तो सांगतो.

" Such was the state, which the follies of Adolf Hitler had brought them, though I found little bitterness towards him–when I returned to Germany that fall– "

फक्त तिसरे राईस इतिहासजमा झालेले होते !

## विजयाचा शिल्पकार

तिसऱ्या राईशला व नाझी भस्मासुराला गाडण्यात लष्करी पराभवातीलमहत्वाचा वाटा लाल सैन्याने व अमेरिकेने उचलला होता, ही गोष्ट इतिहाससिद्धच आहे. पण, या भस्मासुराला रणांगणाचे आव्हान देऊन, असंख्य यातनामय परिस्थितीतून या विजयाच्या दिशेने, कधी दोस्तांसह, तर कधी एकाकी. अशी वाटचाल कुणी केली असेल तर ती इंग्लंडने ! या दृष्टीने या विजयाचा महान शिल्पकार म्हणून विन्स्टन चर्चिल यांचेच नाव इतिहासात अग्रभागी लिहिले जाईल. विन्स्टन चर्चिल यांनी आपल्या इतिहासात लिहिले आहे–ते सर्वस्वी खरे आहे. ते लिहितात–"

The unconditional surrender of our enemies was the signal for the greatest outburst of joy in the history of mankind. The vanquished as well as the victors felt inexpressible relief. But for us in Britain and the Empire, who had alone been in the struggle from the Ist day to the last, & staked our existance on the result, there was a meaning beyond what even our most powerful & most valient. Allies could feel. weary & worn impoverished but undaunted & now triumphant we had a moment that was subtime. "

[ आमच्या शत्रूने बिनशर्त शरणागती दिली, या वार्तेने मानवजातीच्या इतिहासात सर्वांत मोठा हर्ष सुरू झाला. जेत्यांनी आणि जितांनीही सुटकेचा श्वास टाकला होता. परंतु, ब्रिटन आपल्या साम्राज्यासह या युद्धात पहिल्या दिवसापासून अखेरच्या क्षणापर्यंत असल्याने व इंग्लंडने आपले अस्तित्वच या युद्धाच्या निकालावर पणास लावलेले असल्याने, या विजयाचा जो आस्वाद आमच्या सर्वात शक्तिमान व अत्यंत शूर अशा आमच्या दोस्तांना अनुभवास येत होता, त्यापेक्षा या विजयाचे आम्हांला अधिकच अप्रूप वाटत होते. आम्ही दमलो होतो– भागलो होतो. सर्वस्व गमावले होते ; परंतु आम्ही धीराने उभे होतो, व आता विजयी झालो होतो. आम्ही जो क्षण अनुभवत होतो त्याचे स्वरूप केवळ दैवी आनंदाचे होते. ]

## □ न्यूरेन्बर्ग....

ॲड्. डोएनिटझ्चे जे सरकार 'फ्लेन्सबर्ग' येथे होते, ते दोस्तांनी २३ मे १९४५ला बरखास्त करून सरकारातील सर्व मंत्र्यांना पकडण्यात आले. ६ मे १९४५ ला डोएनिट्झ याने हेनरिच हिमलर याला सरकारातून बडतर्फ केल्याचे जाहीर करून टाकले होते. याचा हेतू अर्थातच हा होता की त्यामुळे दोस्तांचा डोएनिट्झ सरकारकडे पाहण्याचा दृष्टिकोन थोडा सौम्य व्हावा.

२१ मे १९४५ पर्यंत हेनरिच हिमलर हा 'फ्लेन्सबर्ग' शहराच्या आसपासच वावरत होता. २१ तारखेला तो बारा S. S. संघटनेतील सशस्त्र स्वयंसेवकांच्या बरोबर ब्रिटिश–अमेरिकन सैन्यातून बव्हेरियात निसटण्याच्या प्रयत्नात असताना, ब्रिटिशांनी त्याला अटक केली. त्याने वेषांतर केले होते. मिशा काढून टाकल्या होत्या. डाव्या डोळ्यावर एक काळे फडके बांधले होते व लष्करात वापरतात तसला खाजगी पोषाख त्याने घातला होता. पकडला जाताच त्याने आपण हिमलर असल्याची कबुली दिली.

त्याचा पोषाख उतरवण्यात आला व ब्रिटिश लष्करी कपडे घालण्यास देण्यात आले. हेतू हा होता की, त्याने विष वगैरे जवळ ठेवले असल्यास ते सापडावे. थोड्याच वेळात माँटगोमोरीच्या छावणीतून दुसरा ब्रिटिश इंटेलिजन्स अधिकारी आला व हिमलरच्या जबड्याची झडती तो घेऊ लागला. अंदाज बरोबर होता. दातांखालच्या हिरड्यांतील एका पोकळीत त्याने पोटॅशियम सायनाईड या विषाची व्हायल ठेवली होती. ती त्याने पटकन चावली. त्याला जिवंत ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांनी अनंत प्रयत्न केले. पोटात हवा भरून पाहिली, ओकायला लावून पाहिले, परंतु केवळ १२ मिनिटांत हिमलर मरून पडला. हातात जिवंत सापडूनही–त्याने ब्रिटिशांना अखेर चकवले व आपण गेस्टॅपो प्रमुख आहोत, हे अशा रीतीने पुन: सिद्ध केले !

हिटलरचे इतर सहकारी काही अधिक काळच जिवंत राहिले; कारण नोव्हेंबर १९४५ मध्ये न्यूरेन्बर्ग येथे युद्ध गुन्हेगार (war criminals) म्हणून त्यांचेवर दोस्तांनी खटला सुरू केला.

एकंदर २१ नाझी प्रमुख अधिकाऱ्यांना आरोपी म्हणून न्यायासनासमोर उभे, करण्यात आले. त्यांत राईश मार्शल गोअरिंग, इंग्लंडमध्ये उतरलेला रुडॉल्फ हेस, परराष्ट्रमंत्री रिबेन्ट्रॉप, फील्ड मार्शल कायटेल, आल्फ्रेड रोझेनबर्ग, ज्यूंचा कर्दनकाळ ज्युलिअस स्ट्रायचेर, वेठीच्या मजुरांवरील प्रमुख, फ्रिट्झ सोकल, हिटलर युवक संघटनेचा प्रमुख व्हॉन शिरॅश, डॉ. शाक्तचा वारस–फंक, व स्वत: डॉ शाक्त हे यातील प्रमुख होत. यांतील डॉ. शाक्त हा हिटलरच्या तुरुंगातच होता व आता पुन: दोस्तांनी त्याला गुन्हेगार म्हणूनच दाखल केले होते ! व्हॉन पॅपेन यालाही

पकडून याच नाझींबरोबर गुन्हेगार म्हणून गोवण्यात आले होते.

न्यूराथ, ऑस्ट्रियाचा क्विसलिंग, सेयस् इन्क्वार्ट, जनरल जोड्ल, अॅड्. रीडर, अॅड् डोएनिट्झ, पोलिश गव्हर्नर–हान्स फ्रँक, हॉन्स फ्रिटश् हा रेडिओ निवेदक, ही इतर काही प्रमुख मंडळी त्यांत होती.

ऑक्टोबर १९४६ पर्यंत हा खटला चालू होता. यांपैकी हॉन्स फ्रिटश्, डॉ. शाक्त व पॅपेन, या तिघांना निर्दोषी सोडण्यात आले. परंतु या तिघांना निर्नाझीकरण कोर्टाने (Denazification Courts) दीर्घ मुदतीच्या शिक्षा दिल्या. या बंदिवासातच पॅपेन याने आपले आत्मचरित्र पुरे केले.

सात जणांना तुरुंगवासाची शिक्षा मिळाली. हेस, रीडर, फंक यांना जन्मठेप, स्विअर व शिरॅश यांना प्रत्येकी २० वर्षे, न्यूराथला १५ वर्षे व डोएनिट्झ याला १० वर्षे अशा शिक्षा मिळाल्या. उरलेल्या अकरा जणांना देहांतशासन फर्मावण्यात आले.

१६ ऑक्टोबर १९४६ या दिवशी, रात्री एक वाजून अकरा मिनिटांनी रिबेंट्रॉप हा न्यूरेंबर्ग तुरुंगांत फाशीची फळी चढला. थोड्या थोड्या अवधीने कायटेल्, रोझेन्बर्ग, फ्रिक, स्ट्रायचेर, सेयस इन्क्वार्ट, सोकल व जोड्ल यांनी फासात मान अडकवली.

फाशी जाण्याचा पहिला मान खरे पाहता रिबेन्ट्रॉपचा नव्हे; तो मान राईश मार्शल गोअरिंग याचा ! परंतु फाशी देण्यापूर्वी दोन तास त्याने सायनाईड घेऊन आत्महत्या केली. एवढ्या सर्व तऱ्हेने काळजी घेऊनही गोअरिंगने तुरुंगाधिकाऱ्याला कसे चकवले कळत नाही ! कुणी म्हणतात की, त्याला भेटायला आलेल्या त्याच्या पत्नीने त्याचे चुंबन घेताना सायनाईडची व्हायल त्याच्या मुखांत सारली ! हेच बहुधा खरे असावे. पत्नीच्या अखेरच्या चुंबनाचा मृत्यूसाठी उपयोग करून अॅडॉल्फ हिटलर व डॉ. गोबेल्सप्रमाणे हर्मन गोअरिंग याने आपल्या आत्मघाताचा प्रयत्न यशस्वी केला.........मात्र गोअरिंग व गोबेल्स यांचे मृतदेह शत्रूच्या हाती पडलेच–

अॅडॉल्फ हिटलरच्या मृतदेहाचे दर्शन तर सोडाच, परंतु त्यांची हाडेही रशियनांच्या हाती लागली नाहीत. रशियनांना याची अजूनही फार हळहळ वाटते.

> युद्धगुन्हेगारांच्या यादीत अजूनही, सुभाषचंद्र बोसांचे नाव आहे. या गुन्हेगारांना अमुक एका मुदतीनंतर गुन्ह्याची माफी द्यायची, अशी तरतूद आंतरराष्ट्रीय कोर्टाच्या युद्ध गुन्हेगारविषयक कायद्यात कोठेही नाही, असा स्पष्ट खुलासा 'सोविएत देश' या पक्षिकाच्या मे १९६५ च्या अंकात केलेला आढळेल.
>
> ['राष्ट्रांची कसोटी' —ए. कोसिजिन]

अशा परिस्थितीत युद्धगुन्हेगारांच्या यादीतून सुभाषचंद्रांचे नाव काढावे यासाठी

भारत सरकारने काही केले काय ? ते जिवंत असतील व परत येतील या भावड्या कल्पनेसाठी नव्हे, तर ते युद्धगुन्हेगार म्हणून दोस्तांच्या व रशियनांच्या खाती असले तरी आमच्या खाती नाहीत. आमचे ते नेताजी आहेत ही गोष्ट जगाला स्पष्ट सांगण्यासाठी हे आवश्यक आहे.

## □ फ्यूररच्या शब्दांत फ्यूरर

" The testament of Adolf Hitler. Hitler's Bormann documents. "

'हिटलरची मनोगते' या १९६१ साली इंग्रजी भाषेत प्रथमच प्रकाशित झालेल्या कागदपत्रांत फ्यूररने ४ फेब्रु. १९४५ ते २ एप्रिल १९४५ या कालात, जर्मनीच्या युद्धातील पराभवाची मीमांसा करणारे हिटलरचे वक्तव्य (बोरमन याने) संकलित केले आहे. नाझी संघटनेवरील फ्यूररची पकड अखेरपर्यंत कायम राहू शकल्यामुळे बर्लिनमध्ये या अखेरीच्या दिवसांतही, आपण करू इच्छित होतो काय, झाले काय व उद्या या समोरासमोर ठाकलेल्या पराभवाचे जर्मनीवर व जागतिक राजकारणावर काय परिणाम होतील, याविषयी आपली मते हिटलरने पुढल्या पिढीकरता ग्रथित केलेली आहेत. यातला महत्त्वाचा भाग प्रथम पाहू व मग त्यातील सत्य व असत्य काय हे पाहू. तारीखवार बोरमनने ही मनोगते लिहिली आहेत. त्यांतील महत्त्वाचा भाग त्याच अनुक्रमाने प्रथम देतो.

**४–२–१९४५.**

" Churchill, by refusing to come to terms with me, has condemned his country to a policy of suicide. There are now new elements, which, it is impossible to fit into such a scheme of things. The crucial new factor is the existance of those two giants, the United States and Russia. Pitt's England ensured the balance of world power by preventing the hegamony of Europe. Churchill's England on the other hand should have allowed the unification of Europe, if it wished to preserve the same balance of power.

" We can with safety make one prophecy. Whatever the outcome of this war, the British Empire is at an end. It has been mortally wounded.

" At the begining of 1941, after her successes in North Africa had re-established her prestige, she had an even more favourable opportunity of withdrawing from the game and concluding a negotiated peace with us. "

[ चर्चिल यांनी माझ्याशी समझोता करण्याचे नाकारून आपल्या देशाला आत्मघाताच्या घोरणाने नेले आहे. आता पूर्वीच्या, जुन्या अटकळीत न बसणाऱ्या, काही नव्या गोष्टी उत्पन्न झाल्या आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे दोन मोठे राक्षसी देश, युनायटेड स्टेट्स् व रशिया हे आता अस्तित्वात आहेत. युरोपमध्ये, कुणा एकाला वरचढ होऊ न देता, पिट्च्या इंग्लंडने युरोपात सत्तेचा समतोल राखण्यात यश मिळवले. याउलट, चर्चिलच्या इंग्लंडने, हाच सत्तेचा समतोल राखण्यासाठी युरोपात होऊ घातलेल्या एकीकरणाला पाठिंबा द्यावयास हवा होता.

आपण एक भवितव्य निश्चित वर्तवू शकतो की, या युद्धाचे काहीही होवो, ब्रिटिश साम्राज्याचे दिवस आता भरले आहेत. त्यावर मर्मप्रहार झालेला आहे.

१९४१ च्या सुरुवातीला, उत्तर आफ्रिकेतील विजयामुळे इंग्लंडची गेलेली पत पुनः भरून निघाली असताना, या खेळातून बाहेर पडून व आमच्याशी वाटाघाटी करून शांतता स्थापन करण्याची संधी त्यांना आली होती. ]

## ६ फेब्रु. १९४५

"The situation is serious, very serious. It seems to be desperate.

" Fates have decreed, that we should once more in the course of our history be crushed by forces superior to our own. Then let us go down with our heads high and secure in the knowledge, that the honour of the German people remains without blemish. A desperate fight remains for all time a shining example "

[ परिस्थिती गंभीर आहे. फार गंभीर आहे. असे वाटते की, परिस्थिती हाताबाहेर गेल्यासारखी आहे.

दैवाची अशी इच्छा दिसते की, इतिहासाच्या ओघात, पुनः एकदा आमच्यापेक्षा वरचढ अशा शक्तींकडून आम्ही चिरडले जावे. ठीक आहे, मग निदान ताठ मानेने व जर्मन जनतेचा स्वाभिमान न डागळता आपण हे पत्करू. जिवावर उदार होऊन दिलेली प्रत्येक लढाई ही उज्ज्वल उदाहरण ठरत असते. ]

## ७ फेब्रुवारी १९४५

"देशाबाहेर जाऊन समुद्रापलीकडे वसाहती कराव्यात, असे जर्मनीला कधी वाटले नाही. अर्वाचीन व प्राचीन इतिहास पाहिला तर हेच दिसेल. अशा प्रयत्नांत अखेर राष्ट्र दुर्बलच होत जाते. अशा वसाहतींतून ज्या नव्या शक्ती आपणच जन्माला घालतो, त्याच अखेर ग्रास ठरतात. ग्रीकांचे काय झाले ? युनायटेड स्टेट्स् व ऑस्ट्रेलिया या ठिकाणी वसाहती यशस्वी झाल्या असे म्हणता येईल; परंतु हे यश फक्त आधिभौतिक आहे."

" They are bodies without age, it is impossible to say whether they are in state of infancy or whether they have already touched by sterility. "

[ हे देश म्हणजे वयच नसल्यासारखे आहेत. त्यांच्याकडे पाहिले तर हे अजून अर्भकावस्थेत आहेत की म्हातारंपण येऊन बुद्धिमंद होऊ लागली आहे. हेच सांगता येत नाही. ]

इतर खंडांतून ज्या वसाहती केल्या गेल्या, त्या सर्व अयशस्वी झाल्या आहेत. त्या त्या खंडातील मूळची जी माणसे आहेत त्यांच्यावर काहीही परिणाम तेथे गेलेल्या गोऱ्यांना करता आलेला नाही. हिंदू हिंदूच राहिले, चिनी चिनीच राहिले, मुसलमान मुसलमानच राहिले ! प्रचंड प्रमाणावर प्रयत्न करूनही मिशनऱ्यांना तिथे फारसे यश आलेले नाही. काही तुरळक धर्मांतरे झाली; परंतु त्यांतील प्रामाणिक किती हा प्रश्न आहे. या गोऱ्यांनी तेथील लोकांना ज्या गोष्टी दिल्या त्या सर्व देणग्या हानिकारक होत्या. जडवाद, मायेफिरूपणा, दारू व सिफिलिससारखे रोग या त्या देणग्या होत. या वसाहतींतील लोकांच्या ठिकाणी त्यांचे म्हणून असे जे काही गुण आहेत, ते या गोऱ्यांनी देऊ केलेल्या गोष्टींपेक्षा खूपच वरच्या दर्जाचे आहेत. म्हणूनच गोऱ्यांना तिथे फारसे यश मिळू शकलेले नाही.

म्हणूनच पूर्वेच्या दिशेने व फक्त पूर्वेच्याच दिशेने आपल्या वंशाच्या नसा वाढत गेल्या पाहिजेत.

" It is Eastward and always Eastward that the veins of our race must expand. "

[ निसर्गत: जर्मन जनतेची वाढ ज्या भागांत व्हावी, अशी तीच दिशा आहे. "

" जर्मनीला वसाहतवाद अभिप्रेत नसल्याने, जर्मनीने वसाहती निर्माण करू पाहणाऱ्या कोणत्याही देशाशी सहयोगी होऊ नये व त्यांच्या वसाहतवादाला खतपाणी घालू नये.

## १० फेब्रुवारी १९४५

" कधी कधी माझ्या मनात प्रश्न उभा राहतो की १९४० साली आम्ही स्पेनला या युद्धात ओढले नाही, ही आमची चूक झाली काय ? यामुळे आम्हांला जिब्रॉल्टरचा कबजा करता आला असता; परंतु स्पेन युद्धात आले असते तर कदाचित ब्रिटिशांच्या चिथावणीने पुन: स्पेनमध्ये यादवी सुरू झाली असती. असे झाले असते तर ज्या राज्यकारभाराविषयी मला यत्किंचितही प्रेम नाही, अशा स्पेनच्या भांडवलदार सटोडियांच्या व कारकूनशाहीच्या राज्याला आम्हांला उचलून धरावे लागले असते. माझी आता खात्री झाली आहे की, ज्यांना स्पेनमध्ये लालभाई समजण्यात येत होते, त्यांतले फारच थोडे खरे कम्युनिस्ट होते. आमची फसवणूक करण्यात आलेली आहे. जर मला खरी वस्तुस्थिती माहीत असती तर भुकेने त्रासलेल्या

जनतेवर बॉम्ब फेकण्यासाठी आमची विमाने गेली नसती !

सोपी गोष्ट करता आली असती ती म्हणजे, जनरल फ्रँकोकडे कानाडोळा करून आम्हीच जिब्रॉल्टर कवजात घ्यावयास हवे होते. माझी खात्री आहे की एवढयावरून लगेच ब्रिटनने काही स्पेन विरुद्ध युद्ध पुकारले नसते."

१३–२–१९४५

"By nature, the Jew is a parasite which cannot be and will not be assimilated. A distinguishing feature of the Jew is that, unlike other foreigners, he everywhere claims all the rights of citizenship in the community that shelters him and at the same time remains always a Jew."

[ निसर्गत: ज्यू हे बांडगुळासारखे आहेत की, ज्यांना समावून घेणे अशक्य होते. ज्यू माणसाचे इतर परदेशीय माणसांजवळ नसलेले एक खास लक्षण हे आहे, की सर्वत्र ज्या समाजांत तो आश्रय घेतो व नागरिकत्वाचे सर्व अधिकार भोगतो त्यांच्याशी समरस न होता, तो 'ज्यू' तो 'ज्यू' च राहतो. ]

१४–२–१९४५

"From the purely military point of view, it would have suited us better, if the war had started sooner. I ought to have seized the initiative in 1938. However, you can hardly blame me if the British and the French accepted at Munich every demand I made of them. But from the point of view of our moral preparedness, it has come far too soon. My disciples have not yet had time to attain their full manhood.

"Our greatest political blunder has been our treatment of the French. Our obvions course should have been to liberate the working classes, and to help the workers of France to implement their own revolution. We were equally stupid as regards the French colonies. We should have helped them to achieve their liberty."

[ केवळ लष्करी दृष्टीने विचार केला तर हे युद्ध जरा आधी सुरू झाले असते तर ते आमच्या अधिक सोयीचे झाले असते. १९३८ सालीच मला ही संधी साधावयास हवी होती, परंतु, याकरता कुणी मला दोष देऊ नये. कारण, म्युनिच येथे ब्रिटिशांनी व फ्रेंचांनी माझी प्रत्येक मागणी मान्य केल्यानंतर मी तरी काय करणार ? परंतु, मानसिक तयारीच्या दृष्टीने विचार केला तर हे युद्ध जरा लवकरच

सुरू झाले. माझे अनुयायी हे अजून संपूर्ण पुरुषार्थ जागृत होण्याच्या अवस्थेत पोहोचलेले नव्हते.

फ्रेंचांना आम्ही जी वागणूक दिली ती तर माझी मोठीच राजकीय घोडचूक झाली. आम्ही सरळ फ्रेंच कामगारांना मुक्त करावयास हवे होते. म्हणजे त्यांनी क्रांती यशस्वी केली असती. फ्रेंच वसाहतींच्या बाबतीतही आम्ही मूर्खपणा केला. आम्ही त्यांना स्वतंत्र होण्यासाठी मदत करावयास हवी होती.

१५–२–१९४५.

" No decision which I have had to make during the war was graver than that to attack Russia. I had always maintained that we ought at all costs to avoid waging war on two fronts, and you may rest assured that I pondered long and anxciously over Napoleon and his experiences in Russia. Why, then you may ask, this war against Russia and why at the time that I selected ?

" In order to persuade Britain to pack up, it was essential to rob her of her hope of being able still to confront us on the Continent itself, with an adversary of a stature equal to our own. We had no choice, we had at all costs to strike the Russian element out of the European balance sheet.

" We had another reason...It was absolutely certain that one day or other she would attack ns.

" But for the difficulties created for us by the Italians, and their idiotic campaign in Greece, I should have attacked Russia earlier. "

[ रशियावर हल्ला करण्याचा मी घेतलेला निर्णय हा लढाईच्या कालातील माझा सर्वांत गंभीर निर्णय होता. मी नेहमी हेच मानीत आलो होतो, की दोन आघाड्यांवर लढाई टाळली पाहिजे. आणि या निर्णयापूर्वी नेपोलियनला रशियात जो अनुभव आला होता त्यावर मी दीर्घकाळ विचार केला होता याची खात्री बाळगा. मग तुम्ही विचाराल की रशियाविरुद्ध मी युद्ध का सुरू केले व मी ज्या वेळेला सुरू केले त्या वेळी ते का केले?

ब्रिटनला आपला गाशा गुंडाळावयास भाग पाडावयाचे तर खुद्द युरोपातच आमच्याच तोडीच्या एखाद्या राष्ट्राला आमच्याविरुद्ध उभा करण्याची जी आशा ब्रिटनला वाटत होती ती नाहीशी करणे आवश्यक होते. आम्हांला पर्यायच नव्हता. पडेल ती किंमत देऊन युरोपियन सत्तेचा जो ताळेबंद होता, त्यातून रशियाचे खाते संपुष्टात आणणेच भाग होते.

दुसरेही एक कारण होते. ही गोष्ट स्पष्ट होती की, आज ना उद्या रशियाने आमच्यावर हल्ला केलाच असता.

जर इटालियनांनी अडचणी उत्पन्न केल्या नसत्या व ग्रीसवर स्वारी करण्याचा महामूर्खपणा केला नसता तर रशियावर मी यापूर्वीच हल्ला चढवला असता. ]

१७–२–१९४५.

"It is quite obvious that our Italian alliance has been of more service to our enemies than to ourselves. If, in spite of all our efforts, we fail to win this war, the Italian alliance will have contributed to our defeat.

"It was this alliance, for instance, which prevented us from pursuing a revolutionary policy in North Africa. The Egyptions, the Irakis and the whole of the Near East were ready to rise in revolt. It is a characteristic of the Moslem world, from the shores of the Atlantic to those of the Pacific, that what affects one, for good or for evil, affects all.

"Out of gratitude, I have abstained from passing judgment on Italy. Unfortunately, the laws of nature have shown, that it is a mistake to treat as equals those who are not your equals.

"Life does not forgive weakness."

[ ही गोष्ट उघड आहे की आमच्याशी असलेली इटालीची दोस्ती ही आमच्यापेक्षा आमच्या शत्रूलाच अधिक उपयुक्त ठरली आहे. जर सर्व प्रयत्न करूनही हे युद्ध आम्ही जिंकू शकलो नाही, तर या पराभवाला इटालीचीही दोस्ती कारणीभूत ठरणार आहे.

याच दोस्तीपायी आम्हांला उत्तर आफ्रिकेत क्रांतिकारी धोरण अनुसरता आले नाही. इजिप्शियन, इराकी व मध्यपूर्वेतील सर्व जनता ही बंड करून उठण्यास अगदी तयार होती. अटलांटिक किनाऱ्यापासून पॅसिफिकपर्यंत, मुसलमानी जगताचा हा एक विशेष आहे की, एका देशात जी काही बरी-वाईट घटना घडते त्याचा परिणाम सर्व मुसलमानांवर होतो.

कृतज्ञता म्हणून जाहीररीत्या इटालीबद्दल मी आतापर्यंत काही बोलत नसे. दुर्दैवाने निसर्गाचे नियम हेच सांगतात की, जे आपल्या योग्यतेचे नाहीत, त्यांना आपल्या बरोबरीचे समजणे ही अखेर चूक ठरते. जगात दुर्बलतेला क्षमा नाही. ]

१८–२–४५.

"For us, Japan will always remain an ally and a friend. It is

of course regrettable that the Japanese did not enter the war against Russia."

[जपान हा सदैव आमचा दोस्त राहील. अर्थात् जपान रशियाविरुद्ध युद्धात उतरला नाही या गोष्टीचे आम्हांस वाईट वाटते.]

२०–२–४५

"In spite of the complete confidence. I had in him (Duce) personally, I felt compelled to keep him in ignorance of my intentions in any case where indiscretion might have prejudiced our interests. Just as I had complete confidence in Mussolini, he had complete confidence in Ciano and he, of course, had no secrets from the pretty ladies who fluttered like butterflies around him. I had good reasons, therefore, for not telling the Duce everything."

[व्यक्तिश: माझा ड्यूसवर संपूर्ण विश्वास असूनही, माझ्या काही हेतूंबद्दल त्याला अज्ञानात ठेवणे मला भाग पडे. कारण, या गोष्टी अशा असत की, जरा तारतम्य सुटले, तर ते आम्हा उभयतांच्या हिताला घातक होते. ज्याप्रमाणे माझा मुसोलिनीवर पूर्ण विश्वास होता, तसा मुसोलिनीचा सियानोवर होता आणि सियानोच्या अवतीभवती ज्या देखण्या स्त्रिया सतत घोटाळत असत, त्यांच्याशी सियानो काहीही बोलत असे. ड्यूसला मी काही गोष्टी सांगत नसे त्याला ही अशी सबळ कारणे होती.]

२१–२–४५

"National socialism is interested only in the happiness of the German race and strives only to secure the wellbeing of the German man.

"The universalists, the idealists, the utopians all aim too high. They give promises of an unattainable paradise, and by doing so they deceive mankind."

[नॅशनल सोशॅलिझमला फक्त जर्मन जातीच्या सुखाची आकांक्षा आहे. जर्मन माणसाच्या चांगल्यासाठीच त्याची धडपड आहे. जगाच्या सुखाची चिंता करणारे विश्ववादी व ध्येयवादी यांची ध्येये मोठी उच्च असतात. कधीही न अवतरणाऱ्या नंदनवनाची वचने ते देत असतात व असे करीत करीत मानवजातीला फसवत राहतात.]

२४–२–४५

"This war against America is a tragedy. It is illogical and

devoid of any foundation of reality.

" The United States as a matter of fact could survive and prosper in a state of economic isolation; for us, that is a dream. which we would love to come true.

" The fact that neither we, nor they have any colonial policy is yet another characteristic which should unite us. "

[ अमेरिकेविरुद्ध आमचे युद्ध ही एक शोकांतिका आहे. या झगड्याला वस्तुनिष्ठतेचा आधार नाही व ही लढाई तर्कशुद्धही नाही.

खरे पाहता आर्थिकदृष्टया स्वतंत्र अशा तऱ्हेने अमेरिकेला, एकांतात आपले जीवन घालवता येईल. आमचे स्वप्न असेच आहे. ते प्रत्यक्षात यावे अशी आमची ओढ आहे.

आम्हांला व त्यांना खास वसाहतवादाची आकांक्षा नाही. याच समान विशेषामुळे वस्तुतः, आम्ही दोघे एकत्र यावयास हवे. ]

२५-२-४५

" It is a fact that we always bungle everything through being forced to act in a hurry. To acquire the gift of patience, we should have both time and space, and at the moment we have neither. The Russians are lucky in possessing both.

" Thanks to the Marxist religion, they have everything required to make them patient. They have been promised happiness on earth, but in the future.

" Lenin did not have the time, but Stalin will carry on the good work, and so on and so on......Marxism is a very powerful force.

" I myself am fated to being compelled to try to accomplish everything in the short space of a human lifetime. Where others have all eternity at their disposal, I have but a few short miserable years. Those others know, that they will be succeeded by yet others who will carry on where they left off. I have now reached the stage, where I wonder whether among my immediate successors, there will be found a man predestined to raise and carry on the torch, when it has slipped from my hand. "

I have sown the good seed. One day the harvest will come, and nothing on earth will be able to prevent it from comming. "

[ ही गोष्ट खरी आहे की, घाईघाईने सर्व काही करणे भाग पडत असल्याने, आम्ही सर्व गोष्टींचा गोंधळ घालतो. शांतपणे धीर धरण्याचा गुण अंगी येण्यासाठी, भरपूर वेळ व भरपूर भूमी आम्हांला हवी. या क्षणी मात्र यातील काहीच आपलेपाशी नाही. रशियनांजवळ या दोन्ही गोष्टी असल्याने ते सुदैवी आहेत.

मार्क्सवादी विचारसरणीमुळे...तर धीर धरण्यासाठी लागणारे सर्व काही त्यांना मिळालेले आहे. पृथ्वीवर ते सुखाची आशा करतात, परंतु हे सुख भविष्यात येणारे असते.

लेनिनला पुरेसा अवधी मिळाला नाही. परंतु, स्टॅलिनला हे काम पुरे करायला भरपूर वेळ आहे. मार्क्सवाद ही एक जबरदस्त शक्ती आहे खरी.

माणसाला जी थोडी आयुष्याची खडतर वर्षे लाभू शकतात, तेवढ्याच काळात मला सर्व काही गोष्टी पुऱ्या करणे भाग आहे. इतरांना मात्र यासाठी अनंतकाळ उपलब्ध आहे, तर मला मात्र फार थोडी कठीण वर्षेच मिळाली आहेत. त्यांना हा दिलासा आहे की, त्यांच्या पश्चात, दुसरे येणारे, जिथे काम सोडले तेथून तो धागा उचलण्याला तयार आहेत. माझ्या हातातून मात्र ही ज्योत जेव्हा खाली पडेल, तेव्हा ती उचलून पुढचा मार्ग चालू शकणारा कुणी माझ्या पश्चात् निघू शकेल की नाही, याची मला शंका आहे.

मी चांगले बी पेरले आहे. एके दिवशी पीक बहरास येईल. दुनियेतील कोणतीही शक्ती या गोष्टीस त्या वेळी विरोध करू शकणार नाही.

२६–२–४५

" Churchill was quite unable to appreciate the sporting spirit of which, I had given proof by refraining from creating an irreparable breach between the British and ourselves. We did, indeed, refrain from annihilating them at Dunkirk.

Where the Jew-ridnen democracies are concerned, the Rnssians have the patience of an elephant. They know with absolute certainity, that sooner or later and without recourse to war, they will succecd in establishing dominion over them, thanks to the eternal dissensions that rend them, the succession of economic crises from which they seen unable to escape and the powerful lure of Marxism to which they are particularly vulnerable. But they also know that in the case of the Third Reich the situation is very different. They know that in every field of endeavour, and more so in peace than in war, we shall everywhere outclass then.

" If I felt compelled to decide to settle my accounts with Bolshevism by force of arms, and indeed, arrived at my decision on the very anniversary of the signing of the Moscow pact, I have every right to believe, that Stalin had come to the same decision even before be signed the pact.

" In a spirit of implicable realism on both sides, we could have created a situation, in which a durable *entente* would have been possible An *entente* in short, watched over by an eagle eye and with a finger on the trigger. "

[ चर्चिल यांनी, मी ज्या खिलाडू वृत्तीचे दर्शन त्यांना घडवले, त्याची कदर केली नाही. ज्यामुळे ब्रिटिश व आम्ही यांच्या संबंधांना कधीही न जोडला जाईल असा तडा गेला असता, अशी गोष्ट करण्याचे मी नाकारले होते. खरोखरच डंकर्क येथे त्यांचा संपूर्ण नाश करण्याचे शक्य असून मी ते केले नाही.

ज्यूंनी पोखरलेल्या युरोपातील ज्या लोकशाही राजवटी आहेत, त्यांच्या बाबतीत रशिया हत्तीच्या धीमेपणाने वागत आहे. त्यांना हे पक्के माहीत आहे की आज ना उद्या, युद्धाचा धोका न पत्करताच, त्या देशांवर वर्चस्व प्रस्थापित करता येईल. कारण, या लोकशाही देशांतून अंतर्गत कलागती व एकापाठोपाठ येणारी आर्थिक संकटे ही नेहमीचीच असल्याकारणाने, ज्या मार्क्सवादाचे आकर्षण अशा ठिकाणी मोठे असते, त्या मार्क्सवादाच्या पंजात हे देश सापडतच असतात; परंतु त्यांना हेही माहीत आहे, की तिसऱ्या राईशच्या बाबतीत परिस्थिती निराळी आहे. त्यांना हे माहीत आहे, कर्तबगारीच्या प्रत्येक क्षेत्रात, त्यातल्या त्यात युद्ध परिस्थितीपेक्षा शांतताकालातच, आम्ही रशियनांना वरचढ आहोत.

बोल्शेव्हिजम्बरोबरचा हिशेब शस्त्रबलाने चुकता करण्याचा निर्णय मला घ्यावाच लागला; कारण या निर्णयाशी मी निदान मॉस्को कराराच्या पहिल्या वाढदिवसाच्या सुमारास पोचलो असतो, तर स्टॅलिनने हाच निर्णय मॉस्को करारावर सही करण्यापूर्वीच घेतलेला होता, असें मानण्यास मला भरपूर वाव आहे.

अगदी नागड्या वास्तववादी भूमिकेचा आश्रय उभय बाजूंनी केला असता, तर आम्ही अशी एक परिस्थिती निर्माण करू शकलो असतो की, ज्यात शस्त्रे म्यान केलेली शांतता टिकू शकली असती. मात्र या शांततेसाठी गरुडाच्या नजरेने व एक हात बंदुकीच्या चापावर ठेवूनच आम्हांला वावरावे लागले असते. ]

" I have been Europe's last hope. Europe must be fashioned in the common interest of all and without regard for indivisuals. Napoleon understood that perfectly.

" I, perhaps better than anyone else, can well imagine the

torments suffered by Napoleon, longing, as he was for the triumph of peace and yet compelled to continue waging war.

" And always it has been this Britain, who barred Europe's way to prosperity. But now she is aged and enfeebled, though not less vicious and wicked."

[ मी युरोपची अखेरची आशा होतो. युरोपची रचना सर्वांचे एकत्रित हित नजरेसमोर ठेवून झाली पाहिजे. वैयक्तिक देशाचा तिथे विचार असू नये. नेपोलियनला ही गोष्ट पक्की समजली होती.

शांततेचा विजय व्हावा अशा इच्छेने प्रयत्नशील असताना, सतत लढाया लढत राहणे नेपोलियनच्या नशिबी आले. यामुळे नेपोलियनला ज्या यातना झाल्या असतील, त्यांची कल्पना अन्य कुणापेक्षा मलाच चांगल्या रीतीने करता येईल.

...आणि प्रत्येक वेळी युरोपच्या उत्कर्षाच्या आड ब्रिटन आलेले आहे ! आता जरी इंग्लंड म्हातारे, दुबळे झालेले असले तरी त्याचा दुःस्वास व दुष्टपणा कमी झालेला नाही. ]

## पराभवापूर्वी चार आठवडे

### २ एप्रिल १९४५


" If we are destined to be beaten in this war, our defeat will be utter and complete.

" In a ghastly comflict like this, in a war in which two so completely irreconcilable ideologies confront one another, the issue can inevitably only be settled by the total destruction of one side or the other.

" It is a cruel thought. It fills me with horrer to think of our Reich hacked to pieces by the victors. But even this prospect, howeevr, does not shake my invincible faith in the future of the German people.

" But as far as I personally am concerned, I could not bear to live in Germany during the transition period that would follow the defeat of the Third Reich.

" What advice can we give then, what rules of conduct can we recommend to those who survive ? German people must strive its very atmost to respect those racial laws, which we laid down for it. Postwar Germany's second preoccupation should



निरोप : हिटलरचे अखेरचे छायाचित्र

be, to preserve indissoluble, the union of all the German races. It is only when we are united that our qualities expand to their full stature; only when we cease to be Prussians, Bavarians, Austrians, Rhinelanders and become just Germans.

" With the defeat of the Reich and pending the emergence of the Asiatic, the African and, perhaps, the South American nationalisms, there will remain in the world only two Great Powers capable of confronting each other–the United States and Soviet Russia ! The laws of both history and geography will compel these two powers, to a trial of strength, either military or in the fields of economics and ideology. I say with all the emphasis at my command that the Germans must at all costs avoid playing the role of pawn in either camp. "

[ जर आपला या युद्धात पराभव होणारच असेल तर तो पराभव आपल्याला संपूर्ण चीत करणारा असेल.

अशा तऱ्हेच्या भयानक संग्रामात, की ज्यात कधीही एकत्र येऊ न शकणाऱ्या दोन विचारसरणी समोरासमोर उभा राहिलेल्या असतात, त्या वेळी जेव्हा एका बाजूचा संपूर्ण नाश होतो, तेव्हाच वादग्रस्त प्रश्न निकालात निघत असतो.

आपल्या या राईशचे जेत्यांकडून तुकडे तुकडे होणार, हा विचार जीव घेणारा आहे. या विचाराने माझ्या मनात धडकी निर्माण होते. परंतु जे वाढून ठेवलेले आहे, त्याची कल्पना असूनही, जर्मन जनतेच्या भवितव्यावरील माझा विश्वास ढळलेला नाही.

माझ्या स्वत:विषयी बोलावयाचे तर तिसऱ्या राईशचा अस्त व जर्मनीचा पुन: होणारा उदय यांतील मधल्या संधिकाळात जिवंत राहण्याची कल्पना मला सहनच होत नाही.

जे मागे राहणार आहेत, त्यांनी कसे वागावे, या संबंधीचे नियम असे काय सांगता येतील ? वंशवादाचे जे नियम आम्ही घालून दिलेले आहेत, त्यांचे पालन जर्मन जनतेने कटाक्षाने केले पाहिजे. युद्धोत्तर जर्मनीने दुसऱ्या एका गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे. ती म्हणजे सर्व जर्मन जातींचे, जे अभेद्य असे एकीकरण झालेले आहे, ते टिकवले पाहिजे. आपण जव्हा एकजुटीने राहतो, तेव्हाच आपल्या गुणांचाच संपूर्ण विकास होत असतो. प्रशियन, बव्हेरियन, ऑस्ट्रियन, व्हाईनलँडर, असा वेगवेगळा विचार सोडून आपण सर्व जर्मन आहोत असे वागावे.

तिसऱ्या राईशचा पराभव झाल्यावर, आशियात, आफ्रिकेत व दक्षिण अमेरिकेत राष्ट्रवादाचा उद्‌भव होण्यापूर्वीच्या काळात जगात फक्त दोनच मोठ्या शक्ती राहणार आहेत. त्या म्हणजे युनायटेड स्टेट्स् व सोविएट रशिया. इतिहासाच्या व भूगोलाच्या निसर्ग-नियमानुसार या दोन शक्तींचा संघर्ष अटळ आहे. हा संघर्ष लष्करी बळाचा उडेल, आर्थिक क्षेत्रात उडेल किंवा विचारसरणीत उडेल. मला अत्यंत कटाक्षाने हे सांगितले पाहिजे की, जर्मन देशाने याबाबतीत कुणाच्याच ताटाखालचे मांजर होण्याचे टाळले पाहिजे. ]

## २९ एप्रिल १९४५

" The people and the armed forces have given their all in this long and hard struggle. The sacrifice has been enormous. But my trust has been misused by many people. Disloyalty and betrayal have undermined resistance throughout the war. It was therefore not granted to me to lead the people to victory. The Army general staff cannot be compared with the General staff of the First World War. Its achivements were far behind those of the fighting front. The efforts and sacrifices of the German people in this war have been so great that I cannot believe that they have been invain. The aim must still be to win territory in the East for the German people. "

[ जनतेने आणि सैन्याने या प्रदीर्घ व खडतर लढ्यात आपले सर्वस्व अर्पण केलेले

आहे. हा त्याग अतुलनीय आहे; परंतु माझ्या- विश्वासाचा अनेकांनी गैरउपयोग केला. या युद्धात, बेइमानी व फितुरी यांनी प्रतिकाराचा कणाच मोडून टाकला.

यामुळ या युद्धात जनतेला विजय प्राप्त करून देण्यात मी अपयशी ठरलो आहे. पहिल्या महायुद्धातील, जनरल स्टाफची या युद्धातील, आर्मी जनरल स्टाफशी तुलनाच करता येणार नाही. आघाडीवरील लढणाऱ्या सैनिकांच्या कामगिरीच्या मानाने ही माणसे फारच कमी पडली.

या युद्धातील जर्मन जनतेचा यत्न व त्याग एवढा मोठा आहे की, हा सर्वच्या सर्व निरर्थक ठरेल यावर माझा विश्वास नाही. अजूनही ध्येय हेच ठेवले पाहिजे की पूर्वेच्या बाजूला जर्मन जनतेसाठी अधिक भूमी जिंकून घेणे.]

## □ जपानची शरणागती व युद्धाचा शेवट

१६ जुलै १९४५ : प्रे. ट्रुमन व चर्चिल यांची उद्धवस्त जर्मन चॅन्सेलरीला भेट.

१७ जुलै १९४५ : चर्चिल यांना निरोप मिळाला–

" Babies satisfactorily born." ( बाळे सुखरूप जन्मली.) अणुबॉम्बचा यशस्वी स्फोट अमेरिकेने केल्याचे हे वृत्त होते.

त्याच दिवशी ट्रुमन व चर्चिल यांनी निर्णय घेतला की जपानविरुद्ध अणुबॉम्ब वापरावयाचा. अडचण होती की स्टॅलिनला हे सांगायचे कसे व केव्हा ? ट्रुमनने सांगितले,

" I think I had best just tell him after one of our meettings that we have an entirely novel form of bomb......"

[ मला वाटते आपली एखादी बैठक आटोपल्यावर मी सहज बोलताना ही गोष्ट स्टॅलिनला सांगेन की नव्या धर्तीचा बॉम्ब आम्ही तयार केला आहे.]

२४ जुलै १९४५ : ट्रुमन यांनी स्टॅलिनला पोस्टडॅम परिषदेतील एक बैठक आटोपल्यावर वरीलप्रमाणे सांगितले. चर्चिल दुरून ही हालचाल पाहात होते. स्टॅलिनला वाटले नवा बॉम्ब म्हणजे–असेल थोडा अधिक विध्वंसक–कशाला चौकशी करा ! थोड्या वेळाने ट्रुमन व चर्चिल आपापल्या मोटारींची वाट पाहात जवळ जवळ उभे असताना चर्चिल यांनी विचारले, " How did it go ?" ( काय बोलणे झाले ?) " He never asked a question." (त्याने एकही प्रश्न विचारला नाही ट्रुमनने सांगितले.)

२५ जुलै १९४५ : चर्चिल पोस्टडॅमहून लंडनला परतले.

२६ जुलै १९४५ : इंग्लंडच्या निवडणुकीत हुजूर पक्षाचा पराभव जाहीर झाला. त्याच दिवशी सायंकाळी ७ वाजता चर्चिल यांनी निराश मनाने आपला राजीनामा राजेसाहेबांपुढे ठेवला.

ॲटली पंतप्रधान झाले.

चर्चिल यांनी त्या वेळेस जे पत्रक काढले त्यात ते म्हणतात,

" The decision of the British people has been recorded in the votes counted today. I have therefore laid down the charge which was placed upon me in darker time. I regret it I have not been permitted to finish the work against Japan. For this however, all plans and preparations have been made and results may come much quicker that we have hitherto been entitled to expect. "

[ ब्रिटिश लोकमताचा निर्णय आज जी मते मोजली गेली त्यात नमूद केलेला आहे. जी जबाबदारी माझ्यावर अत्यंत कठीण काळात सोपवण्यात आली होती त्यातून मी आज स्वत:ला मुक्त करून घेत आहे. मला याचे वाईट वाटते की जपान-विरुद्ध राहिलेले काम पुरे करण्याची संधी मला देण्यात आली नाही. याकरता सर्व तयारी पूर्ण झाली असून अपेक्षेपेक्षा कितीतरी लवकर याचे परिणाम दिसू लागतील. ]

चर्चिल यांनी या निवेदनात अशा रीतीने अणुबॉम्ब जन्माला आल्याचे ध्वनित केले होते.

**२७ जुलै ते ३१ जुलै १९४५ :** जपानच्या प्रमुख शहरांवर हजारो पत्रकांचा वर्षाव. " शरण या. "

**६ ऑगस्ट १९४५ :** हिरोशिमावर अणुबॉम्ब टाकण्यात आला.

**८ ऑगस्ट १९४५ :** शरणागती येईना. रशियाने जपानविरुद्ध युद्ध पुकारले ! !

**९ ऑगस्ट १९४५ :** नागासाकीवर अणुबॉम्ब टाकण्यात आला.

**१० ऑगस्ट १९४५ :** जपानी सरकारने शरणागती पत्करण्यास तयार असल्याचे कळवले.

**समाप्त**

● ● ●

[ लेखमाला संपली. पण जवळजवळ पावणेदोन वर्षे चालू असलेल्या या प्रचंड लेखमालेसंबंधी काही वादस्थळे उपस्थित झाली. वाचकांच्या अनुकूल-प्रतिकूल टीका व्यक्त झाल्या. या सर्वांच्या परामर्ष घेणारे लेखकाचे एक सविस्तर आत्मनिवेदन पुढील अंकी देण्याचा मानस आहे. ] सं.

# जगातील दहा
*सर्वश्रेष्ठ कलाकृती कोणत्या ?*
*सर्वश्रेष्ठ कथाकार कोणते ?*

# मॉमची निवड

**टॉलस्टॉय** : वॉर अँड पीस, **बाल्झॅक** : ओल्ड मॅन गोरिओत, **जेन ऑस्टेन** : प्राइड अँड प्रेज्युडिस्, **फ्लॉबर्त** : मदाम बोव्हारी, **एमिली ब्राँटे** : वूदरिंग हाइटस्, **हेन्री फीलिंडग** : टॉम जोन्स, **चार्लस डिकन्स** : डेव्हिड कॉपरफील्ड, **दोस्तोवस्की** : ब्रदर्स कारामाझाव, **स्तेंधाल** : दि रेड अँड दि ब्लॅक, **हर्मान मेलव्हिल** : मॉबी डिक.

चालू शतकातील श्रेष्ठ कादंबरीकार सॉमरसेट मॉम यांनी जागतिक वाङ्मयातील या दहा कलाकृतींची 'सर्वश्रेष्ठ' म्हणून निवड केलेली आहे व त्यांवर सरस भाष्ये लिहिली आहेत.

ही भाष्ये लिहिताना मॉमने या थोर कलाकारांच्या चरित्र-चारित्र्याची पार्श्वभूमीही मोठ्या विचक्षण रसिकतेने रेखाटली आहे.

मॉमच्या पारदर्शक प्रतिभेने चित्रित केलेली ही चरित्र-भाष्ये मनस्वी चित्तवेधक व विचारप्रवर्तक आहेत. चरित्र आणि साहित्य यांजमधील परस्पर संबंधांवर आधारलेली मॉमची ही ललितभाष्ये जागतिक वाङ्मयात अपूर्व ठरली आहेत.

**या पैकी टॉलस्टॉय व त्याच्या 'वॉर अँण्ड पीस' या कादंबरीवरील मॉमचे भाष्य 'माणूस'च्या पुढील अंकी—**

अनुवादक : प्रा. माधव मनोहर

लेखन-वाचन :

# गितार : पुनः कविता. झाकोळ : अजगर

१९६० ते १९६४ या चार वर्षांतील कविवर्य बोरकर यांच्या कवितांचा ' गितार ' हा संग्रह ' मौज प्रकाशना 'ने प्रसिद्ध केला आहे. या संग्रहाला स्वत: बोरकरांनी पहिल्यावहिल्या सुरांच्या हृद्य आठवणी जोडलेल्या आहेत. १९३२च्या बडोदे येथील साहित्य संमेलनात " मी माझा मज सापडलो " असे बोरकर सांगतात. गेली जवळजवळ ३४ वर्षे बोरकरांच्या कवितेचे वेड वाचकांच्या मनांतून ओसरलेले नाही, त्यामुळे बोरकर जेव्हा लिहितात की, " आता कधीकधी थकल्यासारखे वाटते," तेव्हा हे कालानुक्रमे घडणारे सत्य असूनही त्याची कबुली मनाला चटका लावते. अजूनही बोरकरांची प्रेमगीते वाचताना इतकी वर्षे त्यांनी कवितालेखन केले आहे यावर विश्वास बसत नाही. ' अशीच होती धुंद वेळ ती; गंध कोवळी सांज हवा ' अशा ओळींनी वाचक त्यांच्या कवितेत वाहावत जातो. बोरकरांच्या दिलाच्या सर्वच यादी अशा मोजक्या शब्दांत ते सांगतात. प्रेमाचे प्रमुख रूप ते दाखवतात. ते म्हणजे आता खंत नसलेल्या, परंतु चटका लावून गेलेल्या प्रीतीचे. परंतु प्रेमाची व्यावहारिक बाजूही सांगणारा मोतीसर ते चटकन अंगावर टाकतात.

" प्रीत वहावी संथ, ध्वनी विण या तटिनीसारखी " हे प्रेयसीने सांगितलेले पथ्य न पाळल्यामुळे काय होते ते सांगताना कवी म्हणतो,

" मी न मानिले पथ्य तुझे । आता झुरतो उरी
पुरुष उताविळ असाच । चुकतो पहिल्या वळणावरी "

संग्रहात प्रेमगीतांचा भरणा अधिक आहे. 'शब्द मनात करतो कीव', 'प्रसन्न बुद्ध' किंवा ' मराठीच्या ओव्या ' या इतर विषयांवरील कविताही पान उलटू देत नाहीत. कुणीही लुब्ध व्हावे, असा हा संग्रह आहे. किंमत रुपये चार आहे.

" खांद्यावर गलित सखी । वेल जशी झुकलेली
मांडीवर अन् गितार । तार तार थकलेली. "

अशा बोरकरी कवितेतून अनिच्छेने मोकळा होऊन चंद्रकांत पाटील व ना. धों. महानोर या कविद्वयांनी संपादिलेल्या **'पुनः कविता'** या संग्रहाकडे वळलो. संग्रहाचे प्रकाशक रामभान जाधव यांनी सुरुवातीलाच प्रास्ताविकात लिहिले आहे, "दिलीप" चित्रे व आरती प्रभु यांच्यापासून सुरू होणाऱ्या मराठी कवितेचे हे संकलित स्वरूप हे वाचले आणि छाती दडपलीच. उपक्रम मात्र स्वागतार्ह आहेच. या संप्रदायात ३४ कवी समाविष्ट केले आहेत. यांतील म. म. देशपांडे, पुरुषोत्तम पाटील, अंजली ठकार, केशव मेश्राम व वासंती गजेंद्रगडकर यांची जातकुळी निश्चित करण्यात

चूकभूल झाली असावी असे वाटते. या कवींच्या कविता सहजसुंदर व अर्थ समजायला विशेष सायास न पडणाऱ्या आहेत. खास नवसांप्रदायिकाचे यातील कवितालेखन वाचून ही माणसे अस्वस्थ आहेत, एवढाच ठसा मनावर उमटतो. र. कृ. जोशी यांची कविता अखेरीस कुठल्यातरी हस्ताक्षरांचे ठसे करून छापली आहे. त्यांच्याच शब्दांत या संप्रदायाविषयी काही सांगायचे तर–

चित्रे काय नि प्रभु काय
- झाले सगळ्यांचे हिशेब चुकलेले (वाचकांचे).
कितीही मिळवा तरी बेरीज भरत नाही,
–हातचा काही नाही–

हा संग्रह " प्रा. वा. ल. कुलकर्णी यांना" अर्पिला आहे. सश्रद्धतेचा असा पारंपारिक टिळा या कवितासंग्रहाने स्वीकारलेला पाहून बरे वाटले. हैद्राबाद येथे नुकत्याच पार पडलेल्या साहित्य संमेलनात प्रसिद्ध झालेल्या या संग्रहाची किंमत आहे अडीच रुपये. खरे म्हणजे या ऐवजी 'दाम–दोनशे पन्नास दिडक्या' असे म्हणायला हवे. नवसांप्रदायिकांना लवकर समजले असते.

झाकोळ–श्री. मनोहर शहाणे यांची 'मौज प्रकाशना'ने प्रसिद्ध केलेली ही कादंबरी बरीच निराकार आहे. १९४२ च्या चळवळीच्या काळातील एका कनिष्ठ, मध्यम वर्गातील कॉलेज विद्यार्थ्याची ही कथा अळणी झाली आहे. कादंबरीचा एक गुण निदान हा असावा की, प्रकरण संपताच पुढे काय होते याचे औत्सुक्य राहावे. असे औत्सुक्य उत्पन्न होत नाही. पहिल्या प्रकरणात या गोपाळच्या वडिलांचे जे चित्र उभे राहाते, त्यातले रंग पुढे कुठेच गडद होत नाहीत किंवा त्यांचे कादंबरीतील अस्तित्वही आवश्यक वाटत नाही. १९४२ च्या चळवळीतील सभांचे, मिरवणुकांचे जे चित्रण लेखकाने केले आहे ते सखोल नाही. भूमिगत असलेला भाऊराव भूमिगत


झाले ते होऊन गेले !

आता हेच ठरवा की यापुढे टोप्या, गंजीफ्रॉक, सॉक्स वगैरे होजियरी माल व सर्व तऱ्हेचे अद्ययावत् तयार कपडे

मुंबईस प्रार्थना समाजजवळ

एन्. व्ही. गोखले

यांचे दुकानातच घ्यावयाचे

राहून करतो काय ते समजत नाही. त्याला दरमहा पैशाची मदत करणारी ती वेश्या, पतितांतील काही चांगले दाखवणारा हा शाळकरी प्रयत्न वाटतो. तशीच ती प्रेमा-पाटणकर ! एक–दोनदाच ती नायकाला भेटते. कादंबरीत काही चांगला भाग आहे, तो म्हणजे प्रेमा पाटणकरांच्या उपकारकर्त्या वडिलांना गोपाळ नोकरी लागल्यावर पेढे देण्यासाठी जातो तेव्हाचे चित्रण. १६३ पृष्ठांना इतकाच चांगला भाग तारू शकत नाही. कादंबरीच्या अखेरीस प्रीतीचे स्वप्न भंग पावलेला गोपाळ वेश्येची पायरी चढताना दाखवलेला आहे. असंख्य तुटक तुटक व्यक्तींचे मुखवटे दाखवून काही संकलित परिपाक साधण्याचा प्रयत्न लेखकाला अभिप्रेत असावा असे वाटते. परंतु हे यश हातातून निसटलेले आहे. ही सर्व टीका अपेक्षूनच काही नवा प्रयोग साधण्याचा हा प्रयत्न असेल तर न कळे ! कादंबरीची किमत आहे रुपये सात.

मौजेच्या दिवाळी अंकात प्रथममुद्रण झालेली चि. त्र्यं. खानोलकर यांची 'अजगर' ही कादंबरी मौजेनेच पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली आहे. कादंबरी वाचकाला वाचता वाचता सहज समजावी अशी लेखकाचीही अपेक्षा नसावी. तीस–पस्तीस वर्षे एकाच सरकारी खुर्चीवर स्थिरावलेले हरिपंत चौगुले पेन्शनीत निघाले एवढी एकच गोष्ट पहिल्या पानावर ध्यानात येते. मग पुढे लेखक जे प्रकार वर्णन करतो ते वाचताना हरिपंत चौगुले किंवा आपण कुणाला तरी एकाला वेड लागले आहे अशी भावना होते. दुसऱ्या प्रकरणात हरिपंत चौगुले ज्या आंबेकरांच्या चाळीत राहतात तिथे आपण पोचतो. तिथे नाटकात कामे करणारी इंदू आहे, ढोपरपंचा नेसून हिंडणारे पावसकर आहेत, अरुंद गॅलरीत येरझारा घालणारे पेन्शनर धारप आहेत. ही माणसे कादंबरीत दाखल झाली की पुढे येणाऱ्या परिच्छेदात काय वाचावे लागेल याचा अंदाज लागत नाही. हे सर्व लेखन आपल्याकरिता नाही अशी वाचकांची हळूहळू खात्री पटू लागते तोच ११२ वे पृष्ठ येते. कादंबरी संपते. अखेरच्या परिच्छेदात एक तेलाची वाटीच एकदम महत्त्वाची होते. कादंबरी वाचून अल्पमती वाचकांचे डोके ठणकू लागेल या हिशेबाने ही तेलाची वाटी वाचकांच्या पुढे शेवटी ठेवली असावी असा अज्ञ विनोद करावासा वाटतो. असो. चि. त्र्यं. खानोलकर यांच्या लेखनाचे सध्या पुष्कळच कौतुक आहे. या कौतुकात सामील होण्याएवढी तैलबुद्धी आपल्यापाशी नसावी याची माझ्या मनात खंत आहे. कादंबरीची किंमत आहे रुपये चार.

**–अल्पमती प्राध्यापक**

लिव्हणं सवनीसरावाचं
गाणं तुका शिंद्याचं
अन् बोलणं दादा कोंडक्याचं

# विच्छा माझी पुरी करा

## पुण्याचं पब्लिक लई खुश झालं !

फड नसलेले दोन तालेवार तमासगीर मराठीच्या नगरीत आहेत. दोघांचंही खानदान आहे मातब्बर, लेखणी आहे जबर, जडण घडण आहे तोलामोलाची. लावणी लिहावी माडगुळकराच्या आण्णांनीच अन् वग लिहावा सवनिसाच्या वसंतरावांनीच. दोघांचंही लिव्हणं असं काही रंगतंय बघा ! जसं काही कळीदार कपूरी पान !

दोघेही पट्टीचे लेखणीस. पण विन फडाचे फडणीस. यांनी शिजवावं आणि इतरांनी शालू-पैठण्या नेसून मुरकत, ठुमकत पंगतीला वाढावं ! पण औंदा वसंतराव सवनिसांनी घेतलं की मनावर ! राव स्वता जातीनं शिरी पटका बांधून बोर्डावर आलेत. राव आता खाली उतरू नका ! यवढी अर्जवणी ऐकाच ! तुमच्या जरिपटक्यावर मराठी रसिक मंडळी मानाचं पीस खोवतील अन् खोवलंच की परवा !

'विच्छा माझी पुरी करा' हा वग वसंतरावांनी लिहिला आहे. त्यातील लावण्याही त्यांच्या स्वत:च्याच आहेत. दादा कोंडके यांच्या फडाने तो सादर केला आहे. पोरगी सुस्थळी पडली की, बापाला आनंद होतो तसा लेखकालाही. आपलं लेणं चांगल्याच्या हातीच जावं असं वाटत असतं. हे भाग्य फार थोड्यांना लाभतं. बहुधा ते भलत्यांच्या हाती पडतं आणि त्याचं मातेरं होतं. पण वसंतरावांचं हे लेणं एका चतुराच्या हाती पडलंय. त्या चतुराने त्याचं चीज केलंय.

वगाचं कथानक हलकं फुलकं आहे. तसंच असायला हवं. एका हवालदाराचं (दादा कोंडके) प्रेम असतं मैनावती (शर्मिला) नावाच्या नाचणाऱ्या छबकडीवर. तिचं म्हणणं असतं की, हवालदारानं कोतवालीची 'पोस्ट' मिळवावी ! पण कोतवाल काही लौकर मरत नाही ! मग एके दिवशी तो पटकन् मरतो. पण राज्याचा परधानजी कोतवालाची जागा आपल्या बायकोच्या भावाला—आप्पासाहेबाला—देतो. वशिला ! दुसरं काय ! हे आप्पासाहेब येडपटच असतात. शेळ्या चारणारे आप्पासाहेब एकदम कोतवाल होतात. मैनावती हवालदारापाशी हट्ट धरते की, "काय बी करा पण कोतवाल व्हा !" अन् मग विलंदर हवालदार

कारवाया आणि करामती करून ही कोतवाली मिळवतो. अशी ही गमतीची कथा आहे.

राजाचा भोंगळ राज्यकारभार, प्रधानाची वशिलेबाजी, नालायक अधिकारी, प्रेमात पडणारी माणसं, नाटकं आणि नाटकवाले, चुकार नटनटी वगैरे सर्वांवर नेमक्या 'जागा' टिपून वसंतरावांनी खडे मारले आहेत. प्रेक्षक त्या प्रत्येक 'जागे'ला टाळी देतात. प्रेम जसं मागून मिळत नाही, ते मिळवावं लागतं, तशीच टाळी मागून मिळत नाही ती मिळवावी लागते. वसंतराव आणि दादा कोंडके यांनी प्रेक्षकांकडून टाळी मिळवली. अगदी कडकडून मिळवली. हा रंगतदार वग प्रत्येकाने एकदा बघावाच.


वग आणि लावणी अशी रंगली पाहिजे की, पब्लिकला कळलं नाही पाहिजे की कोंबडा कधी आरवला. हे जबरदस्त सामर्थ्य ह्या फडात आहे. रातच्या साडेनवाला नमन झालं. दोन केव्हा वाजले ते समजलंही नाही. वसंतरावांचे संवाद खुसखुशीत आहेत. अश्लीलतेपासून शृंगार त्यांनी सुटा करून दाखविला आहे. तमाशा हे एक मनोरंजनाचे अत्यंत सामर्थ्यवान् साधन आहे. पण अनेक फडकऱ्यांची अशी समजूत झालेली आहे की, अचकट, विचकट बोलल्याशिवाय तमाशा 'होत' नाही. ह्या त्यांच्या समजुतीमुळेच खऱ्या चवीचा रसिकवर्ग तमाशाला नाके मुरडतो. पण 'विच्छा माझी पुरी करा' ह्या दर्जाचे तमाशे जर पुढे येतील, तर—तर नाटकवाले सुधारतील ! केल्याने होत आहे रे !

वसंतराव सबनीस यांनी आतापर्यंत अशाच वरच्या, दर्जेदार, पण अतिशय खुसखुशीत पातळीवरून वग लिहिले. पण ते सुस्थळी न पडल्यामुळे, ते मासिकांतून जितके गाजले व रंगले, तेवढे बोर्डावर रंगू गाजू शकले नाहीत. करणारावर फार अवलंबून असतं बघा. पण हा वग मात्र एका कुशल कलावंताच्या हाती पडला आहे; त्यामुळे नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच प्रेक्षकांना मनमुराद हसविणारी, रंगविणारी रात्र लाभली. 'विच्छा माझी पुरी करा' ह्या तमाशाचं ऊर्फ लोकनाट्याचं यश खरोखर असामान्य आहे. वसंतरावांना आता नाडी बरोबर सापडली आहे. त्यांनी आता हा धरलेला हात (कलेचा !) सोडू नये. 'विच्छा माझी पुरी करा' हा प्रयोग प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतला. लोकनाट्याला इतक्या वरच्या दर्जाच्या प्रेक्षकांकडून एवढी प्रचंड साथ मिळणे हे ह्या यशाचे गमक आणि लेखककलावंतांना मार्गदर्शन आहे. वसंतरावांच्या खोचदार, चवदार आणि नखरेल संवादांना प्रेक्षक मुक्त मनाने दाद देत होते. त्यांच्या कित्येक वाक्यांतला विनोद फणसाच्या गऱ्यांप्रमाणे खूप आत दडलेला होता. पण प्रेक्षकांनी टाळ्यांनी कडाडून दाद देऊन तो क्षणीच झेलला. हे यश लेखकाचे.

**नवे कामण्णा**

ह्या प्रयोगात यशाचा फार मोठा वाटा एका कलंदर कलावंतांचा आहे. दादा

बमालूम बतावणी



शाहीर दादा कोंडके आणि दादा सबनीस

कोंडके हा तरुण कलावंत आम्हांला नव्यानेच ठाऊक झाला. रसिकहो, तुम्हांला सांगतो, हा गृहस्थ असामान्य हुन्नरबाज आहे. आजपर्यंत हा माणूस झाकून कसा राहिला, याचे आश्चर्य वाटते. ह्या माणसाची तुलनाच करायची झाली तर आजच्या रंगमंचावरच्या एकाच कलावंताशी करता येईल. ती म्हणजे वसंत शिंदे यांच्याशी ! अन् गतकालातील कलावंताशी करायचीच झाली तर ती करावी लागेल दिनकर कामण्णा यांच्याशी ! दादा कोंडके यांचे साधे बोलणे–चालणेही खटयाळपणाचे आहे. त्यांचा मिस्किल अभिनय काही एका वेगळयाच ढंगाचा आहे. त्यांना मुद्दाम अभिनय असा करावाच लागत नाही. हा माणूस अभिनय जगतोय. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव, बोलण्याची लकब आणि हालचाली अकृत्रिम आहेत. साडेचार तास ह्या माणसाने प्रेक्षकांना गुदगुल्या केल्या. स्वतः रचलेली मुंबईची लावणीही त्याने बहारीने म्हटली. दादा कोंडके यांनी स्वतःला लाभलेल्या अलौकिक कलेचा उपयोग ह्याच धर्तीची दर्जेदार लोकनाटचे सादर करण्याकडे करावा. अश्लीलतेवाचूनही प्रेक्षकांना धबधब्यासारखे ते हसवू शकतात हे प्रेक्षकांना पुरेपूर समजले आहे. त्यांनी स्वतःही हे ध्यानी ठेवावे ही हळूच सूचना !

श्री. तुकाराम शिंदे यांनी लावण्यांना दिलेल्या चाली छान आहेत. ते स्वतःही गोड म्हणतात. ' राया मला पावसात नेऊ नका ' ही लावणी त्यांनी सुरेख म्हटली. चाल तर चांगलीच आहे. शर्मिला आणि अलका यांची कामे उत्तम होतात. पण ही अलका वांगडया न घालता का वावरते ? कोतवालाची बावळट भूमिका झकास होते. उर्मिला नाचण्यात किती तरबेज आहे व तिने किती परिश्रम घेतले आहेत हे स्पष्ट जाणवते. एकंदरीत हा खेळ बसविण्यासाठी वसंतराव सबनीस, दादा कोंडके, तुकाराम शिंदे, नारायणराव, शर्मिला, अलका वगैरे प्रत्येक कलावंताने परिश्रम अपार घेतले आहेत, हे क्षणोक्षणी जाणवते. तरी दुय्यम दर्जाच्या पात्रांनी आपल्या वाटयाला आलेली अक्षरे तोंडपाठच करावीत ही सूचना !

वसंतराव सबनिसांनी दादा कोंडक्यांनिशी केलेली ' बतावणी ' उत्तम रंगली. वसंतरावांनी संवादांत बोलून दाखविलेल्या लावणीला आणि काव्याला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. एकूण, वसंतरावांना नाडी सापडली हे खरं. —प्रियदर्शी

जगाच्या पाठीवर

वा. दा. रानडे

## □ सरकार आणि लोकमत

लोकशाहीत लोकमताचा प्रभाव सरकारी धोरणावर पडतो असे म्हटले जाते पण हे कितपत खरे आहे? लोकशाही राष्ट्रांच्या आघाडीवर असलेल्या अमेरिकेत तरी काही प्रश्नांच्या बाबतीत उलटच अनुभव येत आहे; म्हणजे लोकमताचा प्रभाव सरकारी धोरणावर पडण्याऐवजी सरकारी धोरणाचाच प्रभाव लोकांवर पडून लोकमतात बदल होत आहे. अण्वस्त्रांसंबंधी अमेरिकेत लोकमत काय आहे, याची पाहणी कोलंबिया विद्यापीठाचे युजिन जे. रोसी यांनी १९५९-१९६३ साली केली. त्यात सरकारी धोरणानुसार या प्रश्नासंबंधीच्या लोकमतात बदल होत असल्याचे त्यांना आढळून आले. १९५९ साली ७७ टक्के लोकांनी अण्वस्त्र चाचणीबंदीस अनुकूल मत दर्शविले होते. पण जून १९६१ मध्ये हे प्रमाण २७ टक्क्यांपर्यंत खाली आले. १९६३मध्ये चाचणीबंदीच्या करारावर सह्या झाल्यानंतर पुन: पाहणी केली, तेव्हा लोकमताचा लंबक पुन: अण्वस्त्र चाचणीबंदीकडे झुकलेला दिसला व ६१ टक्के लोकांनी बंदीच्या बाजूने अनुकूलता दर्शविली. या प्रश्नावर रशियाच्या धोरणानुसार अमेरिकन सरकारच्या धोरणात बदल होत होता आणि अमेरिकन सरकारच्या धोरणानुसार लोकमत बदलत होते.

लोकमताची ही पाहणी करताना उच्च शिक्षण घेतलेल्या आणि राजकारणाशी अधिक परिचित असलेल्या लोकांची मते वेगळी काढून त्यांचे वेगळे पृथक्करण केले, तेव्हा या प्रश्नावर त्यांची मते ठाम नसल्याचे दिसून आले. सरकारी धोरणात बदल झाला की या वर्गाच्या मतात त्यानुसार लागलीच बदल होत होता.

जागरूक लोकमत हा लोकशाहीचा आधार आहे असे म्हणतो. पण सुशिक्षित वर्गाचे मतसुद्धा सरकारी धोरणातील बदलानुसार बदलू लागले तर मग जागरूक लोकमत या शब्दाला फारसा अर्थ राहणार नाही.

## □ नोकरी करणाऱ्या महिला

जगातील निरनिराळ्या देशांत नोकरी करणाऱ्या स्त्रियांची काय परिस्थिती आहे, याचा अभ्यास करण्यासाठी श्रीमती व्हायोला क्लेन यांनी एकवीस देशांची पाहणी केली. बहुतेक सर्व देशांत १९५१ ते १९६१ या दशकात नोकरी करणाऱ्या महिलांचे प्रमाण वाढले असल्याचेच दिसून आले. फक्त फ्रान्स, पोर्तुगाल आणि तुर्कस्थान हे तीन देश याला अपवाद असून तेथे नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण घटल्याचे आढळले. एकूण कामगारांमध्ये महिला २५ ते ३५ टक्के होत्या. ऑस्ट्रे-

लियात त्यांचे प्रमाण ४० टक्के तर पोर्तुगाल आणि स्पेनमध्ये ते २० टक्क्यांपेक्षाही कमी होते. नोकरी करणाऱ्या स्त्रियांमध्ये बहुसंख्य स्त्रिया अविवाहित असतात ही समजूत खरी नाही. आपल्या देशात तसे असेलही; पण परदेशात तशी परिस्थिती नाही. फ्रान्स, स्वीडन, ब्रिटन व अमेरिकेत नोकरीवाल्या महिलांमध्ये बहुसंख्य विवाहित आहेत. स्त्रियांनी नोकरी करण्यावर कोणतेही निर्बंध नसले तरी त्यांनी नोकरी करण्यास प्रवृत्त होऊ नये अशी कर–योजना नेदर्लंडस व डेन्मार्कमध्ये आहे.

स्त्रिया अधिक प्रमाणात नोकऱ्या करू लागल्या, पण नोकरीतील त्यांच्या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने फारशी प्रगती झालेली नाही. कामाचे तास स्त्रियांच्या सोयीचे नसतात. त्यामुळे अनेक स्त्रियांना पूर्ण वेळच्या नोकऱ्यांऐवजी अर्ध वेळच्या नोकऱ्या स्वीकाराव्या लागतात. पण कामगार संघटनांचे मालकांशी जे करार होतात त्यांत अर्ध वेळ नोकरी करणारांचा समावेश नसल्याने त्याचा फायदा स्त्रियांना मिळत नाही. स्त्री-पुरुषांना सारख्या प्रकारच्या कामात सारखा पगार मिळावा अशी आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची शिफारस आहे. पण ब्रिटन, अमेरिका, कानडात याप्रमाणे स्त्रियांना सारखा पगार दिला जात नाही.

## सुरुवातीचा विरोध मावळतो

आपल्याकडे बहुसंख्य स्त्रिया नोकऱ्या करतात. त्यात आवडीपेक्षा परिस्थितीची निकड हेच महत्त्वाचे कारण असते. पाश्चात्य राष्ट्रांत तशी परिस्थिती नाही. राहणीचा दर्जा वाढविण्यासाठी पैसा हवा म्हणून नोकरी करणाऱ्या स्त्रिया तेथे अधिक. स्त्रियांनी नोकऱ्या केल्याने पतिपत्नींच्या संबंधांवर प्रतिकूल परिणाम झालेला नाही, असे ब्रिटनमधील बर्मींडस् शहरातील नोकरीवाल्या स्त्रियांच्या पाहणीत पर्ल जेफ्कोल्ट यांना आढळून आले. आपल्या पत्नीने नोकरी करावी ही कल्पना पतींना सुरुवातीस नापसंत असते. पण त्यांपैकी फारच थोड्यांनी आपल्या पत्नींस नोकरी करायला मनाई केली आणि पत्नीचा दुसरा पगार हाती पडू लागताच त्याचे फायदे त्यांना दिसून येऊ लागले. घरात ते अधिक लक्ष घालू लागले. घराची सजावट, दुरुस्ती, धुलाई, इस्त्री वगैरे कामे आपण होऊन करू लागले पति-पत्नींचे संबंध अधिक निकटचे झाले. पत्नीजवळ पैसा असल्याने खर्चासंबंधी होणाऱ्या कटकटी दूर झाल्या असे या पाहणीत दिसून आले.

स्त्रीच्या नोकरीचा मुलांवर काय परिणाम होतो ? त्यांची आबाळ होते का ? मूल शाळेत जाण्याच्या वयाचे होईपर्यंत स्त्रीने नोकरी करण्यास इंग्लंडमध्ये लोकमत प्रतिकूल दिसते. पण नोकरीवाल्या स्त्रियांत अशा स्त्रियांचे प्रमाण तेथे फार थोडे असते आणि या थोड्या स्त्रियांपैकी जवळजवळ सर्व अर्ध वेळ काम करणाऱ्या असतात. पूर्ण वेळ नोकरी करणाऱ्या कोणी असल्याच तर घरी मुलांकडे लक्ष देणारे कोणीतरी निकटचे नातलग असतात. इतर स्त्रियांच्या मुलांपेक्षा नोकरीवाल्या स्त्रियांची मुले अधिक आजारी असल्याचे आढळले नाही. शाळेतील त्यांची हजेरी तर उलट

अधिक चांगली दिसून आली. ही मुले शिक्षणात कोणत्याही प्रकारे मागे नव्हती. तसेच इतर मुलांपेक्षा त्यांच्यात गुन्हेगारी प्रवृत्ती अधिक असल्याचा पुरावाही मिळाला नाही.

स्त्रिया पुरुषांइतक्या कार्यक्षमतेने काम करीत नाहीत असा एक समज आहे पण तोही खरा नाही. विवाहित स्त्रिया पुरुषांइतक्याच कार्यक्षमतेने काम करतात असे ब्रिटनमधील पाहणीत आढळून आले.

## □ वाचलेले अधिक लक्षात राहाते

माणसाच्या वाचलेले अधिक लक्षात राहाते, की ऐकलेले अधिक लक्षात राहते ? लक्ष देऊन कोणतीही गोष्ट केली तर ती लक्षात राहतेच; पण मुद्दाम विशेष प्रयत्न न करता वाचताना आपले अधिक लक्ष असते की ऐकताना असते ? अमेरिकेतील येन युनिव्हर्सिटी आणि विस्कोन्सिन युनिव्हर्सिटीच्या दोन प्राध्यापकांनी काही विद्यार्थ्यांवर केलेल्या प्रयोगात असे दिसून आले की ऐकलेल्यापेक्षा वाचलेलेच अधिक लक्षात राहाते. हा प्रयोग २०३ विद्यार्थ्यांवर करण्यात आला. त्यांचे पाच गट पाडण्यात आले. एका गटाला मानसशास्त्राच्या पुस्तकातील १४०० शब्दांचा एक उतारा वाचण्यास सांगितले. तो वाचण्यास त्यांना बारा मिनिटे लागली. हे पुस्तक साधारणपणे कॉलेजच्या क्रमिक पुस्तकांइतकेच अवघड होते. दुसऱ्या गटाला हाच उतारा एका वाचकाने वर्गात वाचून दाखविला. तिसऱ्या गटाला टेलिव्हिजनवर आणि चौथ्या गटाला रेडिओवर हाच उतारा ऐकविण्यात आला. पाचव्या गटाला त्याच पुस्तकातील आणखी एक उतारा वाचण्यास सांगितले. नंतर सर्व विद्यार्थ्यांना ३३ प्रश्नांचा एक पेपरच सोडविण्यास सांगितले. ज्यांनी उतारा वाचला होता त्या विद्यार्थ्यांनी २४ ते २५ प्रश्नांची बरोबर उत्तरे दिली. ज्यांनी उतारा ऐकला होता त्या विद्यार्थ्यांनी १८ ते २० प्रश्नांची बरोबर उत्तरे दिली. उतारा ऐकणाऱ्या तिन्ही गटांच्या विद्यार्थ्यांचे उत्तरात विशेष फरक नव्हता. म्हणजे वाचून दाखविणारी व्यक्ती प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांपुढे असो किंवा नसो ऐकलेले लक्षात राहण्यात त्यामुळे फारसा फरक पडत नाही.

## □ अमेरिकेत सात सेकंदांस एक गुन्हा

वर्तमानपत्रांत रोज खून, दरोडे, घरफोड्यांच्या बातम्या वाचल्या की आपल्या देशात गुन्हेगारी खूपच वाढली आहे, असे वाटते. गुन्ह्यांच्या संख्येत वाढ होत आहे हे खरेच आहे; पण अमेरिका, इंग्लंडसारख्या देशांत या प्रश्नाने जेवढे गंभीर स्वरूप धारण केलेले आहे, तेवढी गंभीर परिस्थिती आपल्याकडे अजून निर्माण झालेली नाही. अमेरिकेत दर सात सेकंदांना एक गुन्हा घडतो तर ब्रिटन-मध्ये दर पंचावन्न सेकंदांना घडतो. भारतात मात्र साधारणपणे दर नव्वद

मिनिटांना एक गुन्हा घडतो. तेवढ्या वेळात अमेरिकेत ७७१ व इंग्लंडमध्ये ९८ गुन्हे घडलेले असतात.

दरोडे, लूट, घरफोड्या, चोऱ्या वगैरे बहुतेक प्रकारच्या गुन्ह्यांची संख्या १९६१ पेक्षा १९६३ मध्ये वाढली. पुढच्या दोन वर्षांचे निश्चित आकडे अजून उपलब्ध नाहीत. खून व खुनाच्या प्रयत्नांत मात्र घट दिसून आली. हिंदमध्ये १९६१ साली ११,१८८ खून किंवा खुनांचे प्रयत्न झाले. १९६३ साली हा आकडा १०,७५४ होता. फसवणूक, फंडांचा दुरुपयोग, बनावट जाहिराती, भोसकाभोसकी, लैंगिक गुन्हे यांसारख्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे, असे अखिल भारतीय गुन्हे प्रतिबंधक संस्थेने मिळविलेल्या माहितीवरून दिसते.

## ☐ अशुभ वर्ष

विज्ञानाची कितीही प्रगती झाली जरी सर्वसामान्य माणूस आपल्या अंध समजुती सोडत नाही. जपानमध्ये यंदाचे 'हिनोमा' हे वर्ष आहे दर साठ वर्षांनी हे वर्ष येते व मुलींच्या जन्माचे दृष्टीने ते अशुभ मानले जाते. या वर्षी जन्मलेल्या मुलींना पुरुष टाळतात. त्यांच्याशी कोणी लग्न करावयास तयार होत नाही. कारण नवऱ्याला त्या ठार करतात अशी समजूत आहे. या अशुभ वर्षी आपल्या घरी मुलीचा जन्म नको म्हणून बरेच जपानी या वर्षी संततिनियमन करतील व जनन प्रमाणात बरीच घट होण्याचा संभव आहे. मुलगा होणार की मुलगी हे काही आपल्या हातचे नाही. तेव्हा या वर्षी प्रसूतीच नको म्हणून १९६५ च्या दुसऱ्या सहामाहीत गर्भपातांची संख्या वाढल्याचेही काही जपानी डॉक्टरांनी सांगितले.

● ● ●

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

# भिंतीच्या तुंबड्या

## सुधाकर राजे

### ● मद्यपी मर्कटाच्या मानवचेष्टा

आधीच मर्कट तशातही मद्य प्याला म्हणजे अनर्थ होतो, अशी आतापर्यंतची समजूत होती; पण शास्त्रज्ञांनी आता तो केवळ एक लोकभ्रम असल्याचे सिद्ध केले आहे. चिंपाझी माकड माणसापेक्षा अधिक दारू पिऊन डोके ताळ्यावर ठेवू शकते आणि ओरांग उटांग तर झिंगण्याइतकी कधीच पीत नाही, असे शास्त्रज्ञांना आढळून आले आहे. म्हणजे मद्य प्यालेले मर्कटदेखील मानवचेष्टा करीत नाही असे म्हटले पाहिजे. दिल्लीत सर्रास चालणाऱ्या कॉकटेल पार्ट्यांत पेगवर पेग मारणाऱ्या मानवश्रेष्ठांनी चिंपाझी माकडाइतका ' स्टॅमिना ' दाखविला तर ? अर्थात्, ओरांग उटांग माकडाइतका माणूस कधी शहाणा होईल अशी वेडी आशा नकोच. पण दारूबंदीचा पुरस्कार करणाऱ्या भारतात निदान माणसापुढे माकडांचा आदर्श ठेवायला तरी हरकत नाही. प्रश्न एवढाच की, पिऊनही डोके शाबूत ठेवणारी ही माकडे फुकटची आणि विकतची हा महत्त्वाचा फरक ओळखण्याइतकी तल्लख डोक्याची निघाली तर घोटाळा व्हायचा.

माणसाने एकदा पाजायला सुरुवात केली म्हणजे तो केवळ माकडांना पाजून थांबला तरच नवल ! अमेरिकेत एका विमानतळावर जेट विमानांना धोका उत्पन्न करणाऱ्या गल् पक्ष्यांचा बंदोबस्त करण्यासाठी दारूत भिजवलेले दाणे पसरण्यात आले. ते खाऊन 'चढल्यावर' ते पक्षी नशेत ओरडायला लागले. ते वरळणे ऐकून बाकीचे पक्षी भीतीने दूर राहिले–आणि धोका टळला. आहे की नाही युक्ती ? आता ते झिंगलेले पक्षी अद्वातद्वा असे नक्की काय बोलले, याचा माणसांना पत्ता लागला नाही तरी सभ्य पक्ष्यांना ते गालिप्रदान दूर राहण्याइतके गलिच्छ वाटले असावे हे उघड आहे. पण एक भीती आहे व ती म्हणजे माणसाला ज्याप्रमाणे एकच प्याला चटक लावतो, त्याप्रमाणे हा एकच दाणा खाऊन ते गल् पक्षी चटावले तर ? तर काय, एक आधुनिक 'पक्षीतीर्थ'च तयार व्हायचे.

### ● लोकसभेतले धेनुवल्लभ

लोकसभेतले लोक कुठल्या गोष्टीचा काथ्याकूट करतील हे कृष्णावतारी एकाच वेळी दोन-दोन प्रजासत्ताक राज्यांचा अध्यक्ष असलेल्या देवालादेखील सांगता यायचे नाही. आपल्या लोकसभेत मागे चटणीवर चर्चा झाली होती आणि इडली डोशावर प्रश्नोत्तरी झडली होती. आपल्याकडे हा प्रकार, तर इंग्लंडच्या लोकसभेत

परवा एका अजब सरकारी परवान्याची प्रत पेश करावी लागली. तो परवाना कसला ?–तर कानडाहून बोटीने इंग्लंडला येणाऱ्या एका गाईला लिव्हरपूल बंदरात उतरू देण्याचा ! आता हिंदुस्थानातल्या बहुतेक कुठल्याही शहरात इडली-डोसा हा मध्यमवर्गीय माणसाच्या जीवन–मरणाचा प्रश्न झाला असला तरी त्याच्या चर्चेला चटणीची चव आणावी लागली. पण इंग्लंडांत सुखासमाधानाने चरण्यासाठी येणाऱ्या एका गरीब बिचाऱ्या गाईत थेट तेथल्या लोकसभेला दिलचस्पी वाटण्याचे काय कारण ? कारण एकच संभवते– इंग्लंडच्या लोकसभेतले बहुतेक सदस्य निखालस धेनुवल्लभ असले पाहिजेत.– सबूर ! ही माझी शिवी नाही, एका इतिहास-प्रसिद्ध इंग्रज लोकसभा–सदस्याचेच प्रांजल मत आहे. शेरिडन हा सुप्रसिद्ध नाटककार लोकसभेचा सदस्य होता व तेथे भाषण करताना एकदा म्हणाला, "या लोकसभेतले अर्धे सदस्य गाढव आहेत." लगेच 'शब्द मागे घ्या' चा गलका झाला. शेरिडन म्हणाला. "ठीक आहे. या लोकसभेतले अर्धे सदस्य गाढव नाहीत." ते कोण आहेत हे आता उघडकीला आले.

## ● घोरण्याची विद्या

"कुतो सुखार्थिनो विद्या, कुतो विद्यार्थिन: सुखम्" असे शाळेत असताना शिकलो होतो. अर्थात् त्या वेळी ते पटले नाहीच, पण आता तर ती चक्क थाप असल्याचे उघडकीला आले आहे. मॉस्कोजवळच्या एका शहरात एक हजार रशियन लोक म्हणे झोपेत इंग्रजी शिकण्याचा प्रयोग करून बघत आहेत. म्हणजे त्यांना इंग्रजी व्याकरणाची ध्वनिमुद्रिका झोपण्याच्या वेळी अन् गाढ झोपेतही वाजवून दाखविण्यात येते व अशा पद्धतीने अवघ्या दीड महिन्यात त्यांना इंग्रजी शिकविण्यात येणार आहे.

याचा अर्थ एकच व तो म्हणजे यापुढे विद्यार्थ्याने चक्क झोपा काढल्याखेरीज त्याला ज्ञान मिळणे नाही. आता वर्गात पेंगणारा मुलगा ज्ञानलालसेचे प्रतीक ठरणार. स्कॉलर विद्यार्थ्याने तर रात्रीचा दिवस करण्याऐवजी दिवसाची रात्र केली तरच पहिला नंबर येण्याची खात्री. परीक्षा जवळ आली की "कुंभकर्ण छाप गोळी म्हणजेच यशाची गुरुकिल्ली" अशा जाहिराती पेपरात फडकू लागतील. युनिव्हर्सिटीत पहिला आलेला कुमार गिरीश मुलाखत घेणाऱ्या वार्ताहराला जांभई देऊन विनयशीलपणे सांगेल : "माझ्या यशाचे सारे श्रेय माझ्या आईच्या अंगाई–गीताला आहे."

वाईट एकाच गोष्टीचे वाटते– हा झकास प्रयोग आमच्या वेळी झाला असता तर ! शालेय जीवनात आम्हांला झोपा काढताना पाहून "कधी कारट्याचे डोळे उघडणार आहेत कुणास ठाऊक !" अशा द्व्यर्थी शब्दांत मातोश्रींनी आमचा कित्येकदा उद्धार केला असेल. त्याच्या ऐवजी आमचे लयबद्ध घोरणे ऐकून त्या कौतुकाने म्हणाल्या असत्या : "किती बाई जोरात अभ्यास करतोय माझा राजा !" छे, चुकलंच सगळं.

● ● ●

## कलात्मक व बोधप्रद चित्रनिर्मितीचा आदर्श

# बिमल रॉय

### शरद गोखले

नवीन वर्षाची सुरुवात सामान्यत: उत्साहाने व नव्या आशा-आकांक्षांनी करण्यात येते. परंतु, भारतीय जनतेच्या वाट्याला हे सुख यंदा आलेले नाही. भारताचे महामंत्री कै. लालबहादूर शास्त्री यांच्या निधनापूर्वी केवळ दोनच दिवस मुंबईचे प्रख्यात निर्माते व दिग्दर्शक श्री. बिमल रॉय यांना मृत्यू आला. त्यांच्या मृत्यूने मुंबईमध्ये बोधपर, कलात्मक, चित्रपट निर्माण करणारा एकमेव निर्माता नाहीसा झालेला आहे. सध्या मुंबईतील चित्रपट व्यवसायाला साचेबंद स्वरूप आले आहे. एकाच वळणावर जाणाऱ्या कथा, भरपूर उन्मादक नृत्ये व अर्थहीन गीते, नैनिताल महाबळेश्वर, उटी, काश्मीर येथील तीच तीच दृश्ये व ईस्टमन कलरचे आकर्षण एवढ्या भांडवलावर 'चालणारा' चित्रपट बनू शकतो. हे तेथील निर्मात्यांचे सूत्र आहे. परंतु, या मोहाला बळी न पडता आपल्या चित्रपटांचा दर्जा कायम ठेवून शेवटपर्यन्त अत्यंत लोकप्रिय असणारा निर्माता–दिग्दर्शक म्हणून श्री. बिमल रॉय यांचाच फक्त निर्देश करता येत असे. उत्कृष्ट कथा निवडून व मनोरंजनाला बाधा येऊ न देता ते आपल्या चित्राद्वारे समाज–शिक्षण करीत असत. हेच त्यांच्या चित्रपटांचे प्रमुख वैशिष्टय होय.

**'न्यू थिएटर्स'चा काल**

कै. बिमल रॉय यांचा जन्म ता. १२ जुलै १९०९ रोजी डाक्क्यामधील एका श्रीमंत कुटुंबात झाला. महाविद्यालयीन शिक्षणाची फार मोठी पार्श्वभूमी त्यांच्या नावामागे नाही. परंतु अगदी तरुण वयातच त्यांनी आपले क्षेत्र निश्चित केले. १९३२ मध्ये तेव्हा अत्यंत प्रसिद्ध असलेल्या 'न्यू थिएटर्स' या कंपनीमध्ये ते असिस्टंट कॅमेरामन म्हणून सहभागी झाले. केवळ तीन वर्षातच त्यांनी या क्षेत्रामध्ये आपला प्रभाव पाडला व लौकरच ते स्वतंत्र कॅमेरामन झाले. आश्चर्याची गोष्ट अशी की त्यांनी स्वतंत्रपणे चित्रित केलेले 'नालंतागल' हे पहिले चित्र तामिळ होते. या चित्राचे चित्रीकरणाबद्दल त्यांना मिळालेली ट्रॉफी त्यांनी शेवटपर्यंत जपून



ठेवलेली होती. त्या वेळचे अत्यंत श्रेष्ठ दिग्दर्शक श्री. पी. सी. बरुआ ह्यांनी श्री. रॉय यांना आपल्याकडे बोलावून घेतले व त्यानंतर श्री. बरुआ यांचेसाठी त्यांनी 'देवदास' (कै. सैगलचा), 'मुक्ती', 'बडी दीदी', 'मंझील', या चित्रांचे चित्रिकरण केले. या तीन वर्षांत श्री. रॉय यांनी हळूहळू दिग्दर्शनात रस घेण्यास सुरुवात केली व श्री. बरुआंकडून असंख्य तांत्रिक गोष्टींबाबत माहिती मिळवली. 'मंझील' या चित्रपटातील काही महत्त्वाची दृश्ये त्यांनी श्री. बरुआंचे उपस्थितीत स्वतःचे जबाबदारीवर टिपली. नवीन तंत्रज्ञांना संधी देण्यास, उत्सुक असणाऱ्या 'न्यू थिएटर्स'मध्ये श्री. रॉय यांचे श्रम वाया जाणेच शक्य नव्हते. 'न्यू थिएटर्स'ने त्यांच्यावर 'उदयेर पाथे' या बंगाली चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी टाकली.

या चित्रपटाचा बंगालमध्ये चांगलाच बोलबाला झाल्यावर बिमल रॉय यांनी हेच चित्र 'हमराही' या नावाने हिंदीमध्ये तयार केले. मालक–मजूर प्रश्नावर निर्माण झालेले हे पहिलेच चित्र. यामध्ये त्यांनी समाजवादाचा पुरस्कार केला. मात्र त्याचबरोबर चित्रपटाचे स्वरूप प्रचारकी होणार नाही याची काळजी घेतली. आज राष्ट्रगीत असलेले 'जन गण मन' या चित्रपटात वापरलेले होते. वास्तववादी चित्रांची लाट येण्यापूर्वी श्री. रॉय यांनी हे वास्तववादी चित्र निर्माण केले होते. त्यानंतर त्यांनी कलकत्त्यातच 'अंजनगड', व 'पहेला आदमी' ही चित्रे तयार केली. त्यांपैकी दुसरे चित्र नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे जीवनावर व कार्यावर आधारित होते.

स्वातंत्र्यपूर्व कालामध्ये 'सेन्सॉरच्या कात्रीत न सापडता असे चित्र तयार करणे म्हणजे अक्षरशः तारेवरची कसरत होती, परंतु, कलकत्त्यातील मर्यादित यशामध्ये या थोर कलावंताचे समाधान होईना. म्हणून अधिक ज्ञान मिळविण्याचे ओढीने व प्रथम दर्जाचे चित्रपट हिंदीमध्ये करण्याचे ईर्षेनेच ते मुंबईकडे निघाले.

## ' बिमल रॉय प्रॉडक्शन्स '

१९५१ मध्ये त्यांनी मुंबईमध्ये ' बॉम्बे टॉकीज ' साठी तयार केलेले ' माँ ' हे चित्र प्रदर्शित झाले. चित्रपट सर्वसाधारणपणे समाधानकारक होता. मात्र याच वेळी एक गोष्ट त्यांच्या लक्षात येऊन चुकली, की, मुंबईमध्ये जर आपल्या मनाप्रमाणे चित्रकथा हाताळून चित्रीकरणाबाबत स्वातंत्र्य हवे असेल, तर स्वतः निर्मितीक्षेत्रात उतरणे आवश्यक आहे, ही गोष्ट लक्षात आल्यावर निर्मात्यासाठी काम करता करताच त्यांनी स्वतःच्या चित्रसंस्थेची जुळवाजुळव करण्यास सुरुवात केली. खऱ्या कलेविषयी आच असणारी व संकटकाळीही साथ देतील, असे सहकारी शोधण्यास त्यांनी सुरुवात केली. मुखर्जी, नवेन्दु घोष, सुवेन्दु रॉय, इत्यादी सहकाऱ्यांना त्यांनी विश्वासात घेऊन आपल्या ' बिमल रॉय प्रॉडक्शन्स ' या पुढे नावारूपास आलेल्या संस्थेची स्थापना केली. त्यांच्या सुरुवातीपासूनच्या सहकाऱ्यांपैकी कित्येकजण शेवटपर्यंत फक्त त्यांच्याच संस्थेत काम करीत.

बिमल रॉय यांनी ज्या वेळी आपल्या नवीन संस्थेची स्थापना केली, त्या वेळी मुंबईच्या चित्रव्यवसायात उदासीनतेची दाट छाया पसरली होती. चाकोरीबद्ध चित्रपटाचे उत्पन्न घटत होते व लोक काहीतरी नावीन्यपूर्ण विचार व कलापूर्ण चित्रपटांचे स्वागत करण्यास उत्सुक होते. या मनःस्थितीचा पूर्ण अभ्यास करून त्यांनी ' दो बिघा जमीन ' हे आपले चित्र तयार केले. वास्तववादी कथा, नाव नसलेल्या कलावंताचा जिवंत अभिनय, मोठ्या प्रमाणावरील आउट डोअर शॉटस्, अशी या चित्राची अनेक वैशिष्टये होती. सामान्यांपासून टीकाकारांपर्यंत सर्वांनी या चित्राची वाखाणणीच केली. मुंबईला हे चित्र मेट्रोमध्ये प्रदर्शित झाले. आपल्या मालकीचा दोन एकर जमिनीचा तुकडा कर्जमुक्त करण्यासाठी जिवापाड धडपडणाऱ्या शेतकऱ्याची ही कथा प्रेक्षकांच्या हृदयास जाऊन भिडते. या त्यांच्या चित्राला सरकारी स्पर्धेत तर बक्षीस मिळालेच, परंतु, केन्स व कार्लोव्ही व्हेरी येथील आंतरराष्ट्रीय महोत्सवातही खास पारितोषिक मिळाले. युरोपमधील समाजवादी राष्ट्रे व रशिया येथे हा चित्रपट आर्थिक दृष्टया कमालीचा यशस्वी ठरला.

१९५३ मध्ये बिमल रॉय यांनी शरश्चंद्रांचे कथेवरील ' परिणीता ' हे चित्र अशोककुमारसाठी दिग्दर्शित केले. आजही त्यांचे हे चित्र प्रथम श्रेणीचे समजले जाते. या चित्रपटाचे चित्रीकरणाचे वेळी विशिष्ट पद्धतीने चित्रीकरण केले जावे म्हणून दडपणे आणण्यात आली. परंतु कशालाही भीक न घालता व कोठेही तडजोड न करता त्यांनी आपल्या मनाप्रमाणे चित्रीकरण पूर्ण केले. या चित्रपटात अनेक दृश्ये इतक्या कौशल्याने हाताळली आहेत की, किंचित् बुद्धिवादी दृष्टिकोनातून चित्रपट पाहणाऱ्या प्रेक्षकांचे डोळ्यांतही टचकन् पाणी यावे. गाण्यांचा उत्कृष्ट वापर व मीनाकुमारीची अत्यंत प्रभावी भूमिका ही या चित्रांची वैशिष्टये होती.

१९५४ मध्ये त्यांचे दिग्दर्शन लाभलेली तीन चित्रे प्रदर्शित झाली. मुन्शी

प्रॉडक्शन्स्‌साठी त्यांनी 'बाप बेटे' दिग्दर्शित केले. परंतु, त्यांच्या कलात्मक हाताळणीचा नवीन आविष्कार 'बिराज बहू' या शरश्चंद्रांचे चित्रातच पाहावयास मिळाला. श्री. हितेंद्र चौधरी यांच्यासाठी त्यांनी हे चित्र दिग्दर्शित केले. दैव-दुर्विलासाने अलग झालेल्या जोडप्याची ही कथा अनेक दृष्टचा अविस्मरणीय ठरली. कथेची अत्यंत प्रामाणिकपणे हाताळणी व ग्रामीण वातावरण निर्माण करणारे उत्कृष्ट सेटस्‌ (श्री. सुधेन्दु रॉय) ही या चित्राची स्वतंत्र वैशिष्टचे ठरली. याच वर्षी बेकारीवर हसत खेळत प्रकाश टाकणारे त्यांचे 'नौकरी' हे चित्र प्रदर्शित झाले. त्यातील "पिया पिया मोरा जिया पुकारे" हे गाणे आजही ताजेतवाने वाटते.

१९५५ मध्ये 'अमानत', 'देवदास' ही चित्रे तयार केली. पैकी जुन्या 'देवदास'चे ते कॅमेरामन होते. दिलीपकुमारच समर्थपणे देवदास उभा करील असा त्यांचा विश्वास होता व तो शंभर टक्के खरा ठरला. 'परिवार' हे चित्रही याच वर्षी प्रदर्शित झाले. तसेच या काळातच त्यांनी भारत सरकारसाठी "गौतम दि बुद्ध" ही डॉक्युमेंटरी तयार केली. या चित्रास राष्ट्राध्यक्षांचे सुवर्णपदक मिळाले. 'अपराधी कौन ?" हे त्यांच्या संस्थेचे; परंतु, त्यांनी दिग्दर्शित न केलेले चित्र. कथेची रहस्यपूर्ण मांडणी व प्रख्यात नट श्री. गजानन जागीरदार यांच्या उत्कृष्ट दुहेरी भूमिकेमुळे गाजले. १९५८ मध्ये प्रदर्शित झालेल्या त्यांच्या 'मधुमती' चित्रपटाने उत्पन्नाचे नवीन उच्चांक निर्माण केले तरी त्यांच्याकडून ज्या पद्धतीची चित्रे अपेक्षित होती, त्याला या चित्राने धक्का दिला. बिमल रॉयही मुंबईच्या 'चाकोरी-चित्र पद्धतीत' बांधले जाणार असे वाटू लागले. श्री. सेवक वाच्छा यांचे-साठी त्यांनी दिग्दर्शित केलेले 'यहुदी' हे चित्र समाधानकारक असले, तरी त्यांच्या नावारूपास साजेसे नव्हते.

**सुजाता, परख......**

परंतु १९५९ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'सुजाता' मध्ये नेहमीचे बिमलदा पुन्हा चमकले. अस्पृश्यतेच्या भ्रामक कल्पनेवर या चित्रात टीका करण्यात आली आहे. मात्र चित्राचा थाट प्रचारकी नाही, हे पुन्हा सांगावेसे वाटते. कारण, मुंबईचे चित्र-निर्माते आपल्या चित्रांतून ज्या वेळी एखाद्या सामाजिक प्रश्नाची हाताळणी करतात, त्या त्या वेळी त्यांची चित्रे रंजकतेचे दृष्टीने तृतीय-श्रेणीची ठरतात हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. 'सुजाता'ची हाताळणी काव्यात्मक होती. 'सुजाता'च्या मनाची व्यथा कोणाच्याही मनास भिडावी, अशा पद्धतीने पुढे ठेवली होती. ललिता पवार, सुलोचना, शशिकला व नूतन या चार महाराष्ट्रीय कलावंतांचा या चित्राचे यशात मोठा वाटा आहे.

१९६० मध्ये श्री. रॉय यांनी दिग्दर्शित केलेला 'परख' मोतीलालच्या भूमिके-मुळे व कथेतील नावीन्यामुळे गाजला.

१९६१ मध्ये बलराज सहानींची प्रमुख भूमिका असलेला 'काबुलीवाला'

चांगला असूनही पडला. फक्त निर्मिती श्री. रॉय यांची होती. १९६२ मध्ये बिमल रॉय प्रॉडक्शन्सने 'प्रेमपत्र' हे बंगाली 'सागरिका' या चित्रावरून तयार केलेले चित्र दिले. तरुण प्रेमिकांची ही दिलचस्प कहाणी मनाला चटका लावणारी होती १९६३ मधील त्यांचा 'बंदिनी' हा बोलपट पाहून बिमल रॉय संपले म्हणणारांची तोंडे बंद झाली व त्यांच्यासंबंधीच्या अपेक्षा वाढल्या. 'स्वामी विवेकानंद' हा उत्कृष्ट महितोपट याच वर्षात त्यांनी तयार केला.

मृत्यूचे वेळी त्यांची दोन चित्रे अपूर्णावस्थेत आहेत. त्यांपैकी धर्मेंद्र व शर्मिला टागोर यांच्या मुख्य भूमिका असलेल्या 'सहारा' चित्राचे दिग्दर्शन ते स्वत: करीत होते. तर 'दो दुनी चार' या आपल्या विनोदी चित्राची जबाबदारी त्यांनी देवव्रत सेन या दिग्दर्शकावर सोपवली होती.

चित्रव्यवसायातील आपल्या दीर्घ कारकीर्दीत त्यांनी अनेक नवीन कलावंत व तंत्रज्ञ निर्माण केले. मात्र ते स्वत: प्रसिद्धीच्या झगझगीत प्रकाशापासून दूर राहात. त्यांच्या चित्रपटावरील टीकात्मक परिक्षणे ते मद्दाम वाचत. एखादे चित्र प्रदर्शित झाल्यावर त्यात ठळक दोष आढळल्यास केवळ स्वत:चे समाधानासाठी ते त्यातील काही भाग पुन्हा चित्रित करून पाहात. कॅन्सरसारख्या गंभीर रोगाने आजारी असूनही ते शेवटपर्यंत कार्यमग्न राहिले. माधुरी पाक्षिकातर्फे भरवण्यात आलेल्या चित्रपट कथा स्पर्धेचे ते मुख्य परीक्षक होते. अत्यंत आजारी असतानाही त्यांनी त्यातील निवडक कथा स्वत: वाचल्या. एवढेच नव्हे तर त्यातील मुद्यांचे तक्ते तयार करून ते समोर ठेवले. मृत्युपूर्वी सुमारे एक महिनाभर ते पुण्यात विश्रांतीसाठी येऊन राहिले होते. परंतु हे स्वस्थ बसणे त्यांना मानवेना व म्हणून डॉक्टरांच्या विरोधास न जुमानता ते मुंबईस परत गेले. सिगरेटचे त्यांना जबरदस्त व्यसन होते व डॉक्टरी सल्ला न मानता त्यांनी आपला शोक शेवटपर्यन्त कायम ठेवला. ज्या रात्री त्यांना मृत्यू आला, त्या रात्रीही ११ वाजता व दीड वाजता त्यांनी धूम्रपान केले.

## अधिकारी व्यक्ती

श्री. बिमल रॉय यांचे खाजगी आयुष्य सुखासमाधानाचे होते. त्यांना एकूण तीन मुली व एक बारा वर्षांचा मुलगा आहे. आपल्यामागे कामाचा प्रचंड व्याप असूनही ते भारताबाहेरील अनेक महत्त्वपूर्ण फिल्म-फेस्टिव्हलसना हजर राहिले. १९५४ मध्ये रशियास गेलेल्या भारतीय चित्रपट व्यावसायिक मंडळाचे ते सदस्य होते. पुढील वर्षी श्री. पृथ्वीराज कपूर यांचे नेतृत्वाखाली चीनला गेलेल्या मंडळाचेही ते सदस्य होते. १९५६ मध्ये स्वत:चे 'देवदास' हे चित्र घेऊन कार्लोव्ही व्हेरी येथे गेले होते. १९५९ साली ते मॉस्को येथील चित्र–महोत्सवाचे परीक्षक होते. याच वर्षी ते एडिंबरो येथील चित्र–महोत्सवास गेले होते.

१९६० ते ६२ या कालखंडात ते 'भारतीय चल–चित्र निर्मिती संघा'चे

(IMPPA) चे अध्यक्ष होते. पहिल्या भारतीय चित्र–महोत्सव समितीचे ते सदस्य होते. चित्र–व्यवसायाशी संबंधित असे अधिकारी घेतेवेळी यु. पी. एस्. सी. त्यांना सन्मानपूर्वक बोलावून घेई. १९६४–६५ मध्ये पुण्याच्या 'फिल्म इन्स्टिटयूट'च्या सल्लागार समितीचे ते सदस्य होते. मुंबईत सहकारी तत्त्वावर स्थापन झालेल्या 'युनायटेड् प्रोडयूसर्स'या संस्थेचे श्री. रॉय एक संस्थापक व सदस्य होते. सिल्क शर्ट, शान्तीपुरी धोतर व हातात सिगारेट, असा त्यांचा पेहराव असे. अलीकडे ते मॅनिला व पॅन्ट वापरू लागले होते. मात्र कोट, टाय वापरणे त्यांना फारसे पसन्त नसे.

## □ आठवणी....

□ श्री. बिमल रॉय कलकत्त्याला असताना एका बंगाली चित्रपटाचे दिग्दर्शन करीत होते. त्या विशिष्ट दृश्यामध्ये बाल कलाकाराच्या मृत्यूचा देखावा चित्रित करावयाचा होता; परंतु, कायम मन लावून काम करणाऱ्या बिमलदांचे चित्रीकरणात लक्ष लागेना. शेवटी शूटिंग बंद करून ते घरी आले. आणि त्याच वेळी विन्दू या त्यांच्या पुतण्याचा अंत झाला. आपल्या अस्वस्थ मन:स्थितीमागे असे काही विचित्र असेल याची त्यांना कल्पनाही नव्हती.

□ 'सुजाता' चित्रपटाचे चित्रीकरण चालू असताना अस्पृश्य मुलीच्या मनातील प्रेमभावना कशा प्रकारे व्यक्त करवाव्यात याचा ते तीन दिवस विचार करीत होते. शेवटी 'सुजाता'ला राहत्या घरामधील बागेमध्ये नेऊन तेथील पाना-फुलांद्वारा तिच्या भावना व्यक्त कराव्यात, असे त्यांनी ठरवले. जलद संकलनाचे सहाय्याने त्यांची ही कल्पना कमालीची यशस्वी ठरली व या चित्रपटातील हे दृश्य एक अजोड दृश्य समजले गेले.

□ आपल्या 'मधुमती' या चित्रासाठी बिमल रॉय हे बाह्य दृश्य चित्रीकरणासाठी गेले होते. मोठ्या मुश्किलीने दिलीपकुमार व वैजयंतीमाला यांच्या तारखा मिळाल्या. तीन चार तास घालवून गाण्याचे चित्रीकरणापैकी काही भाग संपवण्यात आला आणि नंतर लक्षात आले की, सहाय्यक कॅमेरामनने कॅमेऱ्याचे शटरच उघडले नव्हते. एक तास कोणाशीही न बोलता श्री. बिमल रॉय यांनी आपला राग गिळून टाकला व जेवणानंतर पुन्हा नव्याने चित्रीकरणास सुरुवात केली. त्यांच्या या शांतपणाने चित्रपटाचा नायक दिलीप कुमारही आश्चर्याने थक्क झाला.

□ सुप्रसिद्ध अभिनेत्री निरुपा रॉय हिला साचेबंद पौराणिक चित्रपटांच्या कक्षेबाहेर पडण्याची इच्छा होती. आपली ही इच्छा तिने बिमलदांकडे दोन–तीन वेळा व्यक्त केली. परंतु, तिकडे ते लक्ष देत नाहीत असे पाहिल्यावर तिने 'बिमलदा' हे घमेंडखोर आहेत, अशी समजूत करून घेतली. परंतु आपल्या 'दो बीघा जमीन' चित्रपटात तिला साजेशी भूमिका आहे, हे लक्षात आल्याबरोबर बिमलदांनी तिला

आठवणीने बोलावून ती भूमिका दिली. या चित्रपटातील तिची भूमिका ही एक अत्यंत लोकप्रिय भूमिका आहे.

☐ पुण्याच्या फिल्म इन्स्टिटयूटच्या सल्लागार समितीच्या सभेचे आमंत्रण असे, त्या वेळी श्री. बिमलदा हे सदस्य असल्याने या सभांना ते वेळात वेळ काढून येत. एकदा या सभेचे आमंत्रण स्वीकारल्याचे लक्षात न राहून ते काही महत्त्वाचे कामासाठी दिल्लीला गेले. तेथे गेल्यावर त्यांना पुण्याच्या सभेची आठवण झाली. तावडतोब तेथील काम अर्धवट टाकून विमानाने ते मुंबईस आले व लगेच त्या दिवशी पुण्यास येऊन सभेचे कामकाजही पाहिले.

☐ आपले सिगारेटचे व्यसन सुटावे असे श्री. बिमल रॉय यांना मनापासून वाटे. घरून निघताना आज पाचच सिगारेटस् ओढावयाच्या असे ते ठरवत. परंतु एकदा चित्रीकरणात त्यांचे मन रमू लागले की, ते एकामागून एक सिगारेटस् ओढीत व या बाबतीत त्यांना कोणी आठवण करून दिली तर "उद्यापासून बर का," एवढे म्हणून ते मोठ्याने हसत व नवीन सिगारेटची मागणी करीत. या कामात आपल्याला यश येत नाही हे पाहिल्यावर मात्र त्यांनी हा नाद सोडून दिला.

## ☐ दो बीघा जमीन (कथा)

बिमल रॉय यांच्या अत्यंत गाजलेल्या व परदेशातही नावाजलेल्या चित्रपटांपैकी एक म्हणजे 'दो बीघा जमीन' होय.

शंभू नावाच्या साध्या भोळ्या शेतकऱ्याची ही कथा. त्याचे वृद्ध वडील, पत्नी पार्वती व छोकरा कन्हय्या यांच्यासह तो राहात असतो. पावसाची अपेक्षा करीत पेरणी करतो, पण पिके सुकून जातात. जमीनदार जमीन परत मागतो. शहरातील मदतनिसाचे सहाय्याने त्याला तेथे कारखाना काढावयाचा असतो. सर्व आयुष्य शेतावर काढलेला शंभू आपली अन्नदात्री जमीन देण्याचे नाकारतो.

जमीनदार कोर्टात जाऊन जप्ती आणवतो. मात्र सावकाराचे सर्व देणे शंभूने तीन महिन्यांत दिल्यास जमीन राहणार असते. मित्राच्या सल्ल्याप्रमाणे शंभू आपल्या छोट्या मुलासह कलकत्त्यास येतो. ही साधी खेडवळ माणसे शहरी वातावरणात गुदमरून जातात. कन्हैय्या आजारी पडतो, इतकेच नव्हेतर रक्ताचे पाणी करून जमवलेले पैसे चोरीस जातात. पण शंभूची जिद्द संपत नाही. योगायोगाने मिळालेली रिक्षा शंभू चालवावयास घेतो. जमीन वाचवण्याच्या त्याच्या आशेस पुन्हा अंकूर फुटतो. कन्हैय्या बुट पॉलिश सुरू करतो. तर इकडे खेड्यात पार्वती मजुरी कामास सुरुवात करते. शंभूला पैसे जमवल्याचे समाधान मिळणार असे वाटत असतानाच त्याला अपघात होतो. वडिलांची काळजी वाटून कन्हैय्या सर्व हकीकत आईला कळवतो. इकडे मित्रांचा सल्ला न मानता शंभू पुन्हा रिक्षा हातात धरतो. इकडे कलकत्त्याला आलेली पार्वती गुंडांच्या हातात पडते व त्यातून सुटका करून घेत

असताना तिलाच अपघात होतो. भाड्यासाठी भटकणारा शंभू तिच्याजवळ येतो. आपल्या पत्नीला तिथे पाहून त्याला धक्काच बसतो. प्रत्येक पायरीवर दुर्दैवाशीच गाठ पडलेला शंभू खचून जातो. बायकोला वाचवणे हेच त्याचे कर्तव्य ठरते व सावकाराचे पैसे तो देऊ शकत नाही. सर्वजण ज्या वेळी परत खेड्यात येतात त्या वेळी नवीन कारखान्याची उभारणी चालू असते.

चित्रपटातील योगायोगाचा भाग सोडला, तर अत्यंत वास्तववादी कथेचे अत्यंत प्रामाणिक चित्रण असेच या चित्रपटाबाबत म्हणावे लागेल. शेतकऱ्याचे जमिनीवरील जिवापाड प्रेम, कलकत्त्यातील श्रमजीवी वर्गाची राहाणी, यांचे चित्रीकरण जिवंतपणे केलेले आहे. बलराज, निरुपा रॉय, हे त्या वेळी नाव नसलेले कलावंत घेऊन अगदी वेगळ्या प्रकारचे चित्र देण्याचे धाडस केवळ ' विमलदा 'च करू जाणोत.

● ● ●

---

[ विटी नवी, राज्य जुने : पृष्ठ ५ वरून चालू ]

आफ्रिकन राष्ट्रांमध्ये आपले वजन वाढविण्याचा चीनने केलेला पराकाष्ठेचा प्रयत्न अगदीच अयशस्वी ठरला आणि आफ्रिकनांनी चीनला विशेष दाद दिली नाही. इंडोनेशियात चीनच्या चिथावणीने तेथील कम्युनिस्ट पक्षाने बंडाळी केल्यामुळे इंडोनेशियन कम्युनिस्ट पक्षाचे पार वाटोळे झाले. गेल्या ३० सप्टेंबरपासून या बंडाळीत दीड लाखांच्या वर कम्युनिस्ट जिवे मारले गेले आणि इंडोनेशियात सारखी वाढत चाललेली चीनची प्रतिष्ठा पार लयाला गेली.

ही सारी चिन्हे चीनच्याही ध्यानी येत असली पाहिजेत, त्यामुळेच चीन आपल्या धोरणांच्या हालचालीत नजीकच्या भविष्यकाळातच महत्त्वाचे बदल करण्याची मोठी शक्यता दिसते. शास्त्रीजींच्या निधनाबद्दल चीनने दुखवट्याचा संदेश पाठवला होताच, शिवाय त्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी आपला एक प्रतिनिधीही पाठविला होता. चीनच्या वागण्यातील हा बदल आता आणखी स्पष्ट होऊ लागण्याचा संभव आहे. याच दृष्टिकोनातून अधिकारारूढ होताच प्रसंग आल्यास चीनशीही आम्ही बोलणी करू अशी इंदिराबाईंनी केलेली निःसंदिग्ध घोषणा व डाव्या पक्षांनी (डांगे गट) तिला दिलेला पाठिंबा यांवरून इंदिराबाईंच्या धोरणांचा कल कोणीकडे झुकेल हे स्पष्ट होत आहे.

— विवेचक

# फक्त १० रुपये महिना

## हप्त्याची विमा पॉलिसी घ्या कीं या दोन मुलांच्या शिक्षणाची सोय होईल...

ही दोन मुले हुषार दिसतात. ही पुढें काय करतील? शिक्षण पुरे करून कांहीं नवीन कामधंदा, रोजगार मिळवितील कीं यांना मध्येच शाळा सोडून वडिलांना मदत करावी लागेल! तसं झालं तर फार खेदाची गोष्ट. त्यांचे शिक्षण मध्येच बंद पडू नये म्हणून काय करावयास पाहिजे? फक्त १० रु. महिना बचत केली कीं या दोघांना प्रत्येकी एक हजार रुपये मिळतील; व त्यांच्या तांत्रिक शिक्षणाची सोय खात्रीने होईल. दुर्दैवानें वडील नसले तरीहि. थोडा व सोयीस्कर हप्ता भरायचा आणि हप्ता भरणारा हयात असला व नसला तरीहि ठरलेल्या वेळीं ठरलेली रक्कम मिळायचीच. ही सोय फक्त आयुर्विम्यांतच आहे.

आयुर्विम्याला पर्याय नाही.

Pratibha/M/B/6512



## उचलला टाक....

### □ 'प्रयोगावस्थे'तील देश :

बंगलोरच्या एका महाविद्यालयात नव्या पद्धतीने परीक्षा चालू आहेत. या परीक्षांना पाचशे विद्यार्थी बसले होते. प्रश्नपत्रिका वाटण्यात आल्या आणि नंतर वर्गावर कोणीही राहिले नाही. 'पर्यवेक्षक किंवा सुपरवायझर न ठेवता विद्यार्थ्यांच्या सद्-सद्विवेकबुद्धिवर विश्वास ठेवायचा असे आम्ही ठरवले'–असा खुलासा त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी केला. या वयाचे विद्यार्थी सहसा शिक्षकांना फसविणार नाहीत, असा प्राचार्यांचा विश्वास आहे.

बंगलोरला चाललेला हा अभिनव प्रयोग वाचून काही मंडळींना कदाचित आश्चर्य वाटेल; पण तसे आश्चर्य वाटण्याजोगे यात काय आहे बरे ? गेली कित्येक वर्षे आपला हा देश म्हणजे मोठी प्रयोगशाळा बनलेली नाही काय ? कधी सत्याचे प्रयोग झाले, कधी अहिंसेचे झाले. सर्वोदय, ग्रामदान यांचेही प्रयोग अजून चालूच आहेत. कच्छ–करार, ताश्कंद–करार यांच्या रूपाने महान् शांतीचेही प्रयोग सुरू आहेत. आपला देश अजून प्रयोगावस्थेतच आहे, आणि महत्त्वाच्या क्षेत्रात या उलाढाली चालू आहेत, तेथे शिक्षणक्षेत्राने असे काय घोडे मारले आहे ? तेथेही मधूनमधून काही प्रयोग होत आहेत. याचा सगळ्यांना आनंदच व्हायला पाहिजे. याचा परिणाम नेमका काय होईल हे मात्र तूर्त कोणी पाहू नये. मागे अमेरिकन प्रामाणिकपणाच्या मानाने आपला प्रामाणिक-पणा जोखण्यासाठी येथेही काही ठिकाणी नुसती वर्तमानपत्रे आणि त्या शेजारी पैसे टाकण्यासाठी एक पेटी ठेवलेली होती. ग्राहकाने पैसे पेटीत टाकायचे आणि आपणाला हवे ते वर्तमानपत्र उचलून चालू लागायचे. किती साधी आणि सरळ गोष्ट ! पण आपल्या लोकांजवळ बहुधा मोड नसते; कारण अशा पेट्या मागाहून बऱ्याचशा रिकाम्याच आढळतात. काही ठिकाणी तर या पेट्याच गायब झाल्या म्हणतात. तेव्हा अशा प्रयोगांचे पुढे काय होते, हा प्रश्न कुणी विचारू नये. प्रयोग आहे ना ? मग उत्तमच असणार आणि तो केलाच पाहिजे. आमची तरी अशी सूचना आहे की, नुसता सुपरवायझर कमी करून प्राचार्यांनी थांबू नये. आणखीही पुढे जाऊन काही नवे प्रयोग करावेत. उत्तरे लिहीत असताना त्या त्या विषयांची क्रमिक पुस्तकेही प्रत्येक बाकावर ठेवण्यात यावीत आणि पुस्तके पाहण्याचा मोह विद्यार्थ्यांना टाळता येतो की नाही तेही पाहावे. इतकेच नव्हे तर, विद्यार्थ्यांनी कॉलेजमध्ये वर्षभर अजिबात पाय नाही ठेवला तरी चालेल, असाही एक

फतवा काढून काय परिणाम होतो ते पाहावे. नापास होणारे आणि उडाणटप्पू विद्यार्थी परीक्षा न घेता एकदम पास केले तर काय परिणाम होईल ? प्रयोग करून पाहण्यासारखा आहे.

## □ माणसाला शिंगे फुटली :

परवाच वर्तमानपत्रात बातमी वाचली. गडहिंग्लज तालुक्यातील महागाव नावाच्या गावी एक अद्‌भुत गोष्ट घडली म्हणतात. तेथील पंचेचाळीस वर्षांच्या एका गृहस्थाच्या डोक्याला शिंगे फुटत आहेत. डोक्याच्या मागच्या बाजूला चार इंच लांबीची ही शिंगे आहेत असे म्हणतात. ही बातमी ऐकून किंवा वाचून काय वाटते ? कुतूहल वाटते की नाही ? वाटणारच. माणसाला मिशा फुटतात, मते फुटतात पण शिंगे फुटण्याचा रोमांचकारी प्रकार हा बहुधा पहिलाच असावा. पण खरे म्हणजे ही गोष्ट एवढी कौतुकाची वाटण्याचे काही कारण नाही. माणूस हाही एक शेवटी प्राणीच आहे ना ? Man is a social animal ही व्याख्या बदलून एकाने Man is an animal though social असे एकदा म्हटले होते त्याची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. आणि प्राणी म्हटल्यानंतर शिंगे आलीच. एकेकाळी माणसाला शेपूट होते म्हणतात. त्याचा वापर न केल्यामुळे ते हळूहळू गळून पडले असे शाहणीसुरती माणसे सांगतात. तशीच शिंगेही पूर्वी असतील. नाही म्हणून कोणी सांगावे ! ' का, एवढ्यातच शिंगं फुटलीं का तुला ? ' असे जेव्हा बाप आपल्या कारट्याला खेकसून बोलतो, तेव्हा त्याचा हाच अर्थ असेल का ? कदाचित असेलही. पुराणकाळी माणसाला असलेला अवयवांचा हा भाषेतला अवशेष अजून उरला असेल.

खरे म्हणजे माणसाला शिंगे फुटली, ही एक चांगली घटना आहे असे माझे मत आहे. सगळ्याच माणसांना ती फुटू लागली तर फार बहार होईल. शिंगांमुळे माणसाच्या सौंदर्यात भर पडण्याचा संभव आहे. निदान पुरुषांना तरी फुटावीतच, कारण सौंदर्य नावाची चीज निसर्गाने पुरुष वर्गाला दिलेलीच नाही. बायका आपल्या पुरुषाला भुलतात म्हणून आपण गैरसमज करून घेऊन कसे चालेल ! एका तत्त्वज्ञ लेखकाने मोठ्या गंभीरपणे एकदा म्हटले होते. स्त्रियांना सौंदर्यबुद्धी नसते. कारण ती जर असती तर जगात एकाही पुरुषाचे लग्न झाले नसते ! " – आमचा मुद्दा हा की, शिंगांमुळे पुरुष नावाचा प्राणी जरा देखणा दिसण्याचा संभव आहे. पूर्वी निदान शारीरिक बळ हे तरी पुरुषाचे वैभव होते. आता तेही उरलेले नाही. खप्पड गालाचा आणि सपाट छातीचा मधू पाहून कुठल्यातरी मालतीला त्याच्याबद्दल प्रेम वाटणे शक्य आहे काय ? पण याच मधूला सुंदर शिंगे निदान असतील तर तीच मालती आपल्या मैत्रिणीला म्हणणार नाही का, " अय्या, पमे, वापटांचा मधू आहे आपला असा–तसा, पण त्याची शिंगं किती अक्कडबाज आहेत नाही ?

पाहिल्याबरोबर डोळयांत भरली बघ ! इतकी माणसं अन् शिंगं पाहिली, पण मधूची सर नाहीगं कुणाला !" ...

शिंगांनी एवढे काम केल्यावर आता पुढचे काम मधूने करायला पाहिजे, हे उघड आहे. तेवढे मधूला जमले तर शिंगांचे वार्शिगांत रूपांतर व्हायला कितीसा वेळ !

## □ अरण्यातील निवडणूक :

कालपरवाच एक गमतीदार स्वप्न पडले. गमतीदार म्हणजे फारच जंमतीदार. कुठल्यातरी अरण्यात एक निवडणूक चाललेली होती ती पहायला मिळाली. सगळे नीटसे आठवत नाही, पण जेवढे लक्षात आहे तेवढे सांगतो.

—म्हणजे काय झाले बरे का, अरण्यातला मुख्य सिंह एकदम अपघाताने मरण पावला. आता अरण्यात प्रमुख कोण अशी झाली चर्चा सुरू. कुणी हत्तीचे नाव सुचवले, कुणी आणखी कुणाचे. पण एकमत काही होईना. शेवटी एकदम एका लांडग्याने जाहीर केले की, आपण या अरण्याचे प्रमुख होणार. त्याचे ते चमकणारे डोळे आणि सुळकेदार दात पाहिल्यावर याला कोणी विरोध करायचा असा प्रश्न पडला. प्रजेचा फारसा प्रश्न नव्हताच, कारण त्या अरण्यात बराचसा भरणा गाढवे, खेचरे आणि माकडे यांचाच होता. त्यामुळे कुणीही अरण्याधिपती झाले तरी त्यांना त्याचे काही सोयरसुतक नव्हते. आणि असलेच तरी त्यांच्या मताला काही किंमत नव्हती. गाढवांना कसले आले आहे हो मत ? त्यांनी आपले राबावे आणि मिळेल ते खावे. राजा सिंह होता तरी खरी सत्ता कोल्ह्यांच्या हातांत होती. सगळे कोल्हे जमले. प्रत्येकाला खरे मनातून वाटत होते की, खरी लायकी आपलीच राजा व्हायची आहे. पण परस्परांच्या भीतीने कुणीच काही बोलेना. बरीच कोल्हेकुई झाली. तरी निर्णय काही ठरेना. इकडे लांडग्याने आपली उमेदवारी जाहीर केल्यावर मात्र सगळेच दचकले. त्यांच्यात एक माणसाळलेली वनगाय होती. पण एक कोल्हा म्हणाला, "आमच्या सर्वांशी ही किती आपुलकीने वागते ! तिचीच आपण राणी म्हणून निवड करू या." दुसरा कोल्हा म्हणाला, "अगदीच साधी बाई आणि तिच्याबद्दल कोणाची तक्रार नाही. ती चांगल्या कुळातली आहे. तीच राणी व्हायला पाहिजे." शेवटी साधेपणाचा विजय झाला. कुणाचीच तिच्याविरुद्ध काही तक्रार नाही ही गोष्ट फार महत्त्वाची ठरली आणि सगळ्या कोल्ह्यांनी वनगाईचे नाव पुढे केले. लांडग्याने पूर्वी अनेकदा अनेकांना दुखविले होते. त्याच्या बाजूने फारच थोडे प्राणी उभे राहिले. तोही लोकांना सांगू लागला की, मी आणि वनगाय यात श्रेष्ठ कोण हे तुम्हीच ठरवा. मी असा काय गुन्हा केला आहे की मला या अरण्याचे राजेपण मिळू नये ? मी तत्त्वासाठी लढतो आहे. पण हे सगळे अरण्यरुदन ठरले. शेवटी निवडणूक झाली. लांडगा हरला. वनगायच

विजयी झाली. सगळ्या कोल्ह्यांना अपूर्व आनंद झाला. त्यांनी मोठी कोल्हेकुई करून आपला हर्ष व्यक्त केला. काही गाढवे मात्र थोडी कुरकुरत होती की वनगाय साधी भोळी, चांगली, वगैरे असेल. पण आपल्या अरण्यावर कुणाचा हल्ला झाला तर आमचे रक्षण कोण करणार ? पण तेवढयात काही कोल्ह्यांनी त्यांना दटावले आणि गाढवमंडळी गप्प बसली........

पुढे काय घडले हे मला नीटसे आठवत नाही. केव्हातरी पुन्हा हे स्वप्न पडले तर पाहू. आजतरी एवढेच लक्षात आहे.

● ● ●


**श्री. ब. मो. पुरंदरे**

*यांची नवी ऐतिहासिक कादंबरी*




मूल्य तीन रुपये

**राजहंस प्रकाशन**

*४१९ नारायण, पुणे २*



आता गाडी तर 'स्टार्ट' केली
चौथ्या योजनेची हद्द येथून सुरू होते
पंतप्रधान
परदेशी चलन
लाचलुचपत
सीमा प्रश्न
ताश्कंद करार
गोवा प्रश्न...
अन्न-धान्य समस्या
काळा बाजार
पंजाबी सुभा
- राजेंद्र गायकवाड

MANOOS (Fortnightly) : 1 Feb. 1966 : 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **श्री. ग. माजगावकर**